सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ९ जुलै २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २२१ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संस्थेमध्ये कागदोपत्री व्यवहार कमीत कमी ठेवावा व चर्चेतून प्रश्न सोडवावेत. सहकाऱ्यांवर प्रचंड विश्वास ठेवावा. कुणाच्याही माघारी (मागे) त्याच्या दोषांबद्दल चर्चा करू नये. दोष ज्याचा त्याला सांगावा. गुण जनांशी सांगावे.

**- स्व. प्रल्हादपंत अभ्यंकर**
रा. स्व. संघाचे माजी महाराष्ट्र प्रांत संघचालक

## विनम्र अभिवादन



**राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची आज तिथीनुसार पुण्यतिथी**

# 'ख्रिश्चन मिशनरीज'च्या मालमत्तांची होणार चौकशी

**| सर्व खरेदी-विक्रीच्या व्यवहारांची सखोल तपासणी | बावनकुळे यांची घोषणा**



**पावसाळी अधिवेशन**

**मुंबई, ८ जुलै**
इंग्रजकालीन ख्रिश्चन मिशनरी संस्थांनी राज्यात मागे सोडलेल्या मालमत्तांची राज्यव्यापी तपासणी करून त्यांच्या मालकीहक्क, अभिलेख आणि त्यानंतर झालेल्या सर्व व्यवहारांची सर्वंकश चौकशी केली जाईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत केली. या चौकशीचा अहवाल पुढील तीन महिन्यांत तयार करण्यात येईल, असेही त्यांनी सभागृहाला सांगितले.

विशेष म्हणजे नागपूर शहराच्या मध्यवर्ती भागात ख्रिश्चन संस्थाकडेही खूप मोठ्या प्रमाणात जागा आहेत.

विधानसभेत सदस्य देवयानी फरांदे यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती, त्याला उत्तर देताना महसूल मंत्र्यांनी सदर घोषणा केली. यावेळी बावनकुळे म्हणाले की, राज्यातील ख्रिश्चन मिशनरी संस्थांच्या मालमत्तांबाबत महसूल अभिलेख, जमाबंदी नोंदी, मालकी हक्कातील बदल तसेच त्यानंतरच्या काळात झालेल्या सर्व खरेदी-विक्रीच्या व्यवहारांची सखोल तपासणी केली जाईल. या प्रक्रियेसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष यंत्रणा कार्यरत केली जाणार आहे. या उच्चस्तरीय तपास यंत्रणेमध्ये महसूल विभाग, जमाबंदी विभाग, नोंदणी व मुद्रांक विभाग, पोलीस आणि इतर संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकार्‍यांचा प्रामुख्याने समावेश केला जाईल.

नाशिक डायोसेशन ट्रस्ट आणि नाशिक डायोसेशन कौन्सिल यांच्यातील वादग्रस्त मालमत्ता प्रकरणाचा उल्लेख करत महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केले की, हे प्रकरण सध्या उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. मात्र, असे असले तरी संबंधित मालमत्तांच्या मालकी नोंदी, झालेल्या व्यवहारांची कायदेशीर वैधता, धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अधिकृत नोंदी तसेच इतर सर्व संबंधित तांत्रिक बाबींची स्वतंत्रपणे सखोल चौकशी करण्यात येणार आहे. अहवालाच्या आधारे शासन कायदेशीर भूमिका उच्च न्यायालयात मांडेल. (तभा वृत्तसेवा)

### महसूल नोंदीतील संभाव्य अनियमितता तपासणार



या मालमत्तांशी निगडित स्थानिक नागरिकांच्या विविध तक्रारी, काही खासगी संस्थांकडून नागरिकांना होणारा कथित त्रास आणि महसूल नोंदींमधील संभाव्य अनियमितता किंवा फेरफार यांचीही बारकाईने तपासणी केली जाईल. ही संपूर्ण चौकशी पूर्ण झाल्यानंतर जे काही निष्कर्ष समोर येतील, त्यानुसार कायदेशीर आणि प्रशासकीय कार्यवाही तातडीने केली जाईल, अशी ग्वाही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिली.

## शेतकऱ्याला जमीन भरपाईसाठी
# टोल नाका जप्तीचा आदेश

**चंद्रकांत लोहाणा**



जप्त करण्यात आलेला टोलनाका

**वाशीम, ८ जुलै**
शेतकऱ्याला जमिनीचा योग्य मोबदला न दिल्याने जिल्हा न्यायालयाने कठोर भूमिका घेत चक्क टोल प्लाझा जप्त करण्याचा अभूतपूर्व आदेश दिला. पक्षकाराचे वकील उदय देशमुख यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली.

या प्रकरणात शेतकऱ्याला हक्काचे पैसे न मिळाल्याने न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालयाच्या कठोर आदेशामुळे संबंधित टोल प्रशासनाला मोठा धक्का बसला असून, या निर्णयाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ मध्ये बेबी दिनकर गर्जे व त्यांचा मुलगा विठ्ठल दिनकर गर्जे यांची मौजे जांभरूण नावजी येथील राज्य महामार्ग ५१ वाशीम ते रिसोड लगत असलेले गट क्र. ५५, ५६, ५७ शेती जी अकृषक करण्यात आली होती. तत्कालीन भूसंपादन तथा उपविभागीय अधिकाऱ्यांनी फक्त अधिकृत केलेल्या भूखंडाचाच मोबदला दिला. हे अधिग्रहण करताना लेआऊट मधील रस्ते, खुला प्लॉट व सोयीसाठी सोडलेल्या खुल्या जागेचा भाग अधिग्रहण केला असताना त्याची नुकसानभरपाई दिली नाही. तसेच अधिग्रहण केलेल्या जमिनीचा दर हा राज्य महामार्गाला लागून असल्यामुळे शासकीय रेडीरेकनरच्या चारपट ठरवावा लागतो. मात्र, त्यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे बेबी व विठ्ठल यांनी अप्पर जिल्हाधिकारी, वाशीम यांच्याकडे याचिका दाखल केली.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ही रक्कम आदेशित केल्याप्रमाणे दिली नाही. त्यामुळे अर्जदारांनी जिल्हा न्यायालयात एकूण सहा याचिका दाखल केल्या होत्या. महामार्ग प्राधिकरणाची जबाबदारी असूनही त्यांनी रक्कम भरली नाही. त्यामुळे वाशीम जिल्ह्याच्या अधिकारक्षेत्रामध्ये गट क्र. ३०२ असलेला तोंडगाव धुमका टोल नाका जप्त करण्याची मागणी केली. त्यानुसार प्रमुख जिल्हा न्यायधीश अनिल सुब्रमण्यम यांनी तोंडगाव-धुमका टोल प्लाझा जप्त करण्याच्या 'वॉरंट'वर स्वाक्षरी केली.

> जप्त केलेला टोल नाका हर्रास करून शेतकऱ्यास नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी न्यायालयास करणार आहे.
>
> **ॲड. उज्वल देशमुख**
> वाशीम

# प्रकल्पांना बदनाम केल्यास सोडणार नाही : मुख्यमंत्री



**मुंबई, ८ जुलै**
मला बदनाम करा, देवेंद्र फडणवीस 'शिव्या प्रूफ' आहे; त्याला शिव्यांची सवय झाली आहे. परंतु राजकीय स्वार्थासाठी महाराष्ट्राला आणि येथील जागतिक दर्जाच्या प्रकल्पांना बदनाम केलात तर सोडणार नाही, अशा शब्दांत मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील 'मिसिंग लिंक' (कनेक्टिंग लिंक) प्रकल्पावर विरोधकांकडून केल्या जाणाऱ्या टीकेचा समाचार घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत विरोधकांना निर्वाणीचा इशारा दिला. १० वर्षांनंतर आज टीका करणारे कुठेही दिसणार नाहीत, पण ही 'मिसिंग लिंक' दिमाखात उभी असेल आणि त्यावर आमचेच नाव असेल, असा घणाघात त्यांनी सभागृहात केला.

बुधवारी मुख्यमंत्री सत्ताधाऱ्यांच्या २९३ च्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देत होते. विरोधकांनी 'मिसिंग लिंक' परिसरात झालेल्या दरड कोसळण्याच्या घटनेचे भांडवल करत संपूर्ण प्रकल्पावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. काही लोक टीव्ही आणि सोशल मीडियावर येऊन तद्दन खोटं बोलत आहेत. १ कोटी खोटारडे लोक मेल्यानंतर अशी माणसे जन्माला येतात. महायुती सरकारकडे हिंमत होती म्हणून आम्ही हा प्रकल्प पूर्ण करून दाखवला. यापूर्वीच्या आघाडी सरकारच्या काळात या 'मिसिंग लिंक'चा केवळ प्रस्ताव तयार झाला होता, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

## शाह यांची फडणवीसांसोबत चर्चा

**नवी दिल्ली, ८ जुलै**
केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत दूरध्वनीवर चर्चा करीत मुसळधार पावसामुळे राज्यात उद्‌भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. केंद्र सरकारकडून राज्याला सर्व ती मदत केली जाईल, असे अमित शाह यांनी देवेंद्र फडणवीस यांना आश्वस्त केले.

मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे लोकल सेवा बाधित झाली. त्यामुळे कार्यालयात जाणाऱ्या चाकरमान्यांची प्रचंड गैरसोय झाली होती. आठवड्याच्या शेवटी शहराला प्रचंड तडाखा बसला आणि मंगळवारी काही प्रमाणात दिलासा मिळाला. (वृत्तसंस्था)

## 'तोयबा'च्या कमांडरचा खात्मा

**श्रीनगर, ८ जुलै**
जम्मू-काश्मिरातील शोपियाँ जिल्ह्यात सुरक्षा दलाने बुधवारी धडक कारवाई करीत लष्कर-ए-तोयबाच्या स्वयंघोषित कमांडरचा खात्मा केला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

सुरक्षा दलांनी दक्षिण काश्मीरमधील सात गावांचा समावेश असलेल्या मीमंदर भागातील दाट फळबागेत ३ जुलै रोजी शोधमोहीम सुरू केली होती. 'तुम्ही पळू शकता, पण लपू शकत नाही!' शोपियाँ येथील एसओजीने आरआर आणि सीआरपीएफ यांच्या संयुक्त मोहिमेत तोयबाच्या एका दहशतवाद्याचा खात्मा केला, अशी माहिती जम्मू-काश्मीर पोलिसांनी 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये दिली. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी ठार झालेल्या अतिरेक्याची ओळख पटवली असून, झाकीर अहमद गनी, असे त्याचे नाव आहे.

गनी याने २७ सप्टेंबर २०२३ रोजी 'शटरिंग'चे काम करण्यासाठी डायलगम येथे जाण्यासाठी घर सोडले होते. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### शेअर बाजाराला तणावाचा फटका

**मुंबई :** अमेरिका-इराण दरम्यान वाढलेल्या तणावामुळे जागतिक बाजारातून नकारात्मक संकेत मिळाले. त्यातच कच्चे तेल तब्बल ६ टक्क्यांहून अधिक महागल्याने आणि मध्य पूर्वेतील भू-राजकीय परिस्थिती चिघळल्याने भारतीय शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी मोठी घसरण पाहायला मिळाली. बुधवारी बाजाराची सुरुवातच घसरणीसह झाली. दुपारच्या सत्रात विक्रीचा दबाव आणखी वाढल्याने चौफेर पडझड झाली आणि निफ्टीने २४,००० चा टप्पा ओलांडून खाली धाव घेतली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील ताज्या हवाई हल्ल्यानंतर 'तात्पुरता युद्धविराम संपला' असल्याचे जाहीर केले. या वक्तव्यानंतर बाजारात घबराट पसरली आणि निफ्टीने २३,८०५ या दिवसाच्या नीचांकी पातळीला स्पर्श केला.

## माउलींच्या पालखीचे प्रस्थान

**आळंदी, ८ जुलै**
'पंढरीची वारी आहे माझ्या घरी। आणिक न करी तीर्थव्रत॥'

अशीच अनुभूती आज अलंकापुरीत आली. अतिवृष्टीचे संकट आणि इंद्रायणीचा पूर अशा नैसर्गिक आपत्तींचे सावट असतानाही वारकऱ्यांची भक्ती आणि उत्साह तसूभरही कमी झाला नाही. जणू वारकऱ्यांची भक्ती पाहून निसर्गालाही या शेकडो वर्षांच्या परंपरेत सहभागी व्हावेसे वाटले. पूर ओसरला, पावसानेही विश्रांती घेतली आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याने सायंकाळी देऊळवाड्यातून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान ठेवले.

८ जुलै रोजी पहाटे ४ वाजता प्रस्थान सोहळ्याच्या विविध धार्मिक विधींना सुरुवात झाली. ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीवर पवमान अभिषेक करण्यात आला. माऊलींचा चांदीचा मुखवटा समाधीवर ठेवून त्याची विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांसाठी दर्शनबारी सुरू करण्यात आली. (तभा वृत्तसेवा)



# ममतांना हायकोर्टाचा दणका



**कोलकाता, ८ जुलै**
पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसशी संबंधित कथित फंडिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडीने) पक्षाच्या बँक खात्यांमधील सुमारे ४४० कोटी रुपयांच्या निधीचा तपास सुरू करत ही बँक खाती गोठवली. ममता बॅनर्जी यांनी कोलकाता उच्च न्यायालयात धाव घेत ईडीच्या कारवाईला स्थगिती देण्याची मागणी केली होती. बुधवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने ममता यांची याचिका फेटाळून लावत कारवाईत हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

बॅनर्जी यांच्या गटाने बँक खाती गोठवण्याच्या कारवाईला कोलकाता उच्च न्यायालयात आव्हान दिले होते, परंतु न्यायालयाने त्यांना तातडीने कोणताही दिलासा देण्यास नकार दिला. न्यायालयाच्या या भूमिकेनंतर ईडीने या प्रकरणात मनी लाँड्रिंगच्या (पैशांची अफरातफर) दृष्टीने तपास सुरू केला. खात्यांमध्ये एवढी मोठी रक्कम कुठून आली आणि ती कोणत्या कारणांसाठी वापरली जाणार होती, याचा शोध आता यंत्रणा घेत आहे. दरम्यान ईडीने बुधवारी एका खासगी विमान कंपनीच्या कार्यालयावर छापे टाकले. या कंपनीने ममता आणि अभिषेक बॅनर्जी यांच्यासह तृणमूलच्या वरिष्ठ नेत्यांना चार्टर्ड विमानांची सेवा पुरवल्याचा संशय आहे. (वृत्तसंस्था)

## सर्व एसटी बसेस इलेक्ट्रिक होणार

**मुंबई, ८ जुलै**
पर्यावरणपूरक, आधुनिक आणि शाश्वत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्याच्या उद्देशाने राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाचा संपूर्ण बस ताफा २०३५ पर्यंत टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक करण्यात येणार असल्याची महत्त्वाची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. भाजपाचे श्रीकांत भारतीय यांनी या संदर्भातला प्रश्न उपस्थित केला होता. (वृत्तसंस्था)

**ताज्या घडामोडी**
क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# मध्यपूर्वेत पुन्हा भडका

**शांतता करार रद्दची ट्रम्प यांची घोषणा | दोन्ही देशांचे परस्परांवर भीषण हल्ले | होर्मुझमध्ये वाढला तणाव**

**दुबई, ८ जुलै**
आंतरराष्ट्रीय जलवाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या होर्मुझ जलमार्गात व्यत्यय आणत इराणी सैन्याने मंगळवारी चार जहाजांवर हल्ले केले. शांतता करारादरम्यान इराणच्या कुरापतींना प्रत्युत्तर देत अमेरिकेच्या सैन्याने बुधवारी जोरदार हल्ले चढवले. यानंतर इराणने कतार आणि बहरीन येथील अमेरिकेच्या लष्करी तळावर हल्ले केले.

अमेरिकन सेंट्रल कमांडने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, होर्मुझ जलमार्गात जहाजांवर केलेला हल्ला आणि आंतरराष्ट्रीय मार्गात अडथळा आणण्याच्या कृतीला प्रत्युत्तर म्हणून इराणच्या ८० पेक्षा जास्त लष्करी तळांवर अचूक आणि अत्यंत शक्तिशाली हवाई हल्ले करण्यात आले. अचूक मार्गदर्शित शस्त्रांचा वापर करून इराणची हवाई संरक्षण प्रणाली, लष्करी कमांड आणि नियंत्रण नेटवर्क, किनारी रडार आणि जहाजविरोधी क्षेपणास्त्र तळ, तसेच आयआरजीसीच्या ६० हून अधिक लहान नौकांना उद्ध्वस्त करण्यात आले.

क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा करत इराणने बहरीन आणि कुवेतमधील अमेरिकेच्या लष्करी, वायुतळावर हल्ले केले. (वृत्तसंस्था)

### कोणत्याही परिस्थितीत झुकणार नाही



इराणच्या संसदेच्या अध्यक्ष मोहम्मद गालिबाफ म्हणाले, दहशत आणि खंडणीचे युग संपले आहे. अमेरिकेने कराराचे उल्लंघन केल्याने आम्हाला प्रतिकार करावा लागला. लेबनॉनवर हल्ले सुरूच असून, त्यांनी दक्षिण इराणमध्ये अनेक हल्ले केले. आम्ही कोणत्याही परिस्थितीत अमेरिकेसमोर झुकणार नाही.

### यापुढे वाटाघाटी नाही



तुर्कीची राजधानी अंकारा येथे आयोजित नाटो शिखर परिषदेदरम्यान पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, युद्ध संपवण्यासाठी इराणसोबत झालेला करार संपला आहे. ते खूप वाईट लोक आहेत. त्यांचे नेतृत्व विकृत मानसिकतेचे आहेत. त्यांच्याशी वाटाघाटी करणे म्हणजे केवळ वेळेचा अपव्यय आहे.




अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात दक्षिण इराणमधील अनेक इमारतींचे नुकसान झाले

# देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन १७ जुलैला धावणार

**नवी दिल्ली, ८ जुलै**
भारताच्या पहिल्या हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रेनच्या उद्घाटनाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. हरियाणातील जिंद-सोनिपत मार्गावर १७ जुलैला ही ट्रेन धावणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या ट्रेनला हिरवी झेंडी दाखविणार आहेत. विशेष म्हणजे हे ट्रेन धावताना प्रदूषण जवळपास शून्य असेल, असा दावा केला जात आहे.

या ट्रेनसाठी जिंदमध्ये एक विशेष हायड्रोजन साठवणूक आणि इंधन भरण्याची सुविधा विकसित करण्यात आली आहे. जीवाश्म इंधनाऐवजी हायड्रोजनचा वापर करून निर्माण होणाऱ्या इंधनावर ही ट्रेन धावणार आहे. भारतात वीजेवर चालणाऱ्या रेल्वेगाड्या हा प्रदूषण कमी करण्याचा एक चांगला मार्ग मानल्या जातो. परंतु त्यांच्या वापराचा एक तोटा असा आहे की, यासाठी तयार केली जाणारी वीज कोळसा (दुसरे जीवाश्म इंधन) वापरणाऱ्या वीज केंद्रांमधून निर्माण केली जाते. वीजेवर धावणाऱ्या रेल्वेगाड्या स्वतः थेट प्रदूषण करत नसल्या, तरी त्या पुरवत असलेली वीज जीवाश्म इंधनांपासून निर्माण केली जाते, ज्यामुळे कार्बन उत्सर्जनात भर पडते. यामुळे हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रेन्स पर्यावरणासाठी अधिक चांगल्या ठरतात. या ट्रेन्स केवळ कार्बन उत्सर्जन पूर्णपणे थांबवत नाहीत, तर पारंपरिक इंधनांपेक्षा अधिक स्वच्छ आणि अधिक ऊर्जा-कार्यक्षम असल्याचेही सिद्ध करतात.



रेल्वे मंत्रालयाने २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात हायड्रोजन ट्रेन प्रकल्पाच्या विकासासाठी २,८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही रक्कम संशोधन, रचना, चाचणी आणि आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वापरली जात आहे. भारतीय रेल्वेने 'हायड्रोजन फ्युएल सेल' बसविण्यासाठी १११.८३ कोटी रुपयांच्या एका प्रायोगिक प्रकल्पालाही मंजुरी दिली आहे. (वृत्तसंस्था)

**अशी आहे पहिली 'हायड्रोजन ट्रेन'**

**मार्ग :** जिंद-सोनिपत
**अंतर :** सुमारे ९० किमी
**प्रारंभिक चाचणी वेग :** ७५ किमी/तास
**स्थानके :** एकूण सहा
**किमान भाडे :** पाच रुपये
**कमाल भाडे :** २५ रुपये
**अंदाजित प्रवासाचा वेळ :** सुमारे एक तास
**शिफारस केलेला कमाल वेग :** ११० ते १४० किमी/तास
**क्षमता :** सुमारे २५०० प्रवासी

## महत्त्वाचे

### शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे अटकेत

**मुंबई :** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात महिला डॉक्टर, नर्स आणि कर्मचाऱ्यांना मारहाण करण्याच्या आरोपात पोलिसांनी बुधवारी शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्यासह चौघांना अटक केली. या प्रकरणी टिकेचा भडीमार होताच आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी आंदोलन सुरू केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

म्हात्रे यांनी दोन डॉक्टर, दोन नर्स आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याच्या प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटले. डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात घडलेल्या या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिसांनी आधी तिघांना अटक केली. मात्र, विरोधकांनी संताप व्यक्त केल्यानंतर म्हात्रे यांनाही विष्णुनगर पोलिसांकडून अटक करण्यात आली.

### 'त्या' आरोपींकडे बनावट दान पावत्या

**लखनौ :** अयोध्या श्रीराम मंदिरासाठी दान करण्यात आलेल्या रकमेच्या अपहार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून बनावट दान पावत्या जप्त करण्यात आल्या. या पावत्या कोणी आणि कोठे छापल्या याचा तपास पोलिस करत आहेत. अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा आणि करुणेश पांडे यांना न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. या पावत्यांचा वापर फसवणुकीसाठी केल्याचा संशय आहे.

# १० नवीन शासकीय नर्सिंग महाविद्यालयांची स्थापना

## चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, गडचिरोलीचा समावेश

**मुंबई, ८ जुलै**

ज्यातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी आणि प्रशिक्षित परिचारिकांचे मनुष्यबळ वाढवण्यासाठी राज्यात १० नवीन शासकीय परिचर्या पदवी महाविद्यालये स्थापन करण्यास राज्य सरकारने अधिकृत मंजुरी




दिली आहे. यात विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली चार जिल्ह्यात महाविद्यालय उभारले जाणार आहे.

२१ जून २०२६ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली होती, ज्यावर आता अंमलबजावणीची मोहर उमटली आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमता असलेली ही १० नवीन शासकीय नर्सिंग महाविद्यालये चंद्रपूर, सिंधुदुर्ग, यवतमाळ, अलिबाग (रायगड), रत्नागिरी, अमरावती, धाराशीव, गडचिरोली, पालघर आणि अहिल्यानगर या १० जिल्ह्यांमध्ये सुरू केली जाणार आहेत. या नवीन महाविद्यालयांच्या स्थापनेमुळे राज्यात दरवर्षी अतिरिक्त १ हजार नर्सिंग पदवीधरांचे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार होणार असून, ग्रामीण आणि दुर्गम भागातील आरोग्य व्यवस्थेला याचा मोठा फायदा होणार आहे. या १० नवीन संस्थांच्या अनावर्ती खर्चासाठी प्रति संस्था ३३.४८ कोटी रुपयांनुसार एकूण ३३४.८० कोटी रुपयांच्या निधीला आणि खर्चाला शासनाने मान्यता दिली आहे.

यापैकी यवतमाळ, चंद्रपूर आणि सिंधुदुर्ग या ३ महाविद्यालयांना केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत प्रत्येकी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला जाणार आहे. या संपूर्ण पायाभूत सुविधांमध्ये अध्यापन विभागासह अत्याधुनिक प्रयोगशाळा, संगणक कक्ष, ग्रंथालय आणि भारतीय परिचर्या परिषदेच्या निकषांनुसार विद्यार्थ्यांसाठी भव्य वसतिगृह इमारतींचे बांधकाम केले जाणार आहे.

उच्चस्तरीय सचिव समितीच्या मंजुरीने प्रत्येक नवीन महाविद्यालयासाठी वर्ग १ ते वर्ग ४ अंतर्गत एकूण ८६ पदे निर्माण केली जाणार आहेत, ज्यामध्ये प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, ट्युटर, ग्रंथपाल आणि इतर प्रशासकीय व कंत्राटी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. (तभा वृत्तसेवा)



# सीमाप्रश्नी आरपारच्या लढाईसाठी महाराष्ट्र सज्ज

## शरद पवारांच्या अनुभवाची ढाल; फडणवीस सरकारची आक्रमक चाल

**मुंबई, ८ जुलै**

महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यात गेल्या अनेक दशकांपासून धुमसत असलेल्या सीमावादाच्या लढ्याने आता एक अत्यंत निर्णायक टप्पा गाठला आहे. सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या आगामी महत्त्वपूर्ण सुनावणीसाठी राज्य सरकारने कंबर कसली असून, कायदेशीर लढाईची धार अधिक तीव्र केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत या प्रश्नावर सखोल मंथन करण्यात आले. विशेष म्हणजे, या आरपारच्या लढाईत राज्याची बाजू भक्कम करण्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रदीर्घ अनुभवाची ढाल वापरण्याचा मोठा आणि रणनीतिक निर्णय घेण्यात आला आहे.

सीमाभागातील मराठी माणसाच्या हक्कासाठी झालेल्या अनेक आंदोलनांचे शरद पवार हे प्रत्यक्ष साक्षीदार आहेत. या संवेदनशील प्रश्नातील बारकावे आणि इतिहासाची त्यांना असलेली सखोल जाण सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राची बाजू मांडताना अत्यंत कळीची ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांसारख्या दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या उच्चस्तरीय बैठकीत न्यायालयात सादर करायचे भक्कम पुरावे आणि युक्तिवादाची सविस्तर रूपरेषा निश्चित करण्यात आली. तब्बल ३४ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर शरद पवार यांनी नुकतीच विधिमंडळात लावलेली हजेरी राजकीय वर्तुळात नवचैतन्य निर्माण करणारी ठरली असतानाच, आता त्यांचा सीमाप्रश्नातील सक्रिय सहभाग राज्याच्या लढ्याला मोठी ताकद देणारा ठरला आहे.

१ नोव्हेंबर १९५६ रोजी देशात भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना झाली आणि बेळगाव, निपाणी, कारवार, बिदर, भालकी यांसारख्या अस्सल मराठी भाषिक प्रदेशांसह तब्बल ८६५ गावे कर्नाटकच्या घशात घातली गेली. हा ऐतिहासिक अन्याय महाराष्ट्र कधीही विसरलेला नाही. भौगोलिक सलगता आणि बहुसंख्य मराठी भाषिक हा महाराष्ट्राच्या दाव्याचा मुख्य आणि भक्कम पाया राहिला आहे. (तभा वृत्तसेवा)

### सर्वोच्च न्यायालयाकडे खिळल्या नजरा

मराठी भाषकांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध रस्त्यावर आणि न्यायालयात प्रखर लढा देणाऱ्या सीमाभागातील लाखो मराठी बांधवांच्या नजरा आता सर्वोच्च न्यायालयातील आगामी सुनावणीकडे खिळल्या आहेत. राज्य सरकारने आखलेली ही नवी आक्रमक रणनीती आणि सर्वांनी मिळून बांधलेली एकजुटीची वज्रमूठ सीमाभागातील मराठी जनतेला न्याय मिळवून देईल, अशी दाट आशा आता निर्माण झाली आहे.

### १६ ऑगस्टपासून व्यावहारिक मराठी बंधनकारक

राज्यातील व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांना आता व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे बंधनकारक करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये सुधारणा करून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, १६ ऑगस्ट २०२६ पासून त्याची अंमलबजावणी केली जाणार असल्याची माहिती, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधिमंडळात निवेदनाद्वारे दिली.मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, मराठी ही कोणालाही दूर करणारी नव्हे, तर माणसाला माणसाशी जोडणारी भाषा आहे. महाराष्ट्राने रोजगाराच्या शोधात देशाच्या विविध भागांतून येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे नेहमीच स्वागत केले आहे. मात्र, राज्यातील जनतेशी प्रभावी संवाद साधण्यासाठी व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे ही केवळ कायदेशीर अट नसून सामाजिक जबाबदारीदेखील आहे.

### विधानभवनात 'व्हिबी-जीरामजी' कायद्यावर कार्यशाळा संपन्न

'विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) २०२६' म्हणजेच 'व्हिबी - जीरामजी' योजनेत ग्रामीण भागाच्या उत्थानाची आणि देशातील लाखो कुटुंबांना थेट प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्याची प्रचंड क्षमता असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

'विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) २०२६' म्हणजेच 'व्हिबी - जीरामजी' कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन करणारी एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा आज विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात पार पडली. यात्प्रसंगी राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी, विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, आमदार तथा रोजगार हमी योजना समिती प्रमुख सुनील शेळके, केंद्रीय ग्रामविकास विभागाच्या सहसचिव रोहिणी भाजीभाकरे उपस्थित होते.

# ऑर्केस्ट्रातील अश्लीलतेला लागणार लगाम

### डान्सबार सुधारणा विधेयक मंजूर

**मुंबई, ८ जुलै**

हॉटेल, उपाहारगृहे आणि बारमधील ऑर्केस्ट्रा परवान्याच्या आड सुरू असलेल्या कथित अश्लील नृत्यांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे विधेयक विधान परिषदेत मंजूर केले. गृह राज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर यांनी मांडलेले 'महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे व बाररूममधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध व तेथे काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण (सुधारणा) विधेयक' मंजूर झाले. या सुधारणेमुळे ऑर्केस्ट्रा परवान्याच्या नावाखाली सुरू असलेल्या गैरप्रकारांवर कारवाईचा मार्ग अधिक सुलभ होणार असून, नियमांचे तीन वेळा उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

राज्य सरकारच्या मते, २०१६ मध्ये डान्सबारमधील अश्लील नृत्यांवर बंदी घालण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात आला होता. मात्र



त्यानंतर अनेक बारचालकांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३३ अंतर्गत मिळणाऱ्या 'लाइव्ह ऑर्केस्ट्रा' परवान्याचा आधार घेत अश्लील नृत्यांचे कार्यक्रम सुरू ठेवल्याचे सरकारच्या निदर्शनास आले. या कायदेशीर पळवाटींमुळे पोलिसांना प्रभावी कारवाई करण्यात अनेक अडचणी येत होत्या. याच पार्श्वभूमीवर नव्या सुधारणेनुसार हॉटेल, उपाहारगृहे आणि बारमधील लाइव्ह म्युझिक व ऑर्केस्ट्रा कार्यक्रमांना महाराष्ट्र पोलिस अधिनियमातील परवाना व्यवस्थेतून वगळण्यात आले आहे. यापुढे अशा सर्व आस्थापनांना २०१६ च्या विशेष अधिनियमांतर्गतच परवाना घ्यावा लागणार असून, त्याच कायद्याअंतर्गत तपास, दंडात्मक कारवाई आणि फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा मार्ग खुला झाला आहे. (तभा वृत्तसेवा)

# विदर्भपुत्र सुरेश हावरे सीईओ निवड समितीचे सदस्य

### श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासकडून नियुक्ती

**पश्रोट, ८ जुलै**

येथील भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते स्व. दादासाहेब हावरे याचे चिरंजीव, साईबाबा संस्थान शिर्डीचे माजी अध्यक्ष, अणुशास्त्रज्ञ तथा प्रसिद्ध उद्योजक आणि अमरनाथ श्राईन बोर्डचे संचालक विदर्भपुत्र डॉ. सुरेश हावरे यांची श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासने मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) निवड समितीच्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे.

अयोध्येतील श्रीराम मंदिराचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी न्यासने मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सीईओ निवडण्यासाठी न्यासने तीन सदस्यीय समिती स्थापन केली असून त्यात डॉ. सुरेश हावरे यांचा समावेश आहे. सुरेश हावरे हे श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डीचे दहा वर्षे अध्यक्ष राहिले आहेत. त्यांना मंदिर व्यवस्थापनाचा मोठा व यशस्वी अनुभव आहे. ते मूळचे एक प्रसिद्ध उद्योजक आणि अणुशास्त्रज्ञ आहेत. तीन सदस्यांच्या समितीमध्ये निवृत्त



न्यायमूर्ती प्रदीप कोहली, निवृत्त लेफ्टनंट जनरल विष्णुकांत चतुर्वेदी आणि महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील पश्रोट येथील सुरेश हावरे यांचा समावेश आहे. ही समिती सीईओ पदाच्या निवडीची संपूर्ण प्रक्रिया करेल. समितीची पहिली बैठक २२ जुलैला होणार आहे. डॉ. सुरेश हावरे यांनी साईबाबा संस्थान अध्यक्षीय कार्यकाळात शिर्डीत विविध उपक्रम राबविले आहेत. मंदिराचे व्यवस्थापन व योग्य मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रम तयार करण्याची कल्पना त्यांनी मांडली आहे. या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. या निवडीबद्दल पश्रोटसह जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. हावरे यांचे वडील व तत्कालीन भाजपा नेते स्व. दादासाहेब हावरे यांचा डिसेंबर १९९२ रोजी यांच्यासोबत जमलेल्या लाखो कारसेवकांमध्ये समावेश होता. त्यांच्याच चिरंजीवावर श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचा सीईओ निवडण्याची जबाबदारी आली आहे. (तभा वृत्तसेवा)



राजधानी दिल्लीतील रोहिणी परिसरात पावसाच्या तडाख्याने एक चार मजली इमारत कोसळली. या घटनेनंतर एनडीआरएफ, अग्निशमन विभागाच्या पथकाने बचावकार्य सुरू केले. आतापर्यंत दोन मृतदेह बाहेर काढण्यात आले असून, ढिगाऱ्याखाली अडकलेल्या इतर पाच जणांचा शोध सुरू आहे

# मोशी कचरा डेपो दुर्घटनेत अडकलेल्या १२ पैकी सहा जणांची सुटका

**पिंपरी, ८ जुलै**

मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या इमारतीवर बुधवारी ८ जुलै रोजी कचऱ्याचा ढीग कोसळल्याने या ठिकाणी अडकलेल्या १२ जणांपैकी सहा जणांची सुखरूप सुटका करण्यात प्रशासनाला यश आले. रात्री उशीरापर्यंत सुरू असलेल्या बचाव मोहिमेत अग्निशमन दल, एनडीआरएफचे जवान यांनी शर्थीचे प्रयत्न करून कर्मचाऱ्यांची सुटका केली. सतत पडणाऱ्या पावसामुळे कचऱ्याचा ढिगारा जमिनीवर आला. या ठिकाणी असणाऱ्या इमारतीवर हा ढीग कोसळल्याने त्याच्या वजनाने इमारतीचा पाया ढासळला आणि इमारत देखील कोसळली. दीडच्या सुमारास ही घटना घडल्यानंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले. महापौर रवी लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे यांनी देखील येथील परिस्थितीचा आढावा घेतला. पोलिस आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनीच या ठिकाणी धाव घेतली.

इमारतीवरील स्लॅब तोडून एनडी आरएफ आणि भारतीय सैन्य दलाच्या जवानांना आत सोडण्यात आले. त्यांनी सहा जणांना सुखरूप बाहेर काढले. उरलेले ६ ते १० जण सुरक्षित असून त्यांनी आवाजाला प्रतिसाद दिल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### प्रबोवो सुबियांतो यांची फसवणूक

**वॉशिंग्टन, ८ जुलै**

अमेरिकेत फसवणुकीच्या प्रकरणांचा सामना करत असलेले भारतीय वंशाचे व्यावसायिक गौरव श्रीवास्तव यांच्यावर आता इंडोनेशियामध्येही मोठ्या फसवणुकीचा आरोप लावण्यात आला आहे. स्वतःला सीआयए एजंट असल्याचे सांगून राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो (तेव्हाचे संरक्षण मंत्री) यांचा विश्वास जिंकला आणि संरक्षण करारांच्या नावाखाली ४२५ कोटी रुपयांचे बनावट कर्ज मंजूर करून घेतल्याची माहिती अमेरिकन तपास यंत्रणांच्या तपासात समोर आली. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्रासह दहा राज्यांत एनआयएचे छापे

## दहशतवादी संघटनांशी संबंधित सदस्य लक्ष्य, २० ठिकाणी शोधमोहीम

**नवी दिल्ली, ८ जुलै**

तरुणांना समाज माध्यमावरून दहशतवादी संघटनेशी जोडण्यासाठी कार्यरत असलेल्या इस्लामी कट्टरवाद्यांच्या १० राज्यांतील २० ठिकाणांवर राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) बुधवारी छापे टाकले. इसिस आणि अल कायदा यांसारख्या दहशतवादी संघटनांच्या विचारधारेचा प्रचार करण्यासाठी देशभरातील विविध ठिकाणी त्यांचे प्रयत्न सुरू होते. सरकारविरुद्ध हिंसक जिहाद पुकारून देशाला इस्लामिक राष्ट्रात रूपांतरित करणे हा यामागील उद्देश होता अशी माहिती तपासात समोर आली.

एनआयएच्या पथकांनी आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, महाराष्ट्र,




उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, राजस्थान, गुजरात आणि दिल्ली येथील २० ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. या कालावधीत अनेक डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली. कट्टरतावादाच्या कटाबद्दल अधिक धागेदोरे शोधण्यासाठी या उपकरणांची न्यायवैद्यक तपासणी केली जाईल. या प्रकरणात आतापर्यंत अकरा आरोपी आणि एका अल्पवयीन मुलाला अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे एनआयएने बुधवारी १० राज्यात छापे टाकल्याची माहिती एका एनआयए अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली.

आंध्र प्रदेश पोलिसांनी मार्च महिन्यात मुख्य आरोपी रहमतुल्ला शरीफ मोहम्मद याच्या घरावर छापा टाकल्यानंतर गुन्हा दाखल केला. या कारवाईत त्याच्या घरातून बंदी घातलेली दहशतवादी संघटना 'अल-कायदा इन द इंडियन सबकॉन्टिनेंट' आणि इसिसशी संबंधित आक्षेपार्ह साहित्य सापडले होते. त्यानंतर संबंधित तपास एनआयएकडे सोपवण्यात आला. एनआयएने यात्प्रकरणात ११ आरोपींना ताब्यात घेऊन तपास सुरू केला. (वृत्तसंस्था)

### जिहादी विचारसरणीचा प्रसार

याप्रकरणातील आरोपींनी देशात अस्थिरता निर्माण करण्याचा कट आखला. अटक केलेले आरोपी आणि त्यांचे साथीदार हिंसक जिहादी मजकूर आणि चुकीच्या माहितीच्या माध्यमातून देशभरातील तरुणांना कट्टरतावादी बनवण्यात गुंतले होते. जिहादी विचारसरणीचा प्रसार करण्यासाठी आणि भारतविरोधी कट रचण्यासाठी ते परदेशात असलेल्या त्यांच्या सूत्रधारांच्या संपर्कात होते.

### मानवी तस्करी प्रकरणात कारवाई

एनआयएने कंबोडियाशी संबंधित मानवी तस्करी आणि सायबर गुलामगिरी प्रकरणाच्या संदर्भात तीन राज्यांतील सहा वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. तपास पथकाने या छाप्यांदरम्यान स्मार्टफोन, लॅपटॉप, विविध डिजिटल उपकरणे, अनेक महत्त्वाची कागदपत्रे आणि इतर साहित्य जप्त केले. बिहारमधील गोपालगंज, सिवान, सारण आणि पूर्व चंपारण जिल्ह्यांमध्ये, तसेच उत्तर प्रदेश आणि दिल्लीमध्ये प्रत्येकी एका ठिकाणी शोधमोहीम राबवली.

### बारुईपूर प्रकरणातील आरोपीचा खात्मा

**कोलकाता, ८ जुलै**

पश्चिम बंगालमधील बारुईपूर येथे ११ वर्षांच्या मुलीवर बलात्कार आणि तिची हत्या केल्याप्रकरणी मुख्य आरोपींपैकी एकाचा बुधवारी पहाटे झालेल्या चकमकीत पोलिसांनी खात्मा केला. गुन्ह्याचे दृश्य उलगडण्यासाठी त्याला घटनास्थळी नेले असता, त्याने पोलिसांच्या हातातील बंदूक हिसकावून घेतली आणि पोलिसांच्या ताब्यातून पळून जाण्याचा प्रयत्न केला, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

मे महिन्यात राज्यात भाजपा सरकार आल्यानंतर ही अशाप्रकारची पहिलीच पोलिस कारवाई आहे. या गुन्ह्याविरोधात लोकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असताना ही कारवाई करण्यात आली आहे. या गुन्ह्याच्या विरोधात हिंसक निदर्शने झाली होती तसेच पोलिसांवर प्रचंड दबाव निर्माण झाला होता. या प्रकरणातील प्रभास मंडल हा अटक करण्यात आलेला पहिला आरोपी होता. (वृत्तसंस्था)

# चंपत राय यांना विश्वासू माणसांनीच दिला धोका

### स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांचे प्रतिपादन

**अयोध्या, ८ जुलै**

राम मंदिरासाठी मिळालेल्या देणग्यांमधील कथित अपहाराबाबत निर्माण झालेल्या वादाच्या पृष्ठभूमीवर श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी ट्रस्टचे माजी सरचिटणीस चंपत राय यांचा बचाव केला. ज्या लोकांवर त्यांनी विश्वास ठेवला, त्यांनीच विश्वासघात केला, असे स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी म्हटले.

विश्वस्तांनी कोणताही विश्वासघात केला नाही. उलट चंपत राय यांचीच फसवणूक झाली आहे. आम्ही त्यांना अत्यंत सज्जन व्यक्ती मानतो. परंतु, त्यांनी चुकीच्या लोकांवर विश्वास ठेवला आणि अनेक वर्षे आपल्यासोबत ठेवले, त्या लोकांनीच ट्रस्टची फसवणूक केली. तरीही देणगी व्यवस्थापन प्रक्रियेच्या देखरेखीत राय आणि मिश्रा यांच्याकडून चुका झाल्याचे गिरी यांनी मान्य केले.

इतक्या दीर्घकाळापर्यंत त्यांनी निष्काळजीपणा आणि सतर्कतेचा अभाव दर्शवला हे अगदी बरोबर आहे. असे घडायला नको होते, असे गिरी म्हणाले. राय यांचा राजीनामा स्वीकारतानाही, राम मंदिर आंदोलन आणि अयोध्येतील मंदिर उभारणीमध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाचे ट्रस्टने एकमताने कौतुक केले.

राय यांची प्रतिमा निष्कलंक राहिली आहे, असे गिरी यांनी माजी सरचिटणीसांची पाठराखण करताना सांगितले. राम मंदिराच्या कार्यासाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या चंपत राय यांच्याबाबत सांगितले की, त्यांची एकमेव चूक म्हणजे त्यांनी चुकीच्या व्यक्तींवर विश्वास ठेवला. चौकशी होईपर्यंत आणि दोषींना शिक्षा होईपर्यंत सरचिटणीस पदावर कायम राहणे योग्य ठरणार नाही, असे वाटल्यानेच राय यांनी स्वेच्छेने राजीनामा दिला, असे गिरीयांनी सांगितले.

ट्रस्टने मंदिरात देणगीस्वरूपात मिळालेल्या आणि यापूर्वी चोरीला गेल्याचा आरोप असलेल्या अनेक मौल्यवान वस्तू प्रसारमाध्यमांसमोर प्रदर्शित केल्या, असे गिरी यांनी सांगितले. २,८०० वस्तूंची नोंद ठेवली गेली आहे. रामचरितमानसची हस्तलिखित प्रत आणि देवतेला अर्पण केलेला एक सुंदर हार यासारख्या ज्या पाच वस्तूंची चर्चा होत होती, त्या प्रसारमाध्यमांसमोर सादर करण्यात आल्या. तुम्ही त्या नक्कीच पाहिल्या असतील. अशा सर्व वस्तूंची नोंद उपलब्ध आहे आणि अधिकृत व्यक्ती त्यांची तपासणी करू शकतात, असे गिरी म्हणाले. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विदेशी गुंतवणूकदारांचा भारतावर मोठा विश्वास

**। युनोचा अहवाल । वर्षभरात ४४ टक्क्यांनी वाढ । दोन स्थानांची झेप**

**संयुक्त राष्ट्र, ८ जुलै**

केंद्र सरकारने राबवलेल्या योजना आणि देशाची विकासाच्या दिशेने सुरू असलेल्या वाटचालीच्या पृष्ठभूमीवर परदेशी गुंतवणूकदारांनी भारतावर विश्वास दाखवला आहे. गेल्या वर्षभरात भारतात परदेशी गुंतवणुकीत ४४ टक्क्यांनी वाढ होऊन ती ३८ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. परदेशी गुंतवणुकीत भारताने दोन स्थानांची झेप घेत जगात ११ व्या स्थानावर पोहोचल्याची माहिती एका अहवालातून समोर आली.

भारत २०२५ मध्ये थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) स्वीकारणारा ११ वा सर्वात मोठा देश बनला आहे. देशात परदेशी गुंतवणुकीत ४४ टक्क्यांनी वाढून ३८.८९ अब्ज डॉलर्सवर पोहोचली, तर भारतीय कंपन्यांची परकीय गुंतवणूकही विक्रमी पातळीवर पोहोचल्याची माहिती संयुक्त राष्ट्र व्यापार आणि विकास परिषदेने जारी केलेल्या जागतिक गुंतवणूक अहवालातून समोर आली. उत्पादन क्षेत्राचे आधुनिकीकरण आणि सेवा क्षेत्राला प्रोत्साहन यांसारख्या सरकारी धोरणांमुळे, भारताने २०२५ मध्ये दोन स्थानांची झेप घेत थेट परकीय गुंतवणूक स्वीकारणारा ११ वा सर्वात मोठा देश बनण्याचा मान मिळवला आहे. गेल्या वर्षी देशात ३८.८९ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक आली, जी २०२४ मधील २७.०९ अब्ज डॉलर्सच्या तुलनेत ४४ टक्क्यांनी अधिक आहे. २०२४ मध्ये, भारत परदेशी गुंतवणुकीत १३ व्या क्रमांकावर होता. (वृत्तसंस्था)

### आशियाई देशांत अव्वल स्थान




गुंतवणुकीमुळे भारताला आपले स्थान पुन्हा मिळविण्यात मदत झाली आहे, जे दोन वर्षांपूर्वी जगातील पहिल्या १० देशांच्या यादीतून बाहेर पडल्यानंतर भारताने गमावले होते. भारतातील ही वाढ विकसनशील देशांमध्ये दिसून येणाऱ्या मंद प्रवृत्तीच्या विरुद्ध आहे, जिथे थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ केवळ दोन टक्क्यांनी वाढला. आशियाई विकसनशील अर्थव्यवस्थांमधील परकीय गुंतवणूक तीन टक्क्यांनी वाढली असून, भारत आशियाई देशात अव्वलस्थानी आहे.




### जागतिक थेट परकीय गुंतवणुकीत ६ टक्के वाढ

- २०२५ मध्ये जागतिक थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ ६ टक्क्यांनी वाढून १.६ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचला
- पहिल्या २० देशांना एकूण जागतिक थेट परकीय गुंतवणुकीपैकी जवळपास ८० टक्के वाटा मिळाला.
- विकसित अर्थव्यवस्थांमधील थेट परकीय गुंतवणूक ११ टक्क्यांनी वाढून ७२३ अब्ज डॉलर्सवर पोहोचली
- विकसनशील देशांमधील गुंतवणूक ९०१ अब्ज डॉलर्स इतकी होती

### डेटा सेंटरला पसंती



भारतात एकूण थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढला असला तरी, प्रकल्पस्तरीय निर्देशक गुंतवणुकीत अल्प प्रतिसाद मिळाला आहे. यामुळे ग्रीनफील्ड गुंतवणुकीच्या मूल्यात २०२४ मधील १११.१४ अब्ज डॉलर्सवरून २०२५ मध्ये ७४.१२ अब्ज डॉलपर्यंत घट झाली. अमेरिकन कंपनी अल्फाबेट इंक.ने भारतात डेटा सेंटरसाठी १४.५ अब्ज डॉलर्स गुंवणुकीची घोषणा करून जागतिक यादीत अव्वल स्थान पटकावले.

### भारतीय कंपन्यांचा परदेशात डंका

भारतीय कंपन्यांनी २०२५ मध्ये परदेशात ३५.६६ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली, जी २०२४ मधील २४.२६ अब्ज डॉलर्सपेक्षा ४७ टक्के अधिक आहे. यामुळे गुंतवणुकीच्या बाबतीत जगातील अव्वल देशांतर्गत अर्थव्यवस्थांच्या यादीत भारताला दोन स्थानांनी झेप घेऊन १८ वे स्थान मिळण्यास मदत झाली. भारतीय कंपन्यांनी परदेशात घोषित केलेल्या ग्रीनफील्ड गुंतवणुकीचे मूल्य देखील ४१ टक्क्यांनी वाढून २५.२९ अब्ज डॉलर्स झाले आहे.

## ८० लाखांचे हेरॉईन जप्त; पाच जणांना अटक

**अलीगड, ८ जुलै**

एका महिलेसह मादक पदार्थांची आंतर-जिल्हा तस्करी करणाऱ्या टोळीतील पाच संशयितांना पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून ८० लाख रुपयांहून अधिक किमतीचे हेरॉईन जप्त करण्यात आले असल्याची माहिती पोलिसांनी बुधवारी दिली. शहरातील पोलिस आणि मादकपदार्थ विरोधी विशेष पथक यांनी संयुक्तपणे राबविलेल्या मोहिमेदरम्यान मंगळवारी सायंकाळी रोरावार पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला आणि शहरात प्रवेश करणाऱ्या या आरोपींना अडवले. स्थानिक संपर्कातील व्यक्तीला मादकपदार्थांचा साठा पोहोचविण्यापूर्वीच या पाच जणांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले. आरोपींकडून ८६४ ग्रॅम हेरॉईन आणि ४.५ लाख रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आल्याचे सर्कल ऑफिसर धनंजय सिंह यांनी सांगितले. या पाचही जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून मादकपदार्थांच्या तस्करीच्या या आंतर-जिल्हा जाळ्यातील इतर सदस्यांची ओळख पटवण्यासाठी त्यांची चौकशी केली जात आहे. (वृत्तसंस्था)



# तस्करी रोखण्यासाठी ब्रिक्स देश एकवटले

**आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारीचा मुकाबला करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार**




ब्रिक्स परिषदेच्या बैठकीत सहभागी झालेल्या सदस्य देशांचे प्रतिनिधी

**गुवाहाटी, ८ जुलै**

अमली पदार्थांच्या तस्करीचे बदलणारे स्वरूप, सिंथेटिक ड्रग्सचा वाढता प्रसार, नवीन सायकोॲक्टिव्ह पदार्थ, पूर्वसूचक रसायनांचा गैरवापर, उदयोन्मुख तंत्रज्ञान, व्हर्च्युअल मालमत्तेचा गैरवापर आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्कद्वारे सागरी मार्ग व डिजिटल प्लॅटफॉर्मचा होणारा गैरवापर यावर ब्रिक्स देशांनी चिंता व्यक्त केली आहे. मादकपदार्थ तस्करी रोखण्यासाठी माहितीची देवाघेवाण करण्यावर ब्रिक्स देशांनी सहमती दर्शवली.

गुवाहाटी येथे झालेल्या ब्रिक्स देशांच्या अमली पदार्थ विरोधी संस्थांच्या प्रमुखांच्या दोन दिवसीय बैठकीत, भारताने आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सिंडिकेट्सचा मुकाबला करण्यासाठी जलद, विश्वसनीय आणि अखंड रिअल-टाइम गुप्त माहितीच्या देवाणघेवाणीवर आधारित भागीदारीचे आवाहन केले. ब्रिक्स देशांनी अवैध अमली पदार्थांची तस्करी आणि संबंधित आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारीचा मुकाबला करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. यावेळी सदस्य देशांनी बैठकीत चर्चा झालेल्या मुद्द्यांवर संयुक्त घोषणापत्र जारी केले. त्यात म्हटले की, राष्ट्रीय कायदे आणि आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्यांनुसार, गुप्तचर माहिती आणि सर्वोत्तम पद्धतींची वेळेवर देवाणघेवाण वाढवण्याच्या गरजेवर भर देण्यात आला. अमली पदार्थांच्या विरोधात नवीन तंत्रज्ञान, डिजिटल साधनांवर भर दिला जात आहे. (वृत्तसंस्था)

### या देशांनी सहभाग घेतला

या बैठकीत ब्राझील, चीन, इथिओपिया, भारत, इंडोनेशिया, इराण, रशिया आणि संयुक्त अरब अमिराती या ब्रिक्स देशांच्या अमली पदार्थ विरोधी संस्थांच्या प्रमुखांनी बैठकीत सहभाग घेतला.

### अमेरिकेने रद्द केला इराणी तेलाच्या विक्रीचा परवाना

**दुबई :** इराणच्या तेलाच्या विक्रीला अधिकृत करणारा परवाना अमेरिकेने रद्द केला आहे, असे ट्रेझरी विभागाने मंगळवारी सांगितले. दोन्ही देशांमधील युद्ध संपवण्यासाठी झालेल्या अंतरिम कराराचा भाग म्हणून इराणच्या तेलावरील निर्बंध शिथिल करून ट्रेझरी विभागाने गेल्या महिन्यात हा ६० दिवसांचा परवाना जारी केला होता.

# लॉरेन्स बिश्नोई टोळीला एफबीआयचा दणका

**अमेरिका-कॅनडासह अनेक देशांमध्ये ५० ठिकाणी छापे**

**वॉशिंग्टन, ८ जुलै**

अमेरिकेची तपास यंत्रणा एफबीआयने पहिल्यांदाच कुख्यात गुन्हेगार लॉरेन्स बिश्नोई, गोल्डी ब्रार आणि जग्गू भगवानपुरिया यांच्या टोळीतील सदस्यांच्या ५० ठिकाणांवर छापे टाकले. अमेरिका, कॅनडा आणि युरोपमध्ये संयुक्त कारवाईदरम्यान भारताशी संबंधित गुन्हेगारांच्या २४ साथीदारांना अटक करण्यात आली, तर ३७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



लॉरेन्स आणि गोल्डी यांना खलिस्तान समर्थक हरदीप सिंग निज्जर हत्याकांडातील आरोपी बनवण्यात आले आहे. दोघांनी मिळून कट रचल्याचा आरोप आहे. आरोपींमध्ये रोहित गोदारा आणि इतर साथीदारांची नावेही समाविष्ट करण्यात आली. अमेरिकेच्या फेडरल न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करत एफबीआयने मंगळवारी छापे टाकले. एफबीआयच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, लॉरेन्स भारतातील तुरुंगात असतानाही आपली टोळी चालवतो आणि त्याचे साथीदार भारत, अमेरिका, कॅनडा तसेच युरोपमध्ये गुन्हेगारीत सक्रिय आहे. भारतीय सरकारकडे लॉरेन्स बिश्नोई, जग्गू भगवानपुरिया यांच्या प्रत्यार्पणाची मागणी केली जाईल. गोल्डी ब्रारवर ५० हजार डॉलर्सचे बक्षीस जाहीर केले आहे.

**मादकपदार्थ, शस्त्रे जप्त**

एफबीआयच्या कारवाईत हजारो किलो मादकपदार्थ आणि शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. यूएस फेडरल सरकार आणि लॉस एंजेलिसच्या जिल्हा ॲटर्नी जनरलच्या प्रतिनिधींनी सांगितले की, या संपूर्ण गुन्हेगारी संघटनेच्या नेटवर्कचे नेतृत्व भारतातील तुरुंगात असलेला लॉरेन्स करत आहे. उत्तर अमेरिकेत त्याची टोळी गोल्डी ब्रार चालवत होता. युरोपमध्ये सर्व काम रोहित गोदारा सांभाळत होता. (वृत्तसंस्था)



पंजाब पोलिसांनी पकडलेले आरोपी व शस्त्रसाठा

# पंजाबमध्ये उधळला बॉम्बस्फोटाचा कट

**तीन आरोपी अटकेत**

**सहा हॅण्ड ग्रेनेड, दारूगोळा जप्त**

**अमृतसर, ८ जुलै**

पंजाब पोलिसांच्या अमृतसर येथील राज्य विशेष कृती दलाने (स्टेट स्पेशल ऑपरेशन्स सेल) बॉम्बस्फोटाचा कट उधळत तीन आरोपींना अटक केली. त्यांच्या ताब्यातून बारा पिस्तूल आणि सहा हॅण्ड ग्रेनेड जप्त आणि दारूगोळा जप्त केला. या कारवाईनंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून त्यांनी याप्रकरणातील मुख्य आरोपींचा शोध सुरू केला आहे.


लोपोके पोलिस ठाण्याच्या परिसरात काही तरुण शस्त्रे आणि स्फोटकांसह उपस्थित असल्याची आणि त्यांची घातपाताची योजना असल्याची गोपनीय माहिती कृती दलाला मिळाली होती. त्यानंतर पथकाने एक विशेष मोहीम सुरू केली आणि रामतीर्थजवळ घेराव घातला. पोलिस पथकाला पाहताच आरोपींनी घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु सतर्क पोलिस अधिकाऱ्यांनी तिघांनाही जागीच पकडले. तिघेही आरोपी लोपोके पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कक्कर गावचे रहिवासी आहेत. शोधमोहिमेदरम्यान पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून १२ पिस्तूल आणि ६ हँड ग्रेनेड आणि दारूगोळा मिळाला. जप्त केलेली शस्त्रे आणि स्फोटकांची वैज्ञानिक तपासणीची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. (वृत्तसंस्था)



दक्षिण भारतातील सर्वच राज्यांमध्ये पावसाने धुमाकूळ घातल्याने फळभाज्या आणि अन्य पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. कर्नाटकातील चिकमंगलूरू येथे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्रीसाठी आणलेले शेकडो क्विंटल टोमॅटो पावसाने सडल्याने फेकून द्यावे लागले

## चित्रपट वार्ता

### 'टॉक्सिक'मधील पहिले गाणे, 'तबाही' प्रदर्शित



**मुंबई :** दिग्दर्शिका गीतू मोहनदास यांचा 'टॉक्सिक : अ फेअरी टेल फॉर ग्रोन-अप्स' हा चित्रपट २६ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी निर्मात्यांनी त्याचे पहिले गाणे 'तबाही' प्रदर्शित केले. या गाण्यात यश आणि कियारा अडवाणी मुख्य भूमिकेत आहेत. हे गाणे हिंदी, तमिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम भाषांमध्ये प्रदर्शित झाले आहे. विशाल मिश्रा यांनी गायले असून लेखन राज शेखर यांनी केले तर संगीत विशाल, बिटुपोन बोरुआ, कंदर्पा कलिता आणि त्रिहंगकू लहकर यांनी दिले आहे. प्रदर्शनाच्या तारखेत अनेक बदल झाल्यानंतर, 'टॉक्सिक' हा चित्रपट येत्या २६ ऑगस्ट रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. गीतू मोहनदास दिग्दर्शित या चित्रपटात कियारा अडवाणी आणि यश यांच्यासोबत हुमा कुरेशी, नयनतारा, रुक्मिणी वसंत आणि तारा सुतारिया यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

### 'वेलकम टू द जंगल'ची भरारी

**मुंबई :** अक्षय कुमार स्टार 'वेलकम टू द जंगल' या कॉमेडी चित्रपटाने प्रेक्षकांना खळखळून हसवले. केवळ विकेंड नाही तर



विकडेजमध्येही या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुरळा उडवला आहे. १० दिवसांत या चित्रपटाने ९० कोटींचा टप्पा पार केला असून अवघ्या १२ दिवसांत १२०.५५ कोटींचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले. हा चित्रपट १२५ कोटी रुपये बजेटमध्ये तयार झाला. १२ दिवसांत या चित्रपटाने ९६.४४ टक्के खर्च वसूल केला आहेत. दरम्यान, चित्रपटाला यशस्वी होण्यासाठी आणखी पाच कोटी कमावणे गरजेचे आहे. येत्या काही दिवसांत हा चित्रपट १५० कोटींचा टप्पा पार करेल, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### गरोदरपणात केले चित्रीकरण

**मुंबई :** अभिनेत्री दीपिका पदुकोणची एक नवीन जाहिरात समाजमाध्यमावर चर्चेत आहे. दीपिकाने एका हॉटेल चेनसाठी ही जाहिरात केली आहे; ज्यात तिचा बेबी बंप स्पष्ट दिसत आहे. ही जाहिरात दीपिकाने तेव्हा शूट केली होती जेव्हा ती चार महिन्यांची गर्भवती होती. जाहिरातीत दीपिका पदुकोण खूप स्टायलिश आणि वेगळ्या लूकमध्ये दिसत आहे. व्हिडीओमध्ये ती हॉटेलच्या वेगवेगळ्या भागांमध्ये फिरताना आणि नृत्य करताना दिसते आहे. या संपूर्ण जाहिरातीत तिचा प्रेग्नेंसी ग्लो स्पष्टपणे दिसतो आहे. रणवीर सिंग आणि दीपिका पदुकोण यांनी काही काळापूर्वीच इंस्टाग्रामवर एक जॉइंट पोस्ट शेअर करून दुसऱ्यांदा पालक बनल्याची माहिती दिली होती.



## ट्रेलर फूटपाथवर चढला; वडिलांसह तीन मुलांचा मृत्यू

**जयपूर, ८ जुलै**

भरधाव ट्रेलरने फूटपाथवर बसलेल्या एका कुटुंबातील पाच जणांना चिरडले. या अपघातात तीन मुलांसह वडिलांचा मृत्यू झाला तर आईचे दोन्ही पाय तुटले. हा अपघात इतका भीषण होता की, एका मुलाचे दोन तुकडे झाले. सर्वजण नाल्यात पडले. ही घटना मंगळवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास जयपूरमधील कमला नेहरूनगरात घडली. चंद्रप्रकाश व त्यांची मुले रमेश, दीपक व रतन रा. जैतपुरा, अशी मृतकांची नावे आहेत.

अपघाताला बळी पडलेले बागरी समाजाचे कुटुंब वैशाली नगरमध्ये भाड्याच्या घरात राहत होते. फुटपाथवर झाडू बनवून विकत होते. मंगळवारी सकाळी गावी जाण्यासाठी बसची वाट पाहत होते. यादरम्यान ट्रेलरने रेलिंग तोडून आई-वडील आणि तिन्ही मुलांना चिरडले. (वृत्तसंस्था)



# नर्मदेतून महाराष्ट्राला १० टीएमसी पाणी

**। २० वर्षांपासूनचा प्रलंबित प्रश्न सुटला**
**। मुख्यमंत्री फडणवीस यांची दिल्लीत बैठक**

**नवी दिल्ली, ८ जुलै**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत नर्मदा प्रकल्पाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आज सायंकाळी झालेल्या महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या चार राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या महत्वपूर्ण बैठकीत वीस वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटला असून महाराष्ट्राला दहा टीएमसी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या पाण्यापैकी पाच टीएमसी पाणी उकाई धरणातून उचलण्याबाबतही या बैठकीत अनुकूल निर्णय घेण्यात आला.

नवी दिल्लीत गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नर्मदा प्रकल्पाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या चारही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची महत्त्वाची बैठक झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांची या बैठकीस उपस्थिती होती.

देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींना या बैठकीत झालेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाची माहिती दिली. नर्मदा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यातून महाराष्ट्राला केवळ वीज मिळाली. मात्र राज्याच्या वाट्याचे १० टीएमसी पाणी मिळाले नव्हते. त्या दृष्टीने आजच्या बैठकीमध्ये महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. राज्यासाठी देय असलेल्या निधीसह इतरही अनेक प्रलंबित प्रश्नांबाबत सकारात्मक निर्णय झाले.

महाराष्ट्राला आता केवळ २७ कोटी देय असून उर्वरित देय रक्कम रद्द झालेली आहे. महाराष्ट्राच्या वाट्याचे १० टीएमसी पाण्यापैकी नर्मदा-तापी वळण योजनेत पाच टीएमसी आणि उकाई प्रकल्पातून पाच टीएमसी पाण्याची मागणी महाराष्ट्राने केली होती. त्याही संदर्भात आजच्या बैठकीत अनुकूल नर्णिय झाला. पावसाच्या कालावधीत म्हणजे उकाई धरणात पाणी असतानाच्या काळात हे पाणी उचलण्यास गुजरातने अनुकूलता दर्शवली. गृहमंत्री अमित शाह आणि जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी त्याला मान्यता दिली आहे. उकाई धरणातून पाणी उचलण्याबाबत महाराष्ट्र सरकारकडून सुव्यवस्थित आराखडा तयार करण्यात येत असून या पाण्याचा उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### कुसुम योजनेत महाराष्ट्राला अधिक निधी

केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत महाराष्ट्रातील अक्षय ऊर्जा क्षेत्रातील विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. केंद्र सरकारने कुसुम योजनेअंतर्गत महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक म्हणजेच एकूण निधीपैकी ५१ टक्के निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी केंद्रीय मंत्र्यांचे आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# आरटीओच्या भ्रष्टाचाराचे डोंगर

'आरटीओ' आणि 'भ्रष्टाचार' या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे वाटावे इतकी बेबंदशाही या विभागात दिसते. महाराष्ट्राच्या विविध भागांत लोक हे अनुभवत आहेत. शिवाय, नागपूर आणि विदर्भातील या परिवहन कार्यालयांतून समोर आलेले अवैध वसुलीचे रॅकेट, चोरीच्या तब्बल १५०० वाहनांची बेकायदेशीर नोंदणी आणि कोट्यवधी रुपयांच्या करचुकवेगिरीचे प्रकार केवळ धक्का देणारे नाही, तर संबंधित व्यवस्थेच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगणारे आहे. विरोधकांनी यासंदर्भात विधानसभेत पुराव्यांसह श्वेत फिती सादर केल्यानंतर याची गंभीरतेने दखल घेतली गेली. या कथित भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी 'एसआयटी' स्थापन करण्यात आली आहे. खरे तर, या निमित्ताने पुन्हा एकदा सर्वसामान्यांसमोर कायम उभा ठाकणारा जुनाच प्रश्न ऐरणीवर आला आहे. तो म्हणजे, हा विभाग नक्की जनतेच्या सेवेसाठी आहे, की अधिकारी आणि दलालांचे घर भरण्यासाठी आहे?

खरे तर, 'आरटीओ' विभाग भ्रष्टाचाराच्या शर्यतीत नेहमीच अग्रेसर राहिला आहे, या धाडसी विधानासाठी फार मोठ्या संशोधनाची गरज उरलेली नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वार्षिक अहवालांवर नजर टाकली, तरी महसूल आणि पोलिस खात्याच्या बरोबरीने किंबहुना अनेकदा त्यांच्याही पुढे या विभागाचे नाव येते. लाच घेण्यासोबतच स्वतःची कातडी वाचवण्यासाठी लाच देण्यातही हा विभाग पुढे असल्याचे जाणकार सांगतात. एका अभ्यासानुसार, सीमा तपासणी नाक्यांवर होणारी अवैध वसुली आणि वाहन नोंदणीतील त्रुटींमुळे राज्याच्या तिजोरीला दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा फटका बसतो. महाराष्ट्रात राहून, कोट्यवधींच्या आलिशान गाड्या मिरवायच्या, त्या दामटायच्या आणि कर चुकवण्यासाठी त्यांची नोंदणी मात्र दमण, दीव किंवा पुद्दुचेरीमध्ये करायची! हा भ्रष्ट खेळ आरटीओ अधिकाऱ्यांच्या अभयाशिवाय आणि आर्थिक तडजोडीशिवाय शक्य आहे का? १५-१५ वर्षे एकाच भागात ठाण मांडून बसलेले अधिकारी अवैध वसुलीचे साम्राज्य उभे करतात, तेव्हा एकूण यंत्रणा काय करीत असते असा प्रश्न सर्वसामान्यांनी विचारू नये का? काही लोक म्हणतात- परिवहन विभागाची सगळी यंत्रणा 'ऑनलाईन' केल्याने दलालांचा संसर्ग संपला आहे. आता सारा कारभार पारदर्शक झाला आहे. मुळात या केवळ वल्गना आहेत. सातत्याने पुढे येणाऱ्या या विभागातील अधिकारी व दलालांच्या भ्रष्ट आचरणातून ते स्पष्ट दिसते. 'डिजिटलायझेशन'च्या नावाखाली कागदावरची यंत्रणा तेवढी बदलली असेलही. पण इथे विविध पदांवर बसलेल्या माणसांची नियत बदललेली नाही. या विभागातून दलाल हद्दपार झाल्याचा दावा केला जातो, पण आज तीच दलाली 'स्मार्ट' बनून पुढे आली आहे. सामान्य माणसाला साध्या परवान्यासाठी किंवा वाहन पासिंगसाठी आजही आरटीओ कार्यालयांचे आणि त्या कार्यालयांसमोर थाटलेल्या दलालांच्या दुकानांचे खेटे घालावे लागतातच, हे वास्तव आहे. एक तर अजूनही सर्वसामान्य माणूस 'ऑनलाईन' अर्ज भरण्याइतपत 'टेक्नोसॅव्ही' झाला नाही आणि झाला असेल, तर नोंदणीची अधिकृत 'साईट' त्याला प्रतिसाद देत नाही! 'ऑनलाईन' यंत्रणेत गैरप्रकार होत नाही, हा अधिकाऱ्यांचा दावा, चोरीच्या १५०० गाड्यांची नोंदणी होत असताना कुठे जातो? कळस म्हणजे, जे काही बोटावर मोजता येईल इतके शिल्लक प्रामाणिक अधिकारी आहेत आणि ज्यांनी या अवैध रॅकेटला विरोध केला, त्यांच्या विरोधात 'ट्रान्सपोर्टर्स'मार्फत खोट्या तक्रारी दाखल केल्या जातात. त्यांना लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न होतो, हा विधानसभेत झालेला गंभीर आरोप प्रशासकीय दहशतवादाचा प्रकार आहे. अशा भ्रष्टाचारावर प्रभावी उपाय केल्याचा दावा वारंवार होतो. प्रत्येक घोटाळ्यानंतर चौकशी लागते. पण काहीच दिवसांत सारे काही थंड बस्त्यात जाते. पुन्हा कुठेतरी नवा भ्रष्टाचार, नवी 'ऑडिओ क्लिप' आणि नवे वसुलीचे अद्ययावत 'मॉडेल' समोर येते. आयपीएस अधिकारी प्रियांका ननावरे यांच्या नेतृत्वाखालील 'एसआयटी' आता या प्रकरणांची पाळेमुळे खणून काढणार आहे. उच्चस्तरीय चौकशीचे स्वागतच आहे. परंतु, महिनाभरात येणारा त्यांचा अहवाल नेहमीप्रमाणे धूळ खात पडला राहील की, कथित दोषींना थेट तुरुंगाची हवा दाखवण्यासाठी वापरला जाईल, यावर या यंत्रणेची पत ठरणार आहे. एकट्या नागपूर आणि विदर्भ क्षेत्रात गेल्या काही महिन्यांत झालेल्या ८ मोठ्या छाप्यांमध्ये २० पेक्षा जास्त आरटीओ अधिकारी आणि कर्मचारी लाच घेताना रंगेहात पकडले गेले आहेत. हा आकडा फक्त हिमनगाचे टोक आहे. अगदी ताजे उदाहरण बघायचे तर, जून २०२६ मध्ये नागपूर ग्रामीण आरटीओ अंतर्गत येणाऱ्या खुरसापार (महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमा) या तपासणी नाक्यावर 'एसीबी'ने छापा टाकला. त्यात, ज्या मोटार वाहन निरीक्षकाने आधी इतर अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचाराची तक्रार केली होती, तोच खाजगी दलालांमार्फत ट्रकचालकांकडून बेकायदेशीर वसुली करताना पकडला गेला! या छाप्यात घटनास्थळावरून सुमारे ४७,००० रुपयांची संशयास्पद रोख रक्कम जप्त करण्यात आली. बाकी किती पैसा कुठे गेला असेल कुणास ठावूक. अशी अनेक उदाहरणे महाराष्ट्र-तेलंगणा (तत्कालीन आंध्रप्रदेश) सीमेवरील लक्कडकोट नाक्यावरही उघडकीस आली आहेत. कारवाया अनेक झाल्यात. पण एकाही दोषी मोटार वाहन निरीक्षकाने पूर्ण शिक्षा भोगली, असे ऐकिवात नाही. इतके खोलवर रुजले आहे हे रॅकेट! किस्से येथे संपत नाहीत. भ्रष्ट अधिकाऱ्यांचा खरा मलिदा 'लक्झरी' गाड्यांच्या करचुकवेगिरीत आहे. महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावणाऱ्या कोट्यवधींच्या आलिशान गाड्यांवर दमण-दीव आणि पुद्दुचेरीच्या 'नंबर प्लेट्स' झळकत असतात. महाराष्ट्रातील २० टक्के रस्ता कर चुकवून बोगस कागदपत्रांच्या आधारे अवघ्या अडीच टक्क्यांत या गाड्यांची नोंदणी होते. एका २ कोटींच्या गाडीवर थेट ३० ते ३५ लाख रुपयांचा कर बुडवला जातो. या दरोडेखोरीने राज्याचा हजारो कोटींचा महसूल दरवर्षी बुडतो आणि जनतेच्या या पैशांवर अधिकारी स्वतःची घरे भरतात. दलालांचीही चांदी होते. परिवहन विभागाचा सगळा कारभार 'सारथी' आणि 'वाहन' या ऑनलाईन प्रणालीवर आणल्याचा ढोल तेवढा पिटला जातो. दलाल संपल्याचा दावाही केला जातो. खरेच जर यंत्रणा १०० टक्के ऑनलाईनने सुरक्षित झाली असेल तर देशाच्या विविध भागांतून चोरलेल्या १ हजार ५०० वाहनांची नोंदणी एकट्या नागपुरात कशी काय होते हो...! याचा सरळ अर्थ असा की, चोरांकडे असणारा 'डेटा' आणि आरटीओ अधिकाऱ्यांचे 'लॉगिन आयडी-पासवर्ड' यांचे कुठेतरी साटेलोटे आहे. ऑनलाईन प्रणाली ही पारदर्शकतेसाठी आहे की, या अधिकाऱ्यांनी घरबसल्या 'डिजिटल' स्वाक्षरीने घोटाळे करण्यासाठी आहे? या पृष्ठभूमीवर, आरटीओ यंत्रणेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि महसूल गळती रोखण्यासाठी परिवहन मंत्रालयाने काही महत्त्वाचे बदल जाहीर केले आहेत. यापुढे महागड्या गाड्यांच्या नोंदणीवेळी बँक लोनची कागदपत्रे, मूळ रहिवासी पुरावा आणि जीएसटी अत्यंत कडक पद्धतीने तपासले जाणार आहे. १ ऑगस्ट २०२६ पासून कोणत्याही व्यावसायिक प्रवासी वाहन चालकासाठी 'बॅज' अनिवार्य करण्यात येणार असून, त्यासाठी संबंधित चालकाकडे स्थानिक नागरिकत्वाचा दाखला आणि व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान असणे बंधनकारक केले जाईल. याउपरही सामान्य नागरिकाला परवान्यासाठी महिनोन्महिने ताटकळत ठेवणारी ही यंत्रणा कोट्यवधींचा कर बुडवणाऱ्या बड्या धेंडांसाठी घातलेल्या पायघड्या मोडेल का? विभागातील अंतर्गत भ्रष्टाचार, सीमा तपासणी नाक्यांवरील बेकायदेशीर वसुली आणि राज्याचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवणाऱ्यांना विभागातून हद्दपार करेल का, हे बघावे लागेल. त्यासाठी आरटीओ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे दर हा कळीचा मुद्दा. मलिद्याच्या पोस्टिंग त्यावर मिळतात. 'एसआयटी'ला प्रादेशिक परिवहन कार्यालयांतील या भ्रष्टाचाराची खोली मोजणे कितपत जमेल, हेही येणारा काळ सांगेल. एक नक्की सांगता येते आणि ते असे की- प्रामाणिकपणे तपास केला तर भ्रष्टाचाराचे इतके डोंगर उघडे पडतील की ते मोजायला अखखा शासकीय कर्मचारी वर्ग अपुरा पडेल! ■


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# किशोरवयीन मुले आणि एआयशी संवाद

आजचे जग कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन आणि समाजमाध्यमांनंतर आता कृत्रिम बुद्धिमत्ता हे मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे सर्वांत परिवर्तनकारी तंत्रज्ञान ठरत आहे. या तंत्रज्ञानाचा सर्वाधिक जाणवणारा आणि सर्वसामान्यांना सहज उपलब्ध झालेला भाग म्हणजे एआय चॅटबॉट्स. हे संवादक्षम संगणकीय सहायक आज शिक्षण, व्यवसाय, आरोग्य, मनोरंजन, संशोधन आणि वैयक्तिक मार्गदर्शन अशा अनेक क्षेत्रांमध्ये वापरले जात आहेत. मानव हा स्वभावतः संवादप्रिय प्राणी आहे. हजारो वर्षे संवाद हा फक्त मानव ते मानव अशा स्वरूपात घडत होता. परंतु आज प्रथमच इतिहासात मानव आणि यंत्र यांच्यामध्ये नैसर्गिक भाषेत संवाद घडू लागला आहे. विशेष म्हणजे हा संवाद अनेकदा इतका सहज, प्रवाही आणि मानवी वाटतो की समोर प्रत्यक्ष व्यक्ती आहे की कृत्रिम बुद्धिमत्ता याचा विसर पडतो. याच ठिकाणी टीनएज अर्थात किशोरवयीन मुलांच्या सुरक्षिततेचा आणि मानसिक विकासाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आजची किशोरवयीन पिढी जन्मापासूनच डिजिटल वातावरणात वाढत आहे. त्यांच्या हातात स्मार्टफोन आहे, त्यांच्या अभ्यासात इंटरनेट आहे आणि त्यांच्या मनोरंजनात डिजिटल माध्यमांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे एआय चॅटबॉट्स त्यांच्यासाठी नवी गोष्ट नसून दैनंदिन जीवनाचा भाग बनत आहेत. अनेक मुले अभ्यासासाठी, माहिती मिळवण्यासाठी, भाषा शिकण्यासाठी, कथा लिहिण्यासाठी किंवा केवळ गप्पा मारण्यासाठी चॅटबॉट्सचा वापर करत आहेत.

योग्य वापर केल्यास एआय चॅटबॉट्स टीनएज मुलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची पद्धत आणि गती वेगळी असते. वर्गात शिक्षकांना सर्व विद्यार्थ्यांकडे समान लक्ष देता येणे नेहमीच शक्य नसते. अशा वेळी एआय चॅटबॉट्स वैयक्तिक मार्गदर्शकाची भूमिका निभावू शकतात. गणितातील अवघड संकल्पना समजावून सांगणे, विज्ञानातील प्रयोगांचे स्पष्टीकरण देणे, इतिहासातील घटनांचा संदर्भ स्पष्ट करणे किंवा भाषेतील व्याकरण शिकवणे यासाठी हे साधन प्रभावी ठरते. भाषिक कौशल्यांच्या विकासातही चॅटबॉट्स मोठी मदत करू शकतात. इंग्रजीसह विविध परदेशी भाषांचा सराव करण्यासाठी ते उत्तम साथीदार ठरतात. विद्यार्थ्यांना संवाद साधण्याचा आत्मविश्वास मिळतो. लेखन कौशल्य सुधारते. विचार मांडण्याची पद्धत विकसित होते. अनेक वेळा विद्यार्थी वर्गात प्रश्न विचारण्यास संकोच करतात परंतु चॅटबॉटसमोर त्यांना असा संकोच वाटत नाही. सर्जनशीलतेच्या क्षेत्रातही या तंत्रज्ञानाने नवे दरवाजे उघडले आहेत. कथा, कविता, नाटिका, भाषणे, प्रकल्प अहवाल किंवा नवकल्पनांसाठी कल्पना शोधताना चॅटबॉट्स प्रभावी सहकारी ठरतात. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते. नव्या दृष्टिकोनातून विचार करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे केवळ माहिती ग्रहण करणारी नव्हे तर सर्जनशील विचार करणारी पिढी घडण्यास मदत होऊ शकते. मानसिक आणि भावनिक पातळीवरही काही सकारात्मक परिणाम दिसून येतात. किशोरवय हा भावनिक चढउतारांचा काळ असतो. अनेक मुलांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी योग्य व्यक्ती मिळत नाही. मित्र, कुटुंब किंवा शिक्षक यांच्याशी सर्व गोष्टी बोलणे त्यांना सोपे वाटत नाही. अशा वेळी काही मुले चॅटबॉट्सशी संवाद साधतात. त्यांना वाटते की कोणी तरी त्यांचे म्हणणे ऐकत आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात तणाव कमी होण्यास मदत होऊ शकते. मात्र या सर्व फायद्यांबरोबरच काही गंभीर धोकेही समोर येत आहेत. एआय चॅटबॉट्स हे माणूस नसतात. त्यांना भावना नसतात, नैतिक जाणीव नसते, अनुभव नसतो आणि जबाबदारीची जाणीवही नसते. ते केवळ उपलब्ध माहिती आणि प्रशिक्षणाच्या आधारे उत्तरे देतात. त्यामुळे काही वेळा त्यांची उत्तरे दिशाभूल करणारी, अपूर्ण किंवा धोकादायक असू शकतात. अलिकडील काही घटनांनी या धोक्यांची तीव्रता अधोरेखित केली आहे. अमेरिकेत एका किशोरवयीन मुलाच्या आत्महत्येनंतर एआय चॅटबॉट्सच्या सुरक्षिततेविषयी गंभीर चर्चा सुरू झाली. आरोप असे होते की संबंधित मुलगा एका आभासी पात्राशी इतका भावनिकदृष्ट्या जोडला गेला होता की त्याने वास्तव आणि आभासी जगातील सीमारेषा धूसर केल्या. मानसिक संघर्षाच्या काळात त्याला योग्य मानवी आधार मिळाला नाही आणि तो यंत्राशी अधिक संवाद साधत राहिला. ही घटना आपल्याला एक महत्त्वाचा धडा देते. चॅटबॉट्स हे मित्र, पालक, शिक्षक किंवा समुपदेशक यांची जागा घेऊ शकत नाहीत. ते सहायक असू शकतात परंतु ते मानवी नात्यांचा पर्याय असू शकत नाहीत.



एखादे मूल भावनिक संकटात असते, तेव्हा त्याला सहानुभूती, समजूतदारपणा आणि मानवी स्पर्शाची गरज असते. ही गरज कोणतेही यंत्र पूर्ण करू शकत नाही. आणखी एक गंभीर धोका म्हणजे चुकीची माहिती. एआय चॅटबॉट्स अनेकदा आत्मविश्वासाने चुकीची उत्तरे देऊ शकतात. टीनएज मुलांमध्ये माहितीची पडताळणी करण्याची सवय नसल्यास ते अशा उत्तरांवर सहज विश्वास ठेवू शकतात. त्यामुळे डिजिटल साक्षरता आणि चिकित्सक विचारसरणी विकसित करणे अत्यावश्यक बनते. गोपनीयतेचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. अनेक मुले नकळत आपली वैयक्तिक माहिती, छायाचित्रे, आवडी-निवडी किंवा कौटुंबिक माहिती चॅटबॉट्सशी शेअर करतात. ही माहिती भविष्यात कशाप्रकारे वापरली जाईल याची त्यांना कल्पना नसते. त्यामुळे मुलांना माहिती सुरक्षेचे शिक्षण देणे अत्यावश्यक आहे. या पृष्ठभूमीवर तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या कंपन्यांवर मोठी जबाबदारी येते. वयानुसार सुरक्षितता नियंत्रण, संवेदनशील विषयांवरील निर्बंध, आत्महत्येसारख्या संकटाच्या परिस्थितीत त्वरित मदतसेवा सुचवणे, पालक नियंत्रण सुविधा आणि संवादाचे नैतिक परीक्षण यांसारख्या उपाययोजना प्रत्येक एआय प्रणालीत असणे आवश्यक आहे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**विजय कुळकर्णी**

# काय आहे एफएमजीई परीक्षा?

आपण डॉक्टर व्हावे. आपले व आपल्या कुटुंबाचा समाजात चांगला लौकिक करावा. परिवाराला आर्थिक हातभार लावावा, असे स्वप्न अनेक विद्यार्थी उराशी बाळगून असतात. मात्र, सर्वांचे हे स्वप्न पूर्ण होतेच, असे नाही. कारण, अनेक विद्यार्थ्यांना पात्रता प्रवेश परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण न झाल्यामुळे वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश मिळू शकत नाही. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी असलेली पात्रता प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी कमीत कमी १२० गुण आवश्यक असतात. पण, त्या विद्यार्थ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळत नाही. असे असले तरी, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळू शकतो. पण, त्यासाठी असलेले शैक्षणिक शुल्क भरमसाट असते. अंदाजे १ कोटी रु. लागतात. एवढे पैसे भरण्याची सर्वांचीच आर्थिक परिस्थिती नसते. ज्यांची असते ते पालक आपल्या पाल्यांना खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश देतात. अशा वेळी काही जण परदेशात वैद्यकीय शिक्षण घेण्याचा सल्ला देतात. रशिया, चीन, युक्रेन, फिलिपिन्स इत्यादी देशांत आपल्या देशातील खाजगी महाविद्यालयांपेक्षा कमी पैशात वैद्यकीय शिक्षण मिळते. आपल्या देशात १ कोटी रु. लागत असतील तर, तिकडे ३० ते ४० लाखांत हे शिक्षण घेऊन एमबीबीएसची पदवी मिळविता येते. पण, असा सल्ला जर कोणी देत असेल आणि आपण त्यानुसार परदेशात जाण्याची तयारी करीत असाल तर, जरा थांबा. कारण, केवळ तिकडची डिग्री घेतली म्हणजे भारतात आपल्याला प्रॅक्टिस करता येईल, असे समजू नका. भारतात प्रॅक्टिस करण्यासाठी एफएमजीई या पात्रता परीक्षेच्या दिव्यातून जावे लागते. आता एफएमजीई ही काय भानगड आहे, असे साहजिकच आपल्या मनात प्रश्न उत्पन्न होईल. तर, एफएमजीई म्हणजे फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन.

परदेशातून एमबीबीएसची पदवी घेऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच ही परीक्षा आहे. म्हणजे, एखाद्या विद्यार्थ्याला वैद्यकीय शिक्षण पात्रता परीक्षेत १२० गुण मिळाले. त्याने भारतातीलच एखाद्या खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षणाची पदवी मिळविली असल्यास त्याला अशी कोणतीही परीक्षा न देता प्रॅक्टिस सुरू करता येते. पण, परदेशातून अशी पदवी प्राप्त करून आल्यावर त्या विद्यार्थ्याला एफएमजीई ही परीक्षा द्यावीच लागते. केवळ परीक्षा देऊन भागत नाही तर, ती उत्तीर्ण करावी लागते आणि उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० टक्के गुण मिळवावे लागतात. म्हणजे ३०० गुणांच्या पेपरमध्ये किमान १५० गुण प्राप्त झाले तरच तो विद्यार्थी उत्तीर्ण होतो. अन्यथा परदेशातील वैद्यकीय पदवीचा कोणताही उपयोग होत नाही. त्यामुळे एमबीबीएस झाला असला तरी तो विद्यार्थी १२ वी पासच समजला जातो. २००२ साली तत्कालीन सरकारने ही परीक्षा सुरू केली होती. यावर्षी जूनमध्ये ही परीक्षा घेण्यात आली. नुकताच निकालही जाहीर झाला. या परीक्षेला देशभरातून ३७ हजार ४४८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३१ हजार ६४५ नापास झाले. त्यातही ४ हजार १५७ विद्यार्थी असे आहेत ज्यांना १४० ते १४९ दरम्यान गुण मिळाले. तर, ६३२ विद्यार्थ्यांना १४९ गुण प्राप्त झाले. त्यामुळे ते नापास झाले. आता या विद्यार्थ्यांना पुन्हा ही परीक्षा द्यावी लागणार आहे. या परीक्षेत विचारण्यात आलेले प्रश्न मास्टर्स म्हणजे एम. डी. अभ्यासक्रमातील होते, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. खरं म्हणजे ज्या देशातून या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय पदवी मिळविली आहे, त्या देशाने त्यांना त्याच देशात प्रॅक्टिस करण्याची परवानगी दिली आहे. आता कोणताही देश आपल्या देशातील नागरिकांच्या जिवाशी खेळणार नाही, हे नक्की. मग, भारतात आल्यावर एवढी कठीण परीक्षा घेण्याचे कारण काय? असा निर्णय घेताना तत्कालीन सरकारच्या मनात काय होते? या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागणार आहे. यावर्षी घेण्यात आलेल्या परीक्षेचे हॉल तिकीट विद्यार्थ्यांना चार दिवस अगोदर ऑनलाईन पाठविण्यात आले. त्यात केवळ परीक्षा कोणत्या शहरात होणार एवढेच सांगितले होते. विद्यार्थ्यांनी परीक्षा होणाऱ्या ज्या शहरांची नाव दिली होती, त्यापैकी त्यांच्या शहरापासून लांब असलेल्या शहरात त्यांना परीक्षा केंद्र देण्यात आले. कदाचित अलिकडे झालेल्या पेपरफुटीच्या प्रकरणांमुळे असे करण्यात आले असावे. देशांतर्गत वैद्यकीय शिक्षण स्वस्त झाल्यास आपले विद्यार्थी परदेशात वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी जाणारच नाहीत. तेव्हा, सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. ■

८८०६००६१४९

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# पंजाब काँग्रेसमधील गटबाजीचा दुसरा अंक

पंजाब विधानसभेची निवडणूक अद्याप जाहीर झाली नसताना प्रदेश काँग्रेसमध्ये कलगीतुरा सुरू झाला आहे. निवडणुकीच्या तयारीला लागायच्या आधी काँग्रेस नेतृत्वाची ताकद राज्यातील नेत्यांची मनधरणी करण्यात खर्ची पडत आहे. हा सगळा वाद सुरू झाला, तो अमरिंदरसिंग राजा वडिंग यांना प्रदेश अध्यक्ष पदावर कायम ठेवण्याच्या काँग्रेस नेतृत्वाच्या निर्णयामुळे. माजी मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांना प्रदेश अध्यक्ष व्हायचे होते, म्हणजे पंजाब विधानसभेची निवडणूक आपल्या नेतृत्वात लढवायची होती. राज्यातील बहुतांश काँग्रेस नेत्यांचा त्यांना पाठिंबाही होता. या वादावर तोडगा काढण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाने तीन सदस्यीय समिती पंजाबला पाठवली. अजय माकन, मीनाक्षी नटराजन आणि भजनलाल यादव यांच्या समितीने राज्यातील सर्व स्तरावरील काँग्रेस नेत्यांशी चर्चा करीत अमरिंदरसिंग राजा वडिंग यांना हटवत चन्नी यांना प्रदेश अध्यक्ष करण्याची शिफारस केली. मात्र, काँग्रेसच्या नेतृत्वाने ही शिफारस फेटाळून लावत अमरिंदरसिंग यांना अध्यक्ष पदावर कायम ठेवण्याचा निर्णय घेत चन्नी यांची प्रदेश प्रचार समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली.

येथून वाद चिघळला. चन्नी गटाने बंडखोरीचे निशाण फडकवले. अध्यक्ष नाही तर चन्नी यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करा, अशी मागणी त्यांच्या गटातर्फे करण्यात आली. पक्षांतर्गत गटबाजी टाळण्यासाठी सामूहिक नेतृत्वाच्या आधारावर विधानसभा निवडणूक लढवायची काँग्रेस नेतृत्वाची भूमिका होती. विशेष म्हणजे प्रदेश अध्यक्ष अमरिंदरसिंग राजा वडिंग यांनी मुख्यमंत्रिपदाच्या वादापासून स्वतःला दूर ठेवले. चन्नी वा अन्य कोणताही काँग्रेस नेता मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत राहू शकतो, पण मी त्या शर्यतीत नाही. राहुल गांधी ज्याला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करतील, त्याच्यासोबत मी उभा राहील, अशी संयमित प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

राज्यातील परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात आल्यावर काँग्रेसच्या नेतृत्वाने डॅमेज कंट्रोलसाठी प्रदेश प्रभारी भूपेश बघेल यांना तातडीने पंजाबमध्ये पाठवले. पण चन्नी गटाने त्यांच्याशी चर्चा न करता दिल्ली गाठली आणि आम्ही फक्त काँग्रेसच्या नेतृत्वाशीच चर्चा करू, अशी भूमिका घेतली. या वादात काँग्रेस नेते मनीष तिवारी यांच्या नाराजीचे वेगळे उपकथानकही आहे. राज्यातील निवडणूक समितीत स्थान न मिळाल्यामुळे तिवारी यांनी समाजमाध्यमातून आपली नाराजी व्यक्त केली.


पंजाब काँग्रेसला तसाही गटबाजीचा शाप आहे. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधीही पंजाब काँग्रेसमध्ये वाद झाला होता, त्यावेळी वादाचा केंद्रबिंदू अमरिंदरसिंग होते; आणि योगायोग म्हणजे २०२६ मध्येही प्रदेश काँग्रेसमध्ये जो वाद सुरू आहे, त्या वादाचा केंद्रबिंदूही अमरिंदरसिंग आहेत. फरक म्हणजे त्यावेळचे अमरिंदरसिंग कॅप्टन होते आणि आताचे अमरिंदरसिंग राजा वडिंग आहेत.

२०२६ मध्ये चरणजितसिंग चन्नी आणि अमरिंदरसिंग राजा वडिंग यांच्यात जसा वाद सुरू आहे, तसाच २०२२ मध्ये कॅप्टन अमरिंदरसिंग आणि नवज्योतसिंग सिद्धू यांच्यात सुरू झाला होता. २०१७ ची निवडणूक काँग्रेसने जिंकली आणि कॅप्टन अमरिंदरसिंग मुख्यमंत्री झाले. २०१७ ची निवडणूक आपली शेवटची निवडणूक आहे, यानंतरही आपण निवडणूक लढणार नाही, असा भावनिक प्रचार तेव्हा कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी केला होता. त्यामुळे काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर कॅप्टन मुख्यमंत्री झाले. २०१७ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधी सिद्धू यांनी भाजप सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. सिद्धू हे राज्यातील काँग्रेसचे भविष्य असल्याची प्रतिक्रिया तेव्हा प्रदेश प्रभारी असलेले हरीश रावत यांनी व्यक्त केली होती; पण याच सिद्धूंनी नंतर राज्यातील काँग्रेसचे भविष्य अंधकारमय केले. काँग्रेसच्या नेतृत्वालाही तेव्हा सिद्धू यांच्याकडून खूप अपेक्षा होत्या. कॅप्टन अमरिंदरसिंग यांच्या मंत्रिमंडळात सिद्धू यांचा समावेश झाला, पण या दोघांचे काही जमले नाही. कॅप्टन अमरिंदरसिंग आणि नवज्योतसिंग सिद्धू यांच्यात वाद नाही तर संघर्ष सुरू झाला. त्यामुळे काँग्रेसच्या नेतृत्वाने कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी मुख्यमंत्रिपदावरून हटवत त्यांच्या जागेवर चरणजितसिंग चन्नी यांना मुख्यमंत्री केले. एवढेच नाही तर सुनील जाखड यांना प्रदेश अध्यक्ष बनवले. मात्र, सिद्धू यांचे समाधान झाले नाही. मुख्यमंत्रिपदावर डोळा असलेल्या सिद्धू यांचे नंतर चन्नी यांच्याशीही पटले नाही, दोघांतील संबंध तणावपूर्ण झाले. त्याची परिणती राज्यातील काँग्रेसच्या सत्ता गमावण्यात झाली. विशेष म्हणजे मुख्यमंत्रिपद गमावल्यामुळे कॅप्टन अमरिंदरसिंग यांनी काँग्रेस सोडत आधी आपला वेगळा पक्ष स्थापन केला आणि नंतर भाजपात प्रवेश केला, तर नवज्योतसिंग सिद्धू यांनी आधी काँग्रेस आणि राजकारणही सोडले. आज सिद्धू कुठे आहे, हे कोणालाही माहीत नाही. कॅप्टन अमरिंदरसिंग आणि सिद्धू यांच्यात वाद सुरू होता, तेव्हा सुनील जाखड प्रदेश काँग्रेस अध्यक्ष होते. काही दिवसांनी सुनील जाखड यांनीही काँग्रेसला कंटाळून भाजपात प्रवेश केला. आताआतापर्यंत सुनील जाखड पंजाब भाजपाचे अध्यक्ष होते. पंजाब काँग्रेसमध्ये जेव्हा जेव्हा वाद झाला, त्याचा फायदा भाजपाला झाला आहे. यावेळी पंजाब भाजपा अध्यक्षांनी चरणजितसिंग चन्नी यांना भाजपात येण्याचे निमंत्रण देऊन टाकले. दुसरीकडे पंजाब काँग्रेसचे नेते सुखजिंदरसिंह रंधावा यांनी गृहमंत्री अमित शाह यांची नुकतीच भेट घेतल्यामुळे वेगळी चर्चा सुरू झाली आहे. पंजाब प्रदेश काँग्रेसमधील ताज्या पेचप्रसंगांची परिणती अखेर कशात होणार, हे आताच सांगता येणार नाही. या वादात अमरिंदरसिंग राजा वडिंग यांचा बळी जाणार की चरणजितसिंग चन्नी माघार घेणार, हे आताच सांगता येणार नाही. मात्र एक नक्की आहे, याचा फटका काँग्रेसला बसणार! राज्यात तशीही काँग्रेस सत्तेवर येण्याची शक्यता नाहीच्या बरोबर आहे. काँग्रेसची यात दुहेरी गोची आहे. काँग्रेस चन्नी यांच्यावर कोणतीही कारवाई करू शकत नाही. कारण चन्नी हे राज्यातील दलित नेते आहेत आणि पंजाबमध्ये दलित मतदारांची संख्या ३० ते ३५ टक्के आहे. चन्नी यांच्यावर कोणतीही कारवाई केली तर दलितांची नाराजी काँग्रेसला ओढवून घ्यावी लागेल; जी काँग्रेसला परवडणारी नाही. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेसने अमरिंदरसिंग राजा वडिंग यांना प्रदेश अध्यक्ष बनवले. आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात अमरिंदरसिंग यांनी काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळवून दिले. त्यामुळे राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांना हटवणे काँग्रेसच्या नेतृत्वाला योग्य वाटले नाही, त्यामुळे त्यांना अध्यक्षपदावार कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. २०२२ मध्ये काँग्रेसच्या राज्यातील पराभवाची पटकथा सिद्धू यांनी लिहिली, यावेळी त्या भूमिकेत चरणजितसिंग चन्नी आहेत. पंजाबमध्ये काँग्रेसला पराभूत करण्यात भाजपाला फारसे कष्ट घ्यावे लागणार नाही, भाजपाची ही जबाबदारी राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांनी आपल्या शिरावर घेतली आहे आणि ती ते प्रामाणिकपणे पार पाडतील, यात शंका नाही. पंजाब काँग्रेसच्या नेत्यांनी राजकीय आत्महत्या करण्याचे ठरविले असेल तर त्याला कोणी कसे काय रोखू शकणार? ■

९८८१७१७८१७

## समाधान, शांती आणि आरोग्य...

मानवी जीवनात सुख, समाधान आणि मानसिक शांतता यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजचा माणूस सुखाच्या शोधात सतत धावत आहे. अधिक पैसा, मोठे घर, महागड्या वस्तू यांनाच सुख समजले जाते. परंतु खरे सुख साधेपणात आणि समाधानात दडलेले असते. साधे जीवन जगणारा माणूस आनंदी, निरोगी आणि शांत राहतो. अनेक थोर व्यक्तींनी साधेपणाने जीवन जगून समाजाला आदर्श घालून दिला. साधे जीवन म्हणजे गरजा मर्यादित ठेवणे, अनावश्यक खर्च टाळणे आणि प्रामाणिकपणे जीवन जगणे. साध्या जीवनामुळे मनावर ताण कमी येतो. कमी अपेक्षा ठेवल्यास माणूस जे आहे त्यात समाधान मानतो. त्यामुळे मानसिक शांती मिळते. नियमित दिनचर्या, साधा आहार आणि व्यायाम यामुळे शरीर निरोगी राहते. माणसामध्ये नम्रता, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि प्रेम या गुणांचा विकास होतो. तो इतरांना मदत करण्यासही नेहमी तयार असतो. त्यामुळे समाजातही चांगले संबंध निर्माण होतात. साधेपणाने जगणारी व्यक्ती निसर्गाच्या सान्निध्यात, कुटुंबाच्या प्रेमात आणि चांगल्या नातेसंबंधांत खरे समाधान शोधते. प्रत्येकाने आपल्या जीवनात साधेपणाचा स्वीकार करावा.



साधेपणामुळे माणूस इतरांच्या दुःखाची जाणीव ठेवतो, समाजाशी जोडला जातो आणि पर्यावरणाचेही संरक्षण करण्यास हातभार लावतो. साधेपणा हा जीवनातील खरा आनंद आणि समाधान मिळवून देणारा मार्ग आहे. तो आपल्याला स्वार्थ, दिखाऊपणा आणि अनावश्यक स्पर्धेपासून दूर ठेवतो. शेवटी असे म्हणता येईल की, खरे सुख संपत्तीत नसून समाधानात असते. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि सकारात्मक विचार यांच्या आधारावर जगलेले जीवन खऱ्या अर्थाने सुखी आणि समाधानी असते. साधे जीवन जगून उच्च विचार जोपासल्यास वैयक्तिक तसेच सामाजिक जीवन अधिक आनंदी, शांत आणि निरोगी होईल.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### लोकप्रतिनिधींनी कायद्याचा आदर करावा

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या डॉक्टर व परिचारिकांना एका नगरसेवकाने बेदम मारहाण केल्याची बातमी वाचण्यात आली. नगरसेवकाने डॉक्टर व परिचारिकांना मारहाण करतानाचा व्हिडीओ देखील समाज माध्यमात व्हायरल झाला आहे. डॉक्टर आणि परिचारिकांना मारहाण करण्याची नगरसेवकाची कृती चुकीचीच आहे. डॉक्टर असो की परिचारिका, अधिकारी असो की कर्मचारी जर चुकीचे वागत असतील तर लोकप्रतिनिधींनी त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करावी. त्यांची तक्रार वरिष्ठांकडे किंवा मुख्यमंत्र्यांकडे करावी. अधिकाऱ्यांना अशाप्रकारे अपमानित करणे, मारहाण करणे लोकप्रतिनिधींना शोभत नाही. लोकप्रतिनिधीच कायदा हातात घेऊ लागले तर देशात अराजकता माजेल. अधिकारी आणि लोकप्रतिनिधी ही लोकशाहीच्या रथाची दोन चाके आहेत. ती सोबत चालली तरच लोकशाहीचा रथ पुढे ओढता येईल याचे भान दोघांनीही ठेवायला हवे.

**श्याम ठाणेदार**/पुणे. ९९२२५४६२९५

■■■

### प्रदूषण टाळा, नद्या वाचवा

भारतात अनेक नद्या आहेत. नद्या जीवनदायिनी आहेत. प्राचीन काळी नद्यांच्या काठानेच मनुष्याने वस्ती वसवली. मनुष्य, प्राणी, पक्षी यांचे जीवन या नद्यांच्या जलावर अवलंबून आहे. पण भारतात पवित्र मानल्या जाणाऱ्या या नद्या आज प्रदूषित झाल्या आहेत आणि याला मनुष्यच कारणीभूत आहे. जलप्रदूषणाच्या अनेक कारणांपैकी औद्योगिक सांडपाणी मुख्यत्वे आहे. मोठे उद्योग, कारखाने यातील रासायनिक पाणी, कचरा नदीत सोडला जातो. तसेच घरगुती कचरा, प्लास्टिक इत्यादी गोष्टींमुळे सुद्धा जलप्रदूषण होते. त्याचप्रमाणे हल्ली शेतीसाठी पिकांवर रासायनिक फवारणी केली जाते, त्यामुळे सुद्धा नद्यांचे पाणी प्रदूषित होते. काही ठिकाणी नदीकाठी कपडे धुतले जातात, त्यातील डिटर्जंटने जलप्रदूषण होते. नदीतील जल प्रदूषित झाल्यास त्याच्या वापरामुळे मनुष्याच्या व प्राण्यांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होतो. प्रदूषित गढूळ पाणी प्यायल्याने कॉलरा, कॅन्सर, त्वचाविकार, श्वसनाचे विकार मनुष्याला होतात. तर प्राणी सुद्धा याला बळी पडतात. पाण्यात रसायने जमा झाल्याने शेवाळाची वाढ होते. त्यामुळे पाण्यातील ऑक्सिजन कमी होतो. त्याचा गंभीर परिणाम जलचरांवर होतो. ज्या पाण्याशिवाय आपण एक क्षणही राहू शकत नाही त्याबद्दल आपली उदासीनता नव्हे कृतघ्नपणा यावरून दिसून येतो. यावर उपाय म्हणून कारखान्यांच्या सांडपाण्यातील विषारी घटक कमी करणे, पर्यावरणपूरक उत्पादने वापरणे, कीटकनाशकांऐवजी जैविक खते वापरणे. यामुळे काही प्रमाणात का होईना प्रदूषण कमी होईल. ■

**माधवी पत्की**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
**tbedit2016@gmail.com**

# आर. गंगाधरण यांना दुहेरी मुकुट

## वरिष्ठांची जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा

### सोलापूरचे राजीव देसाई व विकास सोनी यांना उपविजेतेपद




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ८ जुलै -**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली आयोजित केलेल्या वरिष्ठांच्या पाचव्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत ७५ वर्षांवरील पुरुष गटात आर. गंगाधरण यांनी एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला.

एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल आणि इलिझियम क्लबच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत ७५ वर्षांवरील पुरुष गटात बिगर मानांकित आर. गंगाधरणने तिसऱ्या मानांकित गोविंद कुमारचा ६-२, ६-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. दुहेरीत याच गटात राजेंद्र अगरवाल व आर. गंगाधरण यांनी मुकेश बजाज व शैलेंद्र खंडेलवाल यांचा ६-७(५), ६-२, १०-२ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

५५ वर्षांवरील पुरुष गटात अंतिम लढतीत दुसऱ्या मानांकित तुलेश्वर सिंग थोंगबम याने अव्वल मानांकित सुधीर गोठेचा ४-६, ६-३, १०-६ असा तर, ६० वर्षांवरील पुरुष गटात अव्वल मानांकित नागराज रेवणसिद्धियाहने तिसऱ्या मानांकित राज दत्त यांचा ६-३, ६-१ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला.

६५ वर्षांवरील पुरुष गटात तिसऱ्या मानांकित प्रमोद दिक्षितने चौथ्या मानांकित मेहेरप्रकाश कोडुरीचा ६-४, ६-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

दुहेरीत ६० वर्षांवरील पुरुष गटात दुसऱ्या मानांकित नागराज आर व अमित सांगल यांनी राजीव देसाई व विकास सोनी यांचा ६-१, ६-४ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण ओएसिस मॉलचे व्यवस्थापकीय संचालक सिद्धार्थ गांधी व भारतीय टेनिस संघाचे माजी जेष्ठ प्रशिक्षक ताहिर अली यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक रामा राव डोसा, एम एसएलटीएचे सह सचिव राजीव देसाई, आयटीएफ सुपरवायझर वैशाली शेकटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**अंतिम निकाल :**

**६० वर्षांवरील पुरुषः** नागराज रेवणसिद्धियाह१(भारत)वि.वि.राज दत्त३(भारत)६-३, ६-१.

**७० वर्षांवरील पुरुषः** तुलसी रामू बिलिकेरे सिद्धराजू१(भारत)वि.वि. एकनाथ किणीकर(भारत)६-२, ६-०.

**दुहेरीः ५५ वर्षांवरील पुरुषः**
सुधीर गोठे/विमल रॉय२(भारत) वि.वि.जयप्रकाश निषाद/तुलसीवर सिंग थोंगबम१(भारत) ७-६(३), ६-२.

**६५ वर्षांवरील पुरुषः** अजित भारद्वाज/राकेश कोहली१(भारत) वि.वि.ओंकार दिक्षित/प्रमोद दिक्षित२(भारत)७-५, ६-२.

## IN THE COURT OF CIVIL JUDGE, INDI AT : INDI

O.S.No. 377/2016

**1. Rayawwa W/o Bhaganna Koli And others. - Plaintiffs**

Vs.

**1. Yallappa S/o Neelappa Talawar And others - Defendants**

**NOTICE TO DEFENDANT NO. 1(A) To 1(C) and 1(E)**

Defendant No.1 legal heirs

1(a) **Mayakka W/o Siddaram Koli**
Age: 50 years, Occ: H.H.Work,.
R/o Kale, Tq: Karad, Dist: Satara. Pin-415104.

1(b) **Siddappa S/o Yallappa Koli**
Age: 42 years, Occ: Agril,
R/o Santkabir Nagar, Bhosale Military, (Moodal Colony) Nasik, Tq: & Dist:Nasik (MS). Pin-422007.

1(c) **Dyamakka W/o Baburao Koli,**
Age: 40 years, Occ: H.H.Work,
R/o Durga Nagar, Nasik,
Tq: & Dist:Nasik (MS). Pin-4220071

1(e) **Sadashiv S/o Yallappa Koli**
Age: 36 years, Occ: Driver
R/o Durga Nagar, Nasik, Tq: & Dist:Nasik (MS). Pin-4220071

**NOTICE U/S 5 RULE 20(1A) OF C.P.C.**

Whereas the above named plaintiffs have instituted a suit against you in above said court, you are herby summoned to appear in this court either in person or through Advocate duly instructed by you on the date of 23/07/2026 in the forenoon to answer the claim and you are directed to produced to produce on the day all the documents upon which you intend to rely in support of your defense.

Take summons that in default of your appearance on the day fixed your appearance in above mentioned suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and seal of the court this day. 06/07/2026

**(Signature)**
**Advocate for Plaintiff**
**S.G.Kulkarni, Advocate**
**Indi**

**Court Stamp**

**(Signature)**
**(Shri.R.Y.Bhavimani)**
**Sr. Shirastedar (Admn)**
**Civil Judge Indi**

## सोलापूर महानगरपालिका सोलापूर

पत्ता - इंद्रभुवन, पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१

**नगर अभियंता मुख्य कार्यालय**

**जा.क्र.नगर अभियंता/२०२६/५०५** **दिनांक - ०८/०७/२०२६**

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात मंडप, फर्निचर व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्त्वावर पुरवठाबाबत वार्षिक मक्तेदार नेमणेबाबत.

१) Tender Id- 2026_SMC_1315399_1

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. ०८/०७/२०२६ सकाळी ११ वा. पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**(सारिका आकुलवार)**
**उप. नगर अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**

## MAHATRANSCO — SRM E-Tender Notice

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000040664 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 16/2026-27, Particulars:** Work of providing & fixing of additional jumpers on tension towers of the various lines by using boltless C-type wedge connectors for EHV LMSD I & II Baramati under EHV O&M Division Baramati. **Estimated cost:** Rs. 1,79,65,234.51/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 1,79,652/- **Tender cost in Rs.** 5000.00+ GST, **Sale period:** 07.07.2026 to 23.07.2026 **Last Date of Submission:** 23.07.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 24.07.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Executive Engineer -7447440852 For further details

**Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

**1) https://srmetender.mahatransco.in. 2) https://mahatransco.in**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-enquiry (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

## भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर

**ICAR - National Research Centre On Pomegrante**
(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

### WALK IN INTERVIEWA

Walk in interview will be held on 28/07/2026 10:30 AM at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of Part Time Medical Officer on contractual basis at a consolidated remuneration.

| Name of Post | Number of Posts |
|---|---|
| Part Time Medical Officer | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrcpomegranate.in

**Sd/-**
**DIRECTOR**

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी मौजे मंद्रुप येथील भुमापन क्र. १६३/२ यांसी एकूण क्षेत्र १हे.९० आर पो.ख. ०हे.०१ आर यांसी एकूण क्षेत्र १हे. ९१ आर यांसी आकार ४ रुपये ६० यापैकी क्षेत्र १हे.०९ आर + पो.ख. ०हे. ०१ आर असे एकूण क्षेत्र १ हे. १० आर यांसी आकार २ रुपये ६४ पैसे, अशी मिळकत ही आमचे अशिल चरणसिंग गुलाबसिंग लंगडेवाले यांचे आजोबा नामे जमनसिंग लंगडेवाले यांनी काबाडकष्ट करून वर नमूद जमीन त्यांचे नावाने विकत घेतली होती. सबब, सदरची मिळकत ही वडिलापार्जित असून त्यात आमचे अशिल चरणसिंग गुलाबसिंग लंगडेवाले यांचा देखील अविभक्त हिस्सा आहे. तसेच सदरची जमीन आजतागायत वाटणी झालेली नाही. सबब अशी वस्तुस्थिती असताना वर नमूद शेतजमीन ही ललिता उर्फ दुलारी गुलाबसिंग लंगडेवाले व जयसिंग गुलाबसिंग लंगडेवाले हे वर नमूद मिळकत तिऱ्हाईत इसमास विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सदरची जमीन आमचे अशिलांच्या वडिलापार्जित असून त्यात आमचे अशिलांचा अग्रहक्काचा अधिकार आहे. सबब, वर नमूद मिळकतीमध्ये कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, वगैरे हितसंबंध निर्माण करू नये व कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. सदर वर नमूद मिळकतीवर आमचे अशिलांचा हिस्सा व अधिकार आहे. सबब, असे असताना सदर ललिता उर्फ दुलारी गुलाबसिंग लंगडेवाले व जयसिंग गुलाबसिंग लंगडेवाले हे वर नमूद मिळकत ही इतरत्र विक्री करून सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ हक्क व हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमचे अशिलांना खात्रीलायक रित्या समजले आहे. सबब, या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत कोणीही सदर ललिता उर्फ दुलारी गुलाबसिंग लंगडेवाले व जयसिंग गुलाबसिंग लंगडेवाले यांचेशी कसलाही प्रकारचा वर नमूद मिळकतीबाबत आर्थिक व्यवहार अथवा खरेदी विक्री, गहाणदाण, लिज, बोजा, भाडेकरार, इत्यादी तत्सम दस्ताने व्यवहार करू नये अन्यथा असे व्यवहार व करार मदार हे आमचे अशिल व वर नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणुक होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे. दि. ०८/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. अशोक जी. श्रीवास्तव**
**५७, नेताजी नगर, जोडभावी पेठ,**
**सोलापूर. मो.नं. ९४२१०२४०९७**
**अशिल - चरण गुलाबसिंग लंगडेवाले**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर येथील कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नंबर ६५७/१/१ यापैकी नियोजित विशाल नगर मधील प्लॉट नं. ३१ याचे हद्द पुर्वपश्चिम १२.१९ मी. दक्षिणोत्तर ६.१० मी असे एकुण क्षेत्र ७४.३६ चौ.मी अथवा ८०० चौ. फुट इतके आहे. सदर बिनशेती खुली प्लॉटची चतुःसिमा खालीलप्रमाणे पुर्वेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. ३०, पश्चिमेस : प्लॉट नं. ४०, उत्तरेस : रस्ता येणेप्रमाणे वर नमुद चतुःसिमेतील संपूर्ण खुली प्लॉट जागा ही श्रीनिवास पुडलिक एकबोटे यांच्या मालकी कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरहू खुली प्लॉट जागा हि आमचे अशिलास कायम खुषखरेदीने देण्याचे ठरवून दिनांक ०८/०७/२०२६ रोजी इसारा रक्कम घेऊन साठेखत व कब्जा पावती करारपत्र आमच्या अशिलाच्या नावे लिहून देऊन सदर खुली प्लॉट जागा खरेदी देण्याचे ठरविले. व सदरहू खुली प्लॉट जागा हि निर्वेध व निजोखमीची आहे अशी हमी व खात्री मिळकतदारांनी आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, वर नमुद खुली प्लॉट जागेवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, दावा, लीज, जप्ती, वारसा हक्क, दान, टाच, गहाण, बक्षीस पत्र, मुखत्यारपत्र, वहीवाटी हक्क, वाटणी हक्क, बँकेचे कर्ज, सावकारी कर्ज, खरेदी विक्री व्यवहार वगैरे वा अन्य प्रकारचे करार वा मदार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत कागदोपत्रानिशी व पुराव्यानिशी खालील नमुद पत्त्यावर लेखी हरकत नोंदवून खात्री करुन द्यावेत. अगर मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची हरकत व तक्रार न आल्यास वर नमुद खुली प्लॉट जागा मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील मग मात्र कोणाचेही कसल्याही प्रकारचा हरकत, तक्रार चालणार नाही. व ते आमचे अशिलाच्या रजि. खरेदीखतावर मुळीच बंधनकारक राहणार नाही. कोणाचेही कसल्याही प्रकारची फसवणूक होऊ नये यास्तव सदरहू नोटीस दिली. तारीखः ०८ जुलै २०२६.

**सही/-**
**जी. एच. नोरा**
**बी.कॉम., एलएल.बी., ॲडव्होकेट**
**ऑफीस - २३५/१०/१ तेलंगी पाच्छा पेठ,**
**सोलापूर ४१३००५ मो. ९८२२२५५४५०**
**अशिल सौ. प्रभावती अंबुलाल पासकंटी**
**या अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**

**सिग्नलिंगचे काम**

**निविदा सूचना क्र. SUR-N-T-2026-27-23, दिनांकः 07/07/2026;** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील डीआरएम (S&T) कार्यालय, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम आणि प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेः अनुक्रमांकः 1, कामाचे नाव आणि ठिकाणः मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात ट्रॅक मशीन साइडिंगसाठी पायाभूत सुविधांच्या विकासाशी संबंधित सिग्नलिंगचे काम. निविदा क्र.: SUR-N-T-2026-27-23, कामाचा अंदाजित खर्चः रु. 61,19,978.18, निविदा अर्जाचे मूल्यः शून्य (NIL), अनामत रक्कमः रु. 1,22,400, काम पूर्ण करण्याचा कालावधीः 12 महिने, निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळः 05/08/2026 रोजी 15:30 नंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धिपत्रक/बदल असल्यास ते केवळ वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवरच अपलोड केले जातील. केवळ ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपाल/ई-मेल/फॅक्स किंवा प्रत्यक्ष (by hand) सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास III डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट (Class III DSC) मिळवावे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. अनामत रकमेचा (EMD) भरणा नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटीद्वारे स्वीकारला जाईल; तसेच, मूळ बँक गॅरंटी निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या अधिकृत अधिकाऱ्याकडे बोली सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याच्या अंतिम दिवसाव्यतिरिक्त) प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**डीआरएम (एस अँड टी)**
29 **सोलापूर, मध्य रेल्वे**

**रेल्वे मार्ग अनधिकृतपणे ओलांडणे हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे.**

## बँक ऑफ बड़ौदा / Bank of Baroda

**नवी पेठ, शाखा**
पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१

### मागणी नोटीस U/S 13(2)

**सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ चे कलम १३(२) अनुसार नोटीस**

१. कर्जदाराचे, जामिनदार व कायदेशीर वारसदार यांचे नाव व पत्ता

| अ. क्र. | शाखा / कर्जदार / जामिनदार / गहाणदारांची नावे आणि पत्ते | मागणी नोटीसीची तारीख / अनुत्पादक मालमत्तेची तारीख | मंजूर कर्ज रक्कम | खाते क्रमांक / खात्याचा प्रकार / व्याज दर | येणे रक्कम | स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **श्री. लायेश बालाजी क्यातम** रा. टु. नं. ०१, सीटीएस क्र. १०३८७, प्लॉट नं. ३३/३, सब प्लॉट क्र.२३ब, पश्चिमे कडील भाग, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००६ **सौ. अपेक्षा लायेश क्यातम** रा. टु. नं. ०१, सीटीएस क्र. १०३८७, प्लॉट नं. ३३/३, सब प्लॉट क्र.२३ब, पश्चिमे कडील भाग, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००६ | ०१/०७/२०२६ / १०/०८/२०२५ | रु. १६,२९,०००/- | (०६/१४३९) गृह कर्ज- / ७.१०% | रु.१३,८४,१२८/- + व्याज + इतर खर्च | सोलापूर जिल्हा व उप जिल्हा आणि उत्तर सोलापूर तालुका येथील सिटी सर्व्हे नंबर १०३८७, फायनल प्लॉट नंबर ३३/३, सब प्लॉट नंबर २३/ब एकुण क्षेत्रफळ २९०.०० चौ.मी. या मालमत्तेपैकी पश्चिमेकडील ४६.४६ चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग, जी मालमत्ता सोलापूर महानगरपालिका हद्दीतील न्यु पाच्छा पेठ, सोलापूर येथे स्थित असून तिचा महानगरपालिका घर क्रमांक ३३/३/२३ असा आहे आणि जी श्री. लायेश बालाजी क्यातम व सौ. अपेक्षा लायेश क्यातम यांच्या मालकीची आहे. चतु:सिमा – **पुर्वेस** : श्री अंबाजी आनंद कट्टा यांची सब प्लॉट नं. २३/ब ची मालमत्ता **दक्षिणेस** : फायनल प्लॉट नं. ३३/३/२४ **उत्तरेस** : सब प्लॉट नं. २३/ब, आणि लहान बोळ **पश्चिमेस** : रोड |
| | | ०१/०७/२०२६ / १०/०८/२०२५ | रु. ९,२५,०००/- | (०६/२५१७) टॉप अप लोन / १०.०५% | रु. ९,१४,४२५.३३ + व्याज + इतर खर्च | |
| | | | | | **एकुण येणे रु. २२,९८,५५३.३३/- + १०/०५/२०२५ पासूनचे व्याज + इतर खर्च** (अक्षरी – बावीस लाख आठ्यानऊ हजार पाचशे त्रेपण्ण रुपये आणि तेहतीस पैसे फक्त) | |

२) मुख्य कर्जदार (कर्जदार) याने / हिने / त्याच्या / त्यांच्या देणे रक्कमेची फरतफेड करण्यास कसूर केले असल्याने आम्ही यांचे / हिचे / त्याचे / त्यांचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निश्चित केले आहे. ३) आपणांस ही सूचना सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ नुसार जारी करण्यात आली आहे, कारण रजिस्टर्ड पोस्टाने आपणांस पाठविण्यात आलेली नोटीस पोहोच न होता परत आली, यानुसार आपणांस पुढीलप्रमाणे रक्कमेची व्याजासह भरणा करण्यास बजावण्यात येत आहे. ४) आपणांस देण्यात आलेली कर्जसुविधेची रक्कम वरीलप्रमाणे मालमत्ता / सिक्युरिटीजद्वारे सुरक्षित करण्यात आली आहे ५) आता या जाहीर सूचनेद्वारे आम्ही आपणांस या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत येणे रक्कम, व्याज, भविष्यातील व्याज आणि प्रासंगिक खर्च आणि किंमत यांसह परत करण्याचा सल्ला देत आहोत. अन्यथा बँक सरफेसी अॅक्ट २००२ अनुसार कारवाई करतील. खाली सही करणार यांच्याकडे सदर मालमत्तांचा ताबा घेणे. त्यानंतर सदर मालमत्तांची विक्री करण्याचे अधिकार आहेत आणि ते सरफेसी अॅक्ट सेक्शन १३ अनुसार बँकेचे अधिकृत अधिकार आहेत.

**दिनांक - ०१-०७-२०२६, स्थळ - नवी पेठ, सोलापूर** **(मजकूरात संधिग्ता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरा)**

सही/– **अधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ बडौदा**

## प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड

PRECISION

सी आय एन : L24231PN1992PLC067126
नोंदणीकृत कार्यालय : डी– ५, एम.आय.डी.सी., चिंचोळी, सोलापूर–४१३ २५५, महाराष्ट्र, भारत
फोन – +९१ ९१६८६४६५३६ / ३७, फॅक्स : ०२१७ – २३५७६४५
ई–मेल : cs@pclindia.in संकेतस्थळ : www.pclindia.in

### ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, ई–मतदान, बुक क्लोजर तारीख आणि लाभांशावरील कर

यानुसार सूचना देण्यात येते की, प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड (दि कंपनी) ची **३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) गुरुवार, दिनांक ३० जुलै २०२६ रोजी (भारतीय प्रमाण वेळ) दुपारी ३.०० वाजता प्रत्यक्षात एका स्थळी उपस्थित न राहता व्हीडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)** किंवा अन्य दृकश्राव्य (ओएव्हीएम) सुविधेद्वारे कंपनी कायदा २०१३ (कायदा) मधील तरतुदी आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या सुधारणा आणि आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स आणि डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्यूलेशन्स २०१५ च्या तरतुदींचे पालन करून आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय आणि सिक्युरिटीज आणि एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) द्वारे जारी केलेली विविध परिपत्रके आणि अधिसूचना नियमन (एकत्रितपणे 'MC-/ SEBI परिपत्रक' म्हणून संदर्भित) यातील तरतुदींचे पालन करून आयोजित करण्यात आली आहे. नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे प्रदान केलेल्या व्हीसी / ओएव्हीएम सुविधेद्वारे सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहू शकतील.

पुढे ही सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ च्या नियम १० आणि सेबी ( एलओडीआर ) २०१५ चे नियम ४२, सदस्यांची नोंदणी आणि कंपनीच्या समभाग रजिस्टर आणि हस्तांतरण पुस्तके शुक्रवार २४ जुलै २०२६ ते गुरुवार, ३० जुलै २०२६ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत सभासदांना लाभांश मिळण्याचा हक्क निश्चित करण्यासाठी बंद राहतील. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये लाभांश घोषित केला जाईल.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०१ आणि १३६ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ नुसार वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२५–२६ च्या वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती, ज्यांचे ई–मेल पत्ते ३ जुलै २०२६ रोजी कंपनी / डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना पाठवल्या गेल्या आहेत.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ नुसार,कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ चे नियम २० आणि सेबीचे (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्कोलजर रिक्वायरमेंट्स) रेग्यूलेशन्स २०१५च्या नियम ४४ अन्वये गुरुवार दिनांक २३ जुलै २०२६ या कट ऑफ तारिख असलेल्या दिवशीचे भागधारक एनएसडीएलच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मते देऊ शकतात. रिमोट ई–व्होटिंगचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

१. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेले व्यवसाय इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाद्वारे व्यवहार केले जाऊ शकतात.

२. रिमोट ई–व्होटिंगचा कालावधी सोमवार, २७ जुलै २०२६ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी ९ वाजता सुरु होईल आणि बुधवार, २९ जुलै २०२६ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार सायंकाळी ५ वाजता समाप्त होईल.

३. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्याची पात्रता आणि लाभांश (आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषित केल्यास) निश्चित करण्यासाठी कट–ऑफ तारीख गुरुवार दिनांक २३ जुलै २०२६ आहे.

४. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठवल्यानंतर एखादी व्यक्ती कंपनीची सदस्य बनल्यास आणि गुरुवार दिनांक २३ जुलै २०२६ या कट–ऑफ तारखेला समभाग धारण करत असल्यास, ती व्यक्ती **evotingnsdl.co.in** या ईमेल पत्त्यावर विनंती पाठवून आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. तथापि, जर एखादी व्यक्ती आधीच छछ्ब्ब्ड मध्ये नोंदणीकृत असेल तर विद्यमान वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मत देण्यासाठी वापरला जाऊ शकतो किंवा तो/ती ई–वोटिंगसाठी सूचना अंतर्गत वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या चरणांचे पालन करू शकते.

५. रिमोट ई–व्होटिंगला बुधवार, २९ जुलै २०२६ संध्याकाळी ५:०० नंतर परवानगी दिली जाणार नाही.

६. ठरावांवर ई–व्होटिंगसाठी वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी आणि ईमेल पत्त्यांची नोंदणी करण्याची प्रक्रिया वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये अशा भागधारकांसाठी नमूद केली आहे ज्यांचे शेअर्स फिजिकल मोडमध्ये आहेत किंवा ज्यांचे ईमेल पत्ते त्यांच्याकडे डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत नाहीत.

७. सभासदांनी नोंद घ्यावी की, (अ) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दरम्यान एनएसडीएल मार्फत मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल; (ब) ज्या सदस्यांनी रिमोट ई–व्होटिंगद्वारे मतदानाचा हक्क बाजवला आहे ते देखील वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना पुन्हा मत देण्याचा अधिकार असणार नाही; (क) ज्या व्यक्तीचे नाव सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा डिपॉझिटरीज्द्वारे ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदणीमध्ये केवळ कट–ऑफ तारखेला नोंदवलेले असेल ती व्यक्ती वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये रिमोट ई–व्होटिंग / मतदानाची सुविधा घेण्यास पात्र असेल. (ड) कंपनीने २३ जून २०२१ च्या पत्राद्वारे शेअरहोल्डर्सना शेअरहोल्डर्सना पत्र सादर केले आहे, ज्यामध्ये कंपनीला ईमेलद्वारे वार्षिक अहवाल पाठविण्यास सक्षम करण्यासाठी ईमेल पत्ते अपडेट करण्याची विनंती केली आहे. कंपनीच्या वेबसाइटवर ते सादर केले आहे.

८. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना कंपनीच्या **www.pclindia.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तसेच जिथे कंपनीचे समभाग सूचीबद्ध आहेत त्या स्टॉक एक्सचेंजच्या **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** संकेतस्थळावर तसेच NSDL च्या **www.evoting.nsdl.com** संकेतस्थळावर वर देखील उपलब्ध आहे.

९. कोणत्याही शंका असल्यास आपण वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ) पाहू शकता. ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आधी किंवा दरम्यान सहाय्य आवश्यक आहे अशा सभासदांनी **www.evoting.nsdl.com** च्या डाउनलोड विभागात ई–वोटिंग वापरकर्ता पुस्तिका पाहावी किंवा ०२२–४८८६७००० या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा **evotingnsdl.co.in** या ईमेल आयडीवर विनंती पाठवू शकता.

**लाभांशावरील कर:–** आपल्याला हे कळविण्यात येत आहे की, वित्त कायदा २०२० च्या तरतुदींनुसार, १ एप्रिल २०२० पासून कंपनीने घोषित केलेला आणि भागधारकांना दिलेला लाभांश करपात्र असतो आणि कंपनीने दिलेल्या लाभांशातून भागधारकांना लागू असलेल्या दराने स्त्रोतावरील कर (टीडीएस) कापून घेणे आवश्यक्य आहे. त्यानुसार शुक्रवार, २२ मे २०२६ रोजी झालेल्या बैठकीत संचालक मंडळाने शिफारस केलेल्या आर्थिक वर्ष २०२५–२६ साठी प्रती समभाग रू. १.०० इतक्या लाभांशाची शिफारस केली आहे. ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी मंजूर केल्यास, प्राप्तिकर कायदा, १९६१ च्या तरतुदींनुसार स्त्रोतावरील कर (टीडीएस) कपात केल्यानंतर लाभांश भागधारकांना अदा केले जाईल.

स्त्रोतावरील कराचा दर निर्धारित करण्यासाठी तुम्ही आवश्यक ती कागदपत्रे **MUFG Intime India Private Limited** येथे अपलोड करावीत किंवा २२ जुलै २०२६ पूर्वी **tds.dividendpclindia.in** या ईमेलवर पाठवावी. दिनांक २२ जुलै २०२६ नंतर कर निर्धारण / कपातीवरील कोणत्याही संप्रेषणाचा विचार केला जाणार नाही.

**स्थळ : पुणे**
**दिनांक : ०८ जुलै २०२६**

**प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड** करीता
सही/–
**हर्षल ज. खेर**
कंपनी सचिव

## उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांच्या न्यायालयाात.

नि.दि.दा. क्र. ३९३ / २०२२
शिवलीला वि. महादेव नि.क्र. ५१

**वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स ( नियमक्रम ५, नियम १,५ )**

प्रति,
**८. शमशाद बेगम यूनूस जिकरे,**
रा. ३३ सिध्देश्वर नगर, दहिटणे,
हैद्राबाद रोड, जि. सोलापूर.

ज्याअर्थी अर्जदार शिवलिला सिध्दराम भालखेड, रा. तोरणी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर, यांनी सोबतच्या नकलेप्रमाणे यासाठी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी ह्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगायचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नाची उत्तर देवू शकेल अशा वकिलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकिलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे कि, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे. व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्त आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्त ऐवज सादर करावे आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर क्लेम) पृष्ठ्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्ताऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्ताऐवजाचे एक सुची करुन ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावे.

तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दि. ०७/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, उमरगा**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नंबर ३७/२०२६
पुढील नेमलेली ता. २०/०८/२०२६ नि.नं. ५

### बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

**१. मनिषा युवराज गायकवाड,**
वय ३७ वर्षे, धंदा घरकाम,
रा. श्रीपत पिंपरी ता. बार्शी, जि. सोलापूर
**२. यश युवराज गायकवाड**
(अ.प.क - मनिषा युवराज गायकवाड)
वय - ११ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. श्रीपत पिंपरी ता. बार्शी, जि. सोलापूर
**३. विशाखा युवराज गायकवाड (लग्नापूर्वीचे नाव), विशाखा निखिल गोफण (लग्नानंतरचे नाव)**
वय २० वर्षे, धंदा - घरकाम,
रा. पिंपरी (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** **- सामनेवाला**

**बॉम्बे रेग्युलेश ॲक्ट कलम २ प्रमाणे**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचे अनुक्रमे पति व वडील कै. युवराज भगवान गायकवाड याचा मृत्यू दि. ३०/०६/२०२५ रोजी बार्शी - श्रीपत पिंपरी रोडवर, श्रीपत पिंपरी, ता. बार्शी या ठिकाणी झालेला आहे. सदर प्रशासकीय व इतर शासकीय तसेच भविष्यकाली बाबींसाठी कायदेशीर वारस अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी येथे अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मयत कै. युवराज भगवान गायकवाड यांना अर्जदाराशिवाय इतर कोणी वारस असेल अथवा त्यांच्या विषयी काही म्हणणे असल्यास जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसांच्या आत अथवा पुढील नेमलेली तारीख रोजी मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे व हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा मुदतीत कोणाचेही हरकत वा म्हणणे आले नाही तर कुणाची काही म्हणणे नाही. असे समजुन यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल कळावे हे प्रसिध्दकरण मे. कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी दिले असे. ता. ०८/०७/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**बार्शी**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**



# स्वित्झर्लंडची उपांत्यपूर्व फेरीत धडक

### आता गाठ अर्जेंटिनाशी

**व्हँकुव्हर, ८ जुलै**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत स्वित्झर्लंड आणि कोलंबिया यांच्यादरम्यानचा उप-उपांत्यपूर्व सामना निर्धारित वेळेत गोलशून्यने बरोबरीत सुटल्यानंतर पेनॉल्टी शूट-आऊटमध्ये कोलंबियावर ४-३ असा विजय मिळवत स्वित्झर्लंडने विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

रुबेन वर्गासने स्वित्झर्लंडसाठी निर्णायक पेनॉल्टी गोलमध्ये रूपांतरित केले आणि आपल्या संघाला विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचवले. आता स्वित्झर्लंडचा सामना गतविजेत्या अर्जेंटिनाशी होणार आहे.

सामन्यापूर्वी दुखापतीमुळे निर्माण झालेल्या शंकांवर मात करत रुबेन वर्गासने निर्णायक स्पॉट-किक मारली. १२० मिनिटांच्या गोलशून्य बाद फेरीच्या खेळात दोन्ही संघांना आपले वर्चस्व सिद्ध करता आले नाही आणि अखेरीस विजेता ठरवण्यासाठी शूट-आऊटच्या क्रूरतेची गरज लागली.

अतिरिक्त वेळेच्या कालावधीत किमान थोडी अधिक उत्कंठा वाढली, कारण जॉन लुकमने मारलेला हेडर क्रॉसबारवर आदळला आणि जॅमिंग्टन कॅम्पाझने सामन्यातील सर्वोत्तम संधी अनाकलनीयपणे गमावली, ज्या सामन्याचा निकाल कदाचित १२ यार्डांवरून मारलेल्या किक्सच्या लॉटरीनेच योग्यरित्या लागला. ◂ (वृत्तसंस्था)



व्हँकुव्हर येथे झालेल्या फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम-१६च्या सामन्यात, शूटआऊटमध्ये विजयाचा गोल केल्यानंतर स्वित्झर्लंडचा रुबेन वर्गास (डावीकडे) आपल्या सहकाऱ्यांसह आनंद व्यक्त करताना

# उपांत्यपूर्व फेरीत अर्जेंटिना, स्पेन, फ्रान्स, इंग्लंडमध्ये चुरस

**न्यूयॉर्क, ८ जुलै**

फिफा फुटबॉल विश्वचषकात आठ संघ शिल्लक आहेत व उपांत्यपूर्व फेरीत फिफाच्या स्पर्धेपूर्वीच्या पुरुष जागतिक क्रमवारीत अव्वल चार देशांसह अव्वल १० मधील इतर दोन देशांचा समावेश आहे. फ्रान्स एक बलाढ्य संघ म्हणून दिसत आहे व सट्टेबाजीनुसार २-१ पेक्षा कमी दराने तो पसंतीचा संघ आहे, त्यानंतर स्पेन आणि गतविजेता अर्जेंटिना ७-२ दराने, तर इंग्लंड ९-२ दराने दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत. नॉर्वे १४-१ दराने, तर बेल्जियम, स्वित्झर्लंड आणि मोरोक्को २८-१ दराने आहेत.

**फ्रान्स विरुद्ध मोरोक्को**

फ्रान्सने गट फेरीत वर्चस्व गाजवले, प्रतिस्पर्ध्यांवर १०-२ अशी मात केली. नॉर्वेने अर्लिंग हालंड व जवळपास सर्व प्रमुख खेळाडूंना विश्रांती दिली होती, हे लक्षात घेताही ही एक प्रभावी कामगिरी होती. तसेच, बाद फेरीच्या सुरुवातीला त्यांनी स्वीडनवर ३-० ने विजय मिळविला होता. पॅराग्वेविरुद्धच्या चुरशीच्या लढतीत १-० असा विजय मिळविताना किलियन एमबाप्पेने आपल्या कारकिर्दीतील १९वा विश्वचषक गोल केला. उपांत्य फेरी गाठल्यानंतर चार वर्षांनी, मोरोक्कोने आपल्या सलामीच्या सामन्यात ब्राझीलशी बरोबरी साधली, नेदरलँड्सला पेनॉल्टी किक्सवर बाहेर केले व वाईट सुरुवातीनंतर जोरदार मुसंडी मारत सह-यजमान कॅनडाला हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. फ्रान्स पुढे जाण्यासाठी प्रबळ दावेदार आहे.



लिओनेल मेस्सी



हॅरी केन (इंग्लंड)



किलियन एमबाप्पे



अर्लिंग हॉलंड

**स्पेन विरुद्ध बेल्जियम**

सुरुवातीला केप वर्देविरुद्ध अनपेक्षितपणे सामना बरोबरीत सुटल्याने स्पेनची चुरशीचे सामने हाताळण्यासाठी केवळ तयारी झाली होती असे दिसते. त्यांनी उरुग्वेला १-० ने बाहेर केले, आणि ३२ संघांच्या फेरीत ऑस्ट्रियाला ३-० ने सहज हरवल्यानंतर, मिकेल मेरिनोच्या स्टॉपेज टाइममधील गोलमुळे ख्रिस्तियानो रोनाल्डो व पोर्तुगालवर मात केली. बेल्जियमने नियमित वेळेत पाच मिनिटे शिल्लक असताना दोन गोलने पिछाडीवर असताना पुनरागमन करत सेनेगलला हरवले, त्यानंतर फिफाने फोलारिन बालोगुनला त्याच्या आपोआप मिळालेल्या रेड-कार्ड निलंबनानंतरही खेळू दिल्यावर सिएटलमध्ये अमेरिकेचा धुव्वा उडविला. स्पेन विजयासाठी प्रबळ दावेदार आहे.

**नॉर्वे विरुद्ध इंग्लंड**

या स्पर्धेतील अनपेक्षित विजय नॉर्वेचा आहे. नॉर्वे संघाचे नेतृत्व अर्लिंग हॉलंड करीत आहे आणि संपूर्ण अमेरिकेत चाहते व खेळाडू 'वायकिंग रो' करीत आहेत, तर मायदेशी प्रचंड गर्दी जल्लोष साजरा करीत आहे. हॉलंडने आपले सहावे आणि सातवे गोल करून पाच वेळच्या विश्वविजेत्या ब्राझीलला मोठा धक्का दिला आणि या स्कँडिनेव्हियन देशाला पहिल्यांदाच विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचवले. एस्टाडिओ अझ्टेका येथील प्रचंड जल्लोषातही इंग्लंडने अंतिम-१६ संघांच्या फेरीतील थरारक सामन्यात मेक्सिकोला हरवले, पण सामन्यानंतरच्या जल्लोषात अनुभवी मिडफिल्डर जॉर्डन हेंडरसनला मनगटाची दुखापत झाली. इंग्लंडला विजयासाठी किंचित पसंती दिली जात आहे.

**अर्जेंटिना विरुद्ध स्वित्झर्लंड**

लिओनेल मेस्सीने यावर्षी आठ गोलांसह सर्व खेळाडूंमध्ये आघाडी घेतली आहे आणि आपल्या शानदार कारकिर्दीत २१ गोलांचा विश्वचषक विक्रम प्रस्थापित केला आहे , आणि ही संख्या वाढतच आहे. मंगळवारी इजिप्तविरुद्धच्या एका अविस्मरणीय सामन्यात २-० ने पिछाडीवर असताना गोल करून अर्जेंटिनाला ३-२ ने विजय मिळवून दिला, ही मेस्सीची ताजी कामगिरी होती. स्वित्झर्लंडने पाच सामन्यांमध्ये केवळ नऊ गोल केले असून, बचावाच्या शैलीवर अवलंबून ते पुढील फेरीत पोहोचले आहेत. अंतिम-१६ संघांच्या फेरीत कोलंबियाला हरवण्यासाठी त्यांना पेनॉल्टी किक्सचा सामना करावा लागला, कारण निर्धारित वेळेत किंवा अतिरिक्त वेळेत दोन्ही संघांनी एकही गोल केला नव्हता. स्वित्झर्लंड संघ १९५४ नंतर प्रथमच उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला आहे. अर्जेंटिनाला विजयासाठी पसंती दिली जात आहे. ◂ (वृत्तसंस्था)

**उपांत्यपूर्व फेरीचे सामने असे**

**फ्रान्स वि. मोरोक्को**
१० जुलै, शुक्रवारी रात्री १.३० वाजतापासून
**स्थळ :** बॉस्टन स्टेडियम, बॉस्टन
००
**स्पेन वि. बेल्जियम**
११ जुलै शनिवारी रात्री १२.३० वाजतापासून
**स्थळ :** कॅन्सस स्टेडियम, कॅन्सस सिटी
००
**अर्जेंटिना वि. स्वित्झरर्लंड**
१२ जुलै, रविवारी सकाळी ६.३० वाजतापासून
**स्थळ :** कॅन्सस स्टेडियम, कॅन्सस सिटी
००
**नॉर्वे वि. इंग्लंड**
१२ जुलै रविवारी रात्री २.३० वाजतापासून
**स्थळ :** मियामी स्टेडियम, मियामी
**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५) वर

# भारतीय महिलांची ९ पदके निश्चित

### आशियाई १९ व २३ वर्षांखालील मुष्टियुद्ध

**जकार्ता, ८ जुलै**

जकार्ता येथे बुधवारी झालेल्या आशियाई १९ वर्षांखालील व २३ वर्षांखालील मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताच्या २३ वर्षांखालील महिला खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. उपांत्य-पूर्व फेरीच्या लढतींमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करत नऊ बॉक्सरनी उपांत्य फेरीत धडक मारली आणि आपली पदके निश्चित केली.

तनुने (५१ किलो) थायलंडच्या केवालिन नोरासिंगवर ५:० अशा एकमताने वर्चस्वपूर्ण विजय मिळवला, तर निशा (५४ किलो) हिने कझाकस्तानच्या आलियाक्सर सिम्बॅटविरुद्ध ५:० असाच प्रभावी विजय नोंदवला. ४८ किलो वजनी गटातील लढतीत निधीने कडवी झुंज दिली, परंतु कझाकस्तानच्या गुलनाझ बुरीबायेव्हाकडून तिला ३:२ अशा 'स्प्लिट डिसिजन'ने (विभाजित निर्णयाने) निसटता पराभव पत्करावा लागला.

भारताची विजयी घोडदौड सुरूच राहिली. प्राचीने (५७ किलो) कोरियाच्या येजिन ओहविरुद्ध पहिल्याच फेरीत 'आरएससी' द्वारे दमदार विजय मिळवला. त्यानंतर निकिता चंदने (६० किलो) चायनीज तैपेईच्या चेन-क्सुआन ये हिचा तिसऱ्या फेरीत 'आरएससी'द्वारे सहज पराभव केला, तर काजलने (६५ किलो) जपानच्या अरिंदा अकिमोटोवर ४:१ अशा 'स्प्लिट डिसिजन'ने चुरशीच्या लढतीत मात केली. या निकालांमुळे, भारताने २३ वर्षांखालील महिला स्पर्धेत एकूण नऊ पदके निश्चित केली आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

## इजिप्तचे प्रशिक्षक हसन यांना पिवळे कार्ड

**अटलांटा :** अर्जेंटिनाविरुद्धच्या विश्वचषक पराभवात वर्णद्वेषविरोधी कृती केल्याबद्दल इजिप्तचे प्रशिक्षक होसाम हसन यांना पिवळे कार्ड दाखवण्यात आले. मंगळवारी फिफा विश्वचषकाच्या अंतिम-१६ संघांच्या फेरीत अर्जेंटिनाकडून झालेल्या ३-२ च्या नाट्यमय पराभवावेळी, फिफाच्या वर्णद्वेषविरोधी कृतीबद्दल इजिप्तचे प्रशिक्षक होसाम हसन यांना पिवळे कार्ड दाखवण्यात आले. हसन यांची ही कृती अटलांटा स्टेडियमवरील सामन्याच्या शेवटच्या गोंधळलेल्या टप्प्यात घडली. ◂ (वृत्तसंस्था)

# भारत 'अ' संघ न्यूझीलंड दौऱ्यावर

**नवी दिल्ली, ८ जुलै**

भारत आणि न्यूझीलंडचे वरिष्ठ संघ या वर्षाच्या अखेरीस एक मालिका खेळणार आहेत. या मालिकेच्या तयारीसाठी भारत 'अ' संघ न्यूझीलंडचा दौरा करणार आहे. या दौऱ्यात तीन लिस्ट 'अ' सामने व दोन प्रथम-श्रेणी सामन्यांचा समावेश असेल, यात राष्ट्रीय कसोटी संघातील काही खेळाडूही सहभागी होऊ शकतात.

वरिष्ठ संघात स्थान मिळवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या खेळाडूंसाठी हा भारत 'अ' दौरा एक महत्त्वाचा तयारीचा मंच ठरू शकतो.

या महत्त्वाच्या मालिकेपूर्वी न्यूझीलंडच्या परिस्थितीत आवश्यक सराव मिळावा यासाठी संघात काही वरिष्ठ खेळाडूंचाही समावेश केला जाऊ शकतो. भारत 'अ' संघ या दौऱ्यावर तीन ५०-षटकांचे सामने आणि त्यानंतर दोन प्रथम-श्रेणी कसोटी सामने खेळेल. यामुळे संघ व्यवस्थापनाला वरिष्ठ संघाच्या सामन्यांपूर्वी कसोटी आणि कसोटी दोन्ही पर्याय आजमावून पाहण्याची संधी मिळेल. तिथल्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी संघ प्रथम श्रीलंकेत दाखल होईल.

१५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीपूर्वी वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी, संघ ८ ऑगस्टपासून श्रीलंका बोर्ड प्रेसिडेंट्स इलेव्हनविरुद्ध एक सराव सामना खेळण्याची शक्यता आहे. दोन सामन्यांची कसोटी मालिका सुरू होण्यापूर्वी खेळाडूंना तेथील परिस्थितीशी जुळवून घेण्यास मदत करणे, हा या सराव सामन्याचा उद्देश आहे. यात राष्ट्रीय कसोटी संघातील काही खेळाडूही सहभागी होण्याची शक्यता आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# लिएंडर पेस 'एटीएफ'चा 'प्लेअर ॲम्बेसेडर'

**लंडन, ८ जुलै**

आशियाई टेनिस महासंघाने (एटीएफ) खेळाडूंची पुढील पिढी घडवण्यासाठी व संपूर्ण आशिया खंडात या खेळाचा विकास गतिमान करण्यासाठी दिग्गज टेनिसपटू लिएंडर पेस याची 'प्लेअर ॲम्बेसेडर' (खेळाडूंचा सदिच्छादूत) म्हणून नियुक्ती केली आहे.

विम्बल्डन स्पर्धेदरम्यान एटीएफचे अध्यक्ष युरी पोल्स्की, वरिष्ठ अधिकारी, खेळाडू व आंतरराष्ट्रीय टेनिस समुदायातील सदस्यांच्या उपस्थितीत ही घोषणा करण्यात आली. टेनिसच्या इतिहासातील सर्वात यशस्वी खेळाडूंपैकी एक असलेल्या पेसने तीन दशकांहून अधिक काळ व्यावसायिक कारकीर्द गाजविली.

१९९६ च्या अटलांटा ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या लिएंडर पेसने १८ ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदे (पुरुष दुहेरीत ८ व मिश्र दुहेरीत १०) पटकावली आहेत; तसेच या दोन्ही प्रकारांत त्याने 'करिअर ग्रॅण्ड स्लॅम' पूर्ण करण्याचा पराक्रमही केला आहे.



**लिएंडर पेस**

दुहेरी प्रकारात एकेकाळी जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान भूषविलेला व 'डेव्हिस चषक कमिटमेंट अवॉर्ड'चा मानकरी असलेला पेस हा आशियातील टेनिसचा महान राजदूत व भारतातील सर्वात लोकप्रिय क्रीडा व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत.

'प्लेअर ॲम्बेसेडर' म्हणून, पेस एटीएफसोबत मिळून संपूर्ण खंडात टेनिसचा प्रसार करणे, युवा खेळाडूंना मार्गदर्शन करणे, तळागाळातील विकास कार्यक्रमांना पाठिंबा देणे आणि प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये फेडरेशनचे प्रतिनिधित्व करणे यांसारखी कामे करतील.

एटीएफकडून ज्युनियर, व्यावसायिक आणि व्हीलचेअर स्पर्धांचे भक्कम वेळापत्रक, प्रशिक्षक व अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, उच्च-स्तरीय कामगिरीसाठीचे उपक्रम आणि राष्ट्रीय संघटनांना बळकट व खेळातील सहभाग वाढवण्याच्या उद्देशाने विकास प्रकल्प राबवून आशियातील खेळाडूंसाठी संधींचा विस्तार केला जात असतानाच ही नियुक्ती करण्यात आली आहे.

या भागीदारीमुळे जागतिक दर्जाचे आशियाई खेळाडू घडविण्याचे एटीएफचे ध्येय अधिक बळकट होईल आणि त्याचबरोबर संपूर्ण खंडातील लाखो उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा मिळेल, असा विश्वास एटीएफला वाटतो.

आशियाई टेनिस महासंघामध्ये 'प्लेअर ॲम्बेसेडर' म्हणून सहभागी होणे ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. आशियामध्ये प्रचंड गुणवत्ता, जिद्द आणि क्षमता आहे. ज्या खेळाने मला इतके काही दिले आहे, त्या खेळासाठी काहीतरी योगदान देण्यास मी उत्सुक आहे, असे २०२४ मध्ये 'इंटरनॅशनल टेनिस हॉल ऑफ फेम'मध्ये खेळाडूंच्या श्रेणीत स्थान मिळालेल्या पेसने सांगितले.

एटीएफसोबत मिळून, मी युवा खेळाडूंना मोठी स्वप्ने पाहण्यासाठी, कठोर परिश्रम करण्यासाठी आणि जगातील सर्वोत्तम खेळाडूंशी स्पर्धा करण्याचा आत्मविश्वास बाळगण्यासाठी प्रेरित करेन, अशी मला आशा आहे, असेही तो म्हणाला. तळागाळात टेनिसचा विकास करणे आणि त्याच वेळी उत्कृष्टतेकडे वाटचाल करण्यासाठी संधी निर्माण करणे, हे आमचे सामायिक उद्दिष्ट असेल, असे एटीएफचे अध्यक्ष पोल्स्की यांनी सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

# मालिका वाचवण्यासाठी भारतीय संघाची धडपड



हॅरी ब्रुक



श्रेयस अय्यर

**ब्रिस्टल, ८ जुलै**

तिसरा टी-२० सामना गमावल्यानंतर आता श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ गुरुवारी इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या मालिकेतील निर्णायक चौथ्या टी-२० सामन्यासाठी सज्ज होत आहे.निवडीबाबतचा सर्वात मोठा पेच संजू सॅमसनच्या बाबतीत निर्माण झाला आहे; त्याला दुसऱ्या व तिसऱ्या टी-२० सामन्यातून वगळून १५ वर्षीय आक्रमक फलंदाज वैभव सूर्यवंशीला संधी देण्यात आली होती. या किशोरवयीन खेळाडूची कामगिरी आतापर्यंत संघातील इतर खेळाडूंपेक्षा वाईट किंवा खूप चांगली अशी झालेली नाही. मात्र, संघ सध्या मालिकेत ०-२ ने पिछाडीवर असल्याने, भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी सॅमसनच्या पुनरागमनाची शक्यता फेटाळून लावलेली नाही.

**भारत-इंग्लंड चौथा टी-२० सामना**
**वेळ :** रात्री १०.०० वाजतापासून
**स्थळ :** ब्रिस्टल
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्टसवर

अवघ्या चार महिन्यांत सॅमसनच्या कारकिर्दीत प्रचंड चढ-उतार पाहायला मिळाले आहेत.

पुनरागमन मालिकेत अनपेक्षितपणे कर्णधारपद सोपवल्यानंतर पहिल्या विजयाच्या शोधात असलेल्या कर्णधार अय्यरला दोष देणे अन्यायकारक ठरेल; मात्र, गंभीर यांच्या नेतृत्वाखालील प्रशिक्षक मंडळ आणि अजित आगरकर यांची निवड समिती यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. संघ व्यवस्थापनाने घेतलेले रणनीतिक निर्णय चाहत्यांनाही फारसे पसंत पडलेले नाहीत. तिसऱ्या टी-२० सामन्यात १२५ धावांनी दारुण पराभव पत्करल्यानंतर, गंभीर यांच्या नेतृत्वाखालील संघ जेव्हा बसकडे निघाला, तेव्हा ट्रेंट ब्रिज स्टेडियमबाहेर "आम्हाला संजू हवा आहे" अशा घोषणांचा आवाज घुमला. ◂ (वृत्तसंस्था)

# नोस्कोव्हाची उपांत्य फेरीत धडक

### पुढील लढत कोस्त्युकशी



लिंडा नोस्कोव्हा

**लंडन, ८ जुलै**

झेक प्रजासत्ताकच्या लिंडा नोस्कोव्हाने आपल्या कारकिर्दीतील पहिल्या ग्रँड स्लॅम उपांत्य फेरीत धडक मारली आहे. लंडनमधील 'ऑल-इंग्लंड लॉन टेनिस क्लब'च्या 'कोर्ट क्रमांक १'वर बुधवारी झालेल्या सामन्यात तिने एलिस मर्टेन्सचा ६-३, ७-५ असा पराभव करून विम्बल्डन २०२६ च्या अंतिम चार खेळाडूंच्या फेरीत (उपांत्य फेरीत) आपले स्थान निश्चित केले.

नवव्या मानांकित चेक खेळाडूने प्रत्येक सेटमध्ये बेल्जियन खेळाडूची सर्व्हिस एकदा मोडली आणि आपल्या २१ वर्षांच्या वयाला साजेसा नसलेला, मोठ्या सामन्यांमधील परिपक्व खेळ दाखवून दिला. नोस्कोव्हा गेल्या वर्षी विम्बल्डनच्या चौथ्या फेरीपर्यंत पोहोचली होती आणि २०१८ मधील येलेना ओस्टापेंकोनंतर 'ऑल-इंग्लंड क्लब'मध्ये उपांत्य फेरी गाठणारी ती सर्वात तरुण खेळाडू ठरली आहे.

उपांत्य फेरीत नोस्कोव्हाचा सामना युक्रेनच्या मार्ता कोस्त्युकशी होईल; या लढतीमुळे ग्रँड स्लॅम स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी एक नवीन खेळाडू निश्चित होईल.

कोस्त्युकने आपली शानदार कामगिरी कायम राखत बुधवारी 'सेंटर कोर्ट'वर इटलीच्या जास्मिन पाओलिनीचा ६-३, ६-२ असा सहज पराभव केला आणि आपल्या कारकिर्दीतील पहिली विम्बल्डन उपांत्य फेरी व सलग दुसरी ग्रँड स्लॅम उपांत्य फेरी गाठली.

१२ व्या मानांकित कोस्त्युकने गेल्या वर्षीच्या उपविजेत्या खेळाडूला हरवण्यासाठी केवळ एक तास नऊ मिनिटे घेतली. या विजयामुळे 'डब्ल्यूटीए (WTA) टूर'वरील तिच्या गेल्या २२ सामन्यांमधील विजयांची संख्या २१ वर पोहोचली आहे. तसेच, २०२६ च्या फ्रेंच ओपनमधील उपांत्य फेरीतील कामगिरीनंतरचा हा तिचा आणखी एक मोठा टप्पा असून, त्यावरून प्रमुख स्पर्धांमधील तिची सातत्यपूर्ण कामगिरी दिसून येते.

'सेंटर कोर्ट'वर पहिल्यांदाच खेळताना कोस्त्युकने आक्रमक शैलीचे प्रदर्शन केले. तिने १९ 'विनर्स' (थेट गुण मिळवणारे फटके) मारले, ज्यामध्ये अनेक नेत्रदीपक 'रिटर्न विनर्स'चा समावेश होता; यामुळे पाओलिनीवर सतत दडपण राहिले. ◂ (वृत्तसंस्था)

# माझ्या वडिलांचे स्वप्न पूर्ण

### यश ठाकूर यांचे मत

**नवी दिल्ली, ८ जुलै**

माझ्या वडिलांनी मला भारतीय संघाकडून खेळताना पाहण्याचे स्वप्न पाहिले होते. आता, जेव्हा ते स्वप्न साकार होणार आहे, तेव्हा दुर्दैवाने त्याचे वडील ते पाहण्यासाठी हयात नाहीत, असे विदर्भाचा वेगवान गोलंदाज यश ठाकूर म्हणाला.

भारतीय संघात निवड झाल्यावर यश ठाकूर माध्यमांशी बोलत होता. विदर्भाचा वेगवान गोलंदाज यश ठाकूर झिम्बाब्वेच्या आगामी दौऱ्यात भारतीय संघाच्या ड्रेसिंग रूममध्ये पाऊल ठेवेल. यश ठाकूरने जवळपास एक दशकापासून देशांतर्गत क्रिकेटमध्ये अथक परिश्रम घेतले आहेत.

२७ वर्षीय यश ठाकूरला नुकताच त्याच्या व्यावसायिक आयुष्यातील कदाचित सर्वात महत्त्वाचा फोन आला, जेव्हा तो



**यश ठाकूर**

श्रीलंकेच्या 'भारत अ' संघाच्या दौऱ्यावरून परतल्यानंतर नागपूर विमानतळावर आपले सामान घेण्यासाठी थांबला होता. हा फोन त्याला झिम्बाब्वे दौऱ्यासाठी भारतीय संघात पहिल्यांदाच झालेल्या निवडीबद्दल माहिती देण्यासाठी होता. भारतीय संघ या दौऱ्यात २३ ते २६ जुलै दरम्यान तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळणार आहे. खरं सांगायचं तर, मला याची अपेक्षा नव्हती कारण मी नुकताच श्रीलंका दौऱ्यावरून परतलो होतो. मला इतक्या लवकर भारतीय संघात स्थान मिळेल अशी मी कधी कल्पनाही केली नव्हती, असेही तो म्हणाला.

त्याने २०१७ मध्ये लिस्ट ए मध्ये पदार्पण केले आणि ५७ सामन्यांमध्ये १०० बळी घेण्याच्या जवळ पोहोचला आहे. त्याने दोन वेगवेगळ्या फ्रँचायझींसाठी २२ आयपीएल सामन्यांसह एकूण ७४ टी-२० सामने खेळले आहेत. इतकेच नाही तर, लखनौ सुपर जायंट्सकडून खेळताना आयपीएलमध्ये भारतीय गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्न मॉर्केल यांच्याशी त्याचे चांगले संबंध निर्माण झाले. ठाकूरला अननुभवी म्हणणे अन्यायकारक ठरेल. रणजी ट्रॉफी, दुलीप ट्रॉफी, इराणी कप आणि विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळलेला तो भारतीय क्रिकेट प्रणालीचे खरोखरच एक उत्तम उदाहरण आहे, आणि नंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) संभाव्य वेगवान गोलंदाजांच्या यादीत त्याचा समावेश करण्यात आला. वरिष्ठ भारतीय संघाकडून खेळण्याचे त्याचे स्वप्न लवकरच पूर्ण होईल, असा त्याला विश्वास आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# ही एका अद्भुत प्रवासाची सुरुवात

**सूर्यकुमार यादवचा सूर्यवंशीला संदेश**

**नवी दिल्ली, ८ जुलै**

१५ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशी याची ही रोमांचक क्रिकेट प्रवासाची सुरुवात आहे आणि तो देशाला गौरव मिळवून देत राहील, अशा शब्दात माजी कर्णधार सूर्यकुमार यादवने सूर्यवंशीचे कौतुक केले.

बिहारचा रहिवासी असलेल्या सूर्यवंशीने ओल्ड ट्रॅफर्ड येथे इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात पदार्पण केले आणि भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला.

त्याने वयाच्या १६ व्या वर्षी पदार्पण करणाऱ्या महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला.

यावर्षी मायदेशात भारताला विश्वचषक जिंकून देणारे माजी कर्णधार सूर्यकुमार यादवने समाज माध्यमावर लिहिले की, मी संघासाठी खूप आनंदी आहे. मी खेळाडूंना नेहमीच शुभेच्छा देतो. मला माहित आहे की सर्व खेळाडू त्यांचे सर्वोत्तम देत आहेत आणि त्यांना माझा पूर्ण पाठिंबा असेल.

वैभव सूर्यवंशी, तुझ्यासाठी एक विशेष संदेश-ही तुझ्या एका अत्यंत रोमांचक प्रवासाची सुरुवात आहे. प्रत्येक क्षणाचा आनंद घे आणि देशाला गौरव मिळवून देत राहा, असे त्याने नमूद केले. ◂ (वृत्तसंस्था)

# सीना-माढा उपसा सिंचन योजनेंतर्गत १६९ तलाव भरावेत : आ. पाटील

## विधानभवनात जलसंपदा मंत्री आणि पालकमंत्र्यांची घेतली भेट; अधिकाऱ्यांना तातडीचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ जुलै-**
सीना माढा उपसा सिंचन योजना तात्काळ सुरू करावी यासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना भेटून निवेदन दिले.

यावेळी सीना माढा उपसा योजनेअंतर्गत असलेल्या १६९ तलावांमध्ये तातडीने पाणी भरून माढा तालुक्यातील भीषण पाणीटंचाई दूर करावी, असे निवेदन त्यांनी मंत्र्यांना दिले.

यासोबतच माढा तालुक्यात निर्माण झालेली आवर्षणसदृश्य परिस्थिती लक्षात घेऊन उजनी धरणाच्या बोगद्यातून सीना नदीत तात्काळ पाणी सोडण्यात यावे, अशीही महत्त्वपूर्ण मागणी करण्यात आली. या दोन्ही मागण्यांची दखल घेत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

यानंतर आमदार अभिजीत पाटील यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचीही भेट घेत माढा तालुक्यातील पाणीप्रश्नाबाबत सविस्तर चर्चा केली. सीना-माढा उपसा सिंचन योजना त्वरित



कार्यान्वित करून १६९ तलाव भरावेत तसेच उजनी धरणातून सीना नदीत पाणी सोडण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी पालकमंत्र्यांकडेही

> माढा तालुक्यातील पाणीटंचाई, सिंचन, शेती आणि वीजपुरवठा या चारही महत्त्वाच्या प्रश्नांवर आमदार अभिजित पाटील यांनी आवाज उठवल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना तातडीने आदेश व सूचना दिल्यामुळे या मागण्यांवर लवकरच सकारात्मक कार्यवाही होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

केली. या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. याचवेळी शेतकऱ्यांच्या आणखी एका जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधत आमदार अभिजित पाटील यांनी भीमा नदीकाठच्या गावांतील शेतीपंपांना दररोज किमान ८ तास अखंड वीजपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी मागणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत असल्याने तातडीने ८ तासांचा नियमित वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

## महत्वाचे...



### उद्योगविश्वातील संधींसाठी विद्यार्थ्यांना आधुनिक ऑटोमेशनचे प्रशिक्षण

**सोलापूर, दि. ८ जुलै-**
एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर येथील विद्युत अभियांत्रिकी विभाग आणि प्रशिक्षण व रोजगार (टी अँड पी) सेल यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीय वर्ष विद्युत अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी ६ ते ११ जुलै या कालावधीत 'पीएलसी अँड स्काडा ऑटोमेशन ट्रेनिंग प्रोग्राम' या उद्योगाभिमुख प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना Siemens व Allen-Bradley पीएलसी प्रोग्रामिंग, स्काडा डेव्हलपमेंट, इंडस्ट्रियल कम्युनिकेशन अँड नेटवर्किंग तसेच रिअल-टाईम इंडस्ट्रियल ऑटोमेशन ॲप्लिकेशन्सचे सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षण अनुभवी उद्योगतज्ज्ञांकडून दिले जात आहे. यासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक प्रणालींवर काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आल्याने त्यांच्या तांत्रिक कौशल्यांमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. कार्यक्रमासाठी कार्यक्रम समन्वयक प्रा. अनंतराव व्ही. पाटील, विभागप्रमुख डॉ. विजयकुमार एस. बिरादार, सहसमन्वयक म्हणून प्रा. एम. टी. शिंदे यांनी काम पाहिले. हा कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली प्राचार्य डॉ. एस. डी. नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.



### आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते महेश मेंगजी यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ८ जुलै-**
श्री. सो. स. क्षत्रिय समाज सेवा मंडळ व विठ्ठल मंदिर, सोलापूर संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक सन २०२६-३१ करिता चव्हाण उद्योग समूहाचे शिवप्रकाश अंबादास चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सहस्त्रार्जुन विकास पॅनेलचा विजय झाल्याने आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते महेश मेंगजी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक संजय कोळी, अमर पुदाले, किशोर बारड, श्रीगिरी उपस्थित होते.



### तडीपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या इसमावर पोलिसांची कारवाई

**बार्शी, दि. ८ जुलै-**
बार्शी तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत तडीपार आदेशाचे उल्लंघन करुन फिरणाऱ्या एका इसमावर बार्शी तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. दि. ७ जुलै रोजी सपोनि सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे जामगाव येथील बाळराजे चौक परिसरात एक तडीपार इसम फिरत आहे. त्यानुसार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जाऊन संशयित इसमास ताब्यात घेतले. चौकशीअंती त्याचे नाव तथागत मुकेश मस्के (वय २४ वर्षे, रा. भीमनगर, बार्शी) असे असल्याचे निष्पन्न झाले. संबंधित इसमास बार्शी तालुक्यात फिरण्याबाबत विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. तपासात त्याच्याविरुद्ध उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर यांनी दिलेल्या सोलापूर व धाराशिव जिल्हा तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी संबंधित इसमाविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १४२ अन्वये बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बार्शी तालुका पोलीस करीत आहेत.

### बी.फार्मसीनंतर आयटी क्षेत्रात अनेक संधी : डॉ. संजय बैस

**सांगोला, दि. ८ जुलै-**


फार्मसी क्षेत्राबरोबरच हेल्थकेअर आयटीमधील कौशल्ये आत्मसात करून जागतिक स्तरावरील करिअरच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोलाचे प्राचार्य डॉ.संजय बैस यांनी केले. फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोला येथे विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षणाबरोबरच हेल्थकेअर आयटी, एचआयपीएए, डिजिटल हेल्थकेअर प्रणाली, संवाद कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. यावेळी ते बोलत होते. पालकांनीही आपल्या मुलींना गुणवत्तापूर्ण फार्मसी शिक्षणासोबत आधुनिक हेल्थकेअर आयटी कौशल्ये मिळवून देण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहनही डॉ. बैस यांनी केले आहे.

## निधन वृत्त...

### पद्मिनी वेदपाठक

**करमाळा, दि. ८ जुलै-**


उमरड (ता.करमाळा) येथील रहिवासी पद्मिनी छगन वेदपाठक यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. जेऊरचे स्वर्णकार संतोष वेदपठाक यांच्या त्या मातोश्री होत.

## सहकारमहर्षि साखर कारखान्यामध्ये मिल रोलर पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ जुलै-**
सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामध्ये गळीत हंगाम २०२६-२७ चे मील रोलरचे पूजन बुधवार दि.०८८ जुल रोजी सकाळी ९:३० वाजता कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकर माने-देशमुख यांच हस्ते झाले.

कारखान्याचे मार्गदर्शक संचालक विजयसिंह मोहिते-पाटील, चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखान्याची वाटचाल प्रगतीपथावर आहे.

कारखान्याने गत हंगाम २०२५-२६ मधील सर्व ऊस पुरवठादार शेतक-यांची ऊस बीले, तोडणी वाहतूक बीले अदा केली आहेत.

सदर कार्यक्रम प्रसंगी कारखान्याचे संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, रावसाहेब मगर, अमरदिप काळकुटे, गोविंद पवार,





जयदिप एकतपुरे, सुभाष कटके, रामचंद्र ठवरे, संचालिका सुजाता शिंदे, तज्ञ संचालक प्रकाशराव पाटील व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटीचे संचालक पांडूरंग एकतपुरे, श्रीकांत बोडके, दत्तात्रय मगर, अशोक पताळे तसेच कार्यलक्षी संचालक जयवंत माने-देशमुख, माजी संचालक भिमराव काळे, भारत फुले, शिवाजी सिद, विजय माने-देशमुख, राजेंद्र मोहिते, कार्यकारी संचालक सुहास यादव, सर्व खातेप्रमुख, कामगार व युनियन प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अकलूज येथे शिवशंकर व सोलापूर जिल्हा विद्युत कामगार पतसंस्थेची सभा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. ८ जुलै-**
अकलूज येथील श्री शिवशंकर वीज कामगार सहकारी पतसंस्था ४२ वी आणि सोलापूर जिल्हा विद्युत कामगार ग्राहक सहकारी पतसंस्था ४१ वी यांची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. संयुक्त सभेच्या अध्यक्षस्थानी इंटकचे जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील होते.

यावेळी व्यासपीठावर शिवशंकर पतसंस्थेचे चेअरमन राजाराम घुगे, विद्युत कामगार ग्राहक पतसंस्थेचे चेअरमन युवराज ओहोळ,आनंदराव पाखरे, किशोर जाधव, नागनाथ पांढरे, संतोष चव्हाण, सत्यशील गायकवाड, प्रदीप सुरवसे, सिद्धाराम चव्हाण, डॉ.माधव लवटे उपस्थित होते.

डॉ.धवलसिंह मोहिते- पाटील यांनी पतसंस्थांच्या प्रगतीचा गौरव केला. ते म्हणाले, पतसंस्थेची उत्तरोत्तर होणारी आर्थिक प्रगती, वाढती सभासद संख्या, सभासदांना दिला जाणारा आकर्षक लाभांश, संस्थेचा शिस्तबद्ध व पारदर्शक कारभार कौतुकास्पद आहे. चेअरमन राजाराम घुगे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आलेख मांडताना सांगितले की, संस्थेची वार्षिक उलाढाल सध्या १३ कोटी रुपयांच्या आसपास असून एकूण सभासद संख्या ३९९ आहे. सभेचे औचित्य साधून संस्थेतील सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांचाही सत्कार केला.

## ११ व १२ जुलैला थेट बाजार पेठचे आयोजन

**सोलापूर, दि. ८ जुलै-**
महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने स्थानिक उद्योजक, महिला बचतगट, कारागीर आणि लघुउद्योजकांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी अमृत पेठ-थेट बाजार पेठ हा प्रदर्शन व विक्री मेळावा ११ व १२ जुलै रोजी होईल. हा मेळावा मंगल्य मंगल कार्यालय, येथे सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी खुला राहणार आहे. या प्रदर्शनामध्ये भारतीय वस्त्रे व हस्तकला, हस्तनिर्मित उत्पादने, लोणची, पापड, घरगुती खाद्यपदार्थ, सेंद्रिय व नैसर्गिक उत्पादने, आयुर्वेदिक उत्पादने, महिला उद्योजिका व बचतगटांची उत्पादने, तसेच गुणवत्तापूर्ण व ब्रँडेड वस्तू एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. या उपक्रमाचे आयोजन जिल्हा व्यवस्थापक श्रेयस कुलकर्णी, बिरुदेव वाघमोडे आणि आर्या कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

## उजनीच्या पाणी पातळीत वाढ; विद्युत पंप काढण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. ८ जुलै-**
पुणे जिल्ह्यात पडलेल्या मुसळधार पावसाने उजनी जलाशयात झपाटणे वाढ होत आहे.त्यामुळे धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांनी उन्हाळ्यात पाणी उचलण्यासाठी खाली नेलेल्या मोटारी वर घेण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे.

मागील काही दिवसात वजा २६ टक्के वर गेलेले धरण पुणे जिल्ह्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे झपाट्याने भरत आहे. दौंड वरून येणारा विसर्ग तब्बल दीड लाखांच्या आसपास आहे. त्यामुळे धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांना आपले विद्युत पंप, स्टार्टर, पाईप, केबल इत्यादी साहित्य सुरक्षित स्थळी नेण्यासाठी धांदल उडाली आहे. अचानक आलेल्या पाण्यामुळे उजनी धरण क्षेत्रातील फुगवट्यावर असणाऱ्या उमरड, सोगाव, मांजरगाव, वाशिंबे अशा धरण काठावरील गावातील शेतकऱ्यांना पाणी वाढताक्षणी धावपळ करून पाणीपुरवठा योजनेचे सर्व साहित्य लगबगीने वर काढावे लागत आहे. अचानक वाढत असलेल्या पाण्यामुळे शेतकऱ्यांना पाण्यातून विद्युत पंप व इतर साहित्य वर काढण्याची वेळ आली आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी उजनी धरण वजा मध्ये जात असल्याने मोठमोठ्या चाऱ्या खोदून पाणी आपल्या पाईपलाईन पर्यंत आणण्याची व्यवस्था एकत्रितपणे केली आहे.

गतवर्षी पाण्याचे योग्य नियोजन न झाल्याने धरण १००% भरून सुद्धा उन्हाळ्यात पाणी पातळी झपाट्याने कमी झाली होती यंदा तरी शेतकऱ्यांवर ती वेळ येऊ नये असे बोलले जात आहे.

## जिल्ह्यातील फळबागायतदारांनी पिकविमा काढावा : भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**
प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना खरीप हंगाम २०२६ साठी केंद्र शासन व राज्य शासनाच्या सहकार्याने सुरू करण्यात आली असून, सोलापूर जिल्ह्यासाठी डाळिंब, पेरू, लिंबू, चिकू, सीताफळ व द्राक्ष ही फळपिके अधिसूचित करण्यात आली आहेत. पात्र फळबाग धारक शेतकऱ्यांनी विहित मुदतीत विमा संरक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

या योजनेनुसार डाळिंब (उत्पादनक्षम वय २ वर्षे), पेरू (३ वर्षे), लिंबू (४ वर्षे), चिकू (५ वर्षे), सीताफळ (३ वर्षे) आणि द्राक्ष (२ वर्षे) या फळपिकांचा समावेश करण्यात आला आहे. डाळिंब, पेरू, लिंबू व द्राक्ष या पिकांसाठी विमा भरण्याची अंतिम मुदत १४ जुलै २०२६, चिकूसाठी ३० जुलै २०२६, तर सीताफळासाठी ३१ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या नजीकच्या कॉमन सर्व्हिस सेंटर , बँक किंवा आपले सरकार सेवा केंद्र येथे भेट देऊन विहित मुदतीपूर्वी फळबागेचा विमा उतरवून घ्यावा.

## एमआयटी स्कूलमध्ये पालक-शिक्षक संघ कार्यकारी समितीची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**
एमआय.टी. विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठी पालक-शिक्षक कार्यकारी समितीची निवडणूक लोकशाही वातावरणात संपन्न झाली.

प्राचार्या रूपाली हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच निवडणूक समितीच्या देखरेखीखाली ही निवड प्रक्रिया महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क नियमन) कायदा व नियमांनुसार यशस्वीरीत्या पार पडली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित पालकांचे स्वागत करण्यात आले.





यावेळी प्राचार्या रूपाली हजारे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत पालक-शिक्षक संघाची उद्दिष्टे, भूमिका आणि जबाबदाऱ्या याविषयी मार्गदर्शन केले. शाळेच्या प्रगतीसाठी पालकांनी सहकार्याची भूमिका निभावावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यकारी पालक-शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष (पालक), सहसचिव (पालक) तसेच इयत्तानिहाय पालक सदस्यांची निवड विहित नियमांनुसार करण्यात आली. पात्र उमेदवारांच्या अर्जांची छाननी करून अंतिम यादी जाहीर करण्यात आली. ज्या पदांसाठी उपलब्ध जागांपेक्षा अधिक नामांकने प्राप्त झाली होती, त्या ठिकाणी सर्व उपस्थित पालकांच्या साक्षीने पूर्ण पारदर्शकतेने चिठ्ठीद्वारे निवड प्रक्रिया राबविण्यात आली. विद्यार्थ्यांच्या हस्ते पालकांच्या उपस्थितीत हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या आणि प्रत्येक टप्प्यानंतर निवड झालेल्या प्रतिनिधींची नावे अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. सूत्रसंचालन श्वेता चव्हाण यांनी केले आणि अर्चना बिचल यांनी आभार मानले.

# प्राथमिक शिक्षण विभागातर्फे मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश वितरणाला वेग

## ४ लाख विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके; दोन लाख विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी निधी वितरित; उर्वरित विद्यार्थ्यांना गणवेश ४-५ दिवसांत मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**
सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत नव्या शैक्षणिक वर्षाची तयारी अंतिम टप्प्यात असून समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तक व गणवेश वितरणाला वेग आला आहे. जिल्ह्यातील इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षण विभागाने वितरणाची व्यापक मोहीम राबविली आहे. प्राथमिक शिक्षण विभागाने उर्वरित पाठ्यपुस्तके आणि गणवेशांचे वितरण लवकर पूर्ण करून प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य वेळेत उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे.

मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ३,८४५ शाळांमधील ४ लाख ३१ हजार विद्यार्थ्यांसाठी २१ लाख ९९ हजार ५२२ पाठ्यपुस्तकांची मागणी नोंदविण्यात आली होती. त्यापैकी १९ लाख ३२ हजार ४०८ (८७.८६ टक्के) पाठ्यपुस्तके तालुका स्तरावर प्राप्त होऊन शाळांमध्ये वितरित करण्यात आली आहेत.

उर्वरित २ लाख ६७ हजार ११४ (१२.१४ टक्के) पाठ्यपुस्तके अद्याप प्राप्त झालेली नाहीत. विशेषतः कन्नड व उर्दू माध्यमातील काही पुस्तके तसेच बदललेल्या अभ्यासक्रमातील काही विषयांची पुस्तके छपाईनंतर उपलब्ध होताच तातडीने शाळांपर्यंत पोहोचविण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मोफत गणवेश योजनेअंतर्गत जिल्ह्यातील २,८४१ शाळांमधील १ लाख ८० हजार ५२७ विद्यार्थ्यांसाठी ४ कोटी ३३ लाख

> समग्र शिक्षाअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील सर्व मुली, अनुसूचित जाती-जमाती, दारिद्र्यरेषेखालील व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दोन गणवेशांसाठी ६०० रुपये, तर बूट व मोज्यांसाठी १२० रुपये इतके अनुदान दिले जाते. तसेच जिल्ह्यातील ३९ पीएम श्री शाळांनाही प्रति विद्यार्थी दोन गणवेशांसाठी स्वतंत्र निधी वितरित करण्यात आला आहे.

२६ हजार ४८० रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. शासनाकडून पहिल्या टप्प्यात प्रति विद्यार्थी २४० रुपये (८० टक्के) अनुदान उपलब्ध करून देण्यात आले असून त्यानुसार शाळा व्यवस्थापन समित्यांमार्फत गणवेश शिवण्याची प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत १ लाख २४ हजार ५६४ विद्यार्थ्यांना (६९ टक्के) गणवेश मिळाले असून ५५ हजार ९६३ विद्यार्थ्यांना (३१ टक्के) पुढील चार ते पाच दिवसांत गणवेश उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भीमा खोऱ्यात पावसाची संततधार कायम

## उजनी पाणीसाठा ७२.३९ टीएमसीवर; दौंडच्या विसर्गात चढ-उतार सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ८ जुलै-**

भीमा खोऱ्यासह पुणे परिसरात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उजनी धरणाच्या पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. बुधवार, ८ जुलै २०२६ रोजी , सायंकाळी ६ वा . पर्यंत उपलब्ध आकडेवारीनुसार उजनी धरणातील एकूण पाणीसाठा ७२.३९ टीएमसी इतका झाला आहे. धरणातील उपयुक्त पाणीसाठा ८.७४ टीएमसी असून धरण १६.३१ टक्के भरले आहे.



महिनाभर दडी मारलेल्या वरुणराजाने १ जुलैपासून दमदार पुनरागमन केल्याने धरण साखळीतील बहुतांश धरणांमध्ये मोठ्या प्रम णावर पाण्याची आवक सुरू झाली आहे. त्यामुळे वरच्या धरणांतून टप्प्याटप्प्याने पाण्याचा विसर्ग वाढविण्यात येत असून दौंड येथील विसर्गातही चढ-उतार पाहायला मिळत आहे. भीमा नदीपात्रातून येणाऱ्या वाढत्या पाण्यामुळे धरणातील साठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता जलसंपदा विभागाने व्यक्त केली आहे. दौंड येथे भीमा नदीतील विसर्ग ९२,८९२ क्युसेक इतका पुणे जिल्ह्यातून येत आहे. पावसाच्या तीव्रतेनुसार हा विसर्ग कमी-जास्त होत असल्याने नदीकाठच्या गावांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले आहे. तसेच धरण साखळीतील पाण्याची आवक आणि हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन विसर्गात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येत आहेत. सध्या भीमा खोऱ्यात पावसाची संततधार कायम असल्याने उजनी धरणाच्या पाणीसाठ्यात येत्या काही दिवसांत आणखी लक्षणीय वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

उजनीत पाणी वाढत असल्याने सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये सम ाधानाचे वातावरण आहे. आगामी खरीप हंगामासाठी ही पावसाची साथ दिलासादायक ठरत आहे. उजनी जलाशयात पाण्याची वाढ होत असल्याने आमदार अभिजित पाटील यांनी भीमा सीना बोगदा व सीना माढा उपसासिंचन याद्वारे पाणी सोडण्याची मागणी पालकमंत्री गोरे यांच्याकडे केली आहे. पुणे जिल्ह्यात भरपूर पाऊस पडत असला तरी अद्यापही सोलापूर जिल्ह्याबरोबर माढा तालुक्यात पावसाने दडी मारल्याने शेतीसाठी व जनावरांसाठी पाणी सोडवण्यासाठी आ. अभिजीत पाटील यांनी पालकमंत्र्याकडे मागणी केली आहे

# मोडनिंब येथे वीज खंडितमुळे महावितरणविरोधात संताप

## मोडनिंबकर त्रस्त; दिला आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ८ जुलै-**

मोडनिंब(ता. माढा) शहरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक, विद्यार्थी तसेच लहान मोठे व्यावसायिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. ऐन पावसाळ्यात सलग अनेक तास वीजपुरवठा खंडित होत असल्याने महावितरणच्या कारभाराबाबत नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

मागील काही दिवस अनेक भागांत वारंवार वीज खंडित झाली. काही ठिकाणी तब्बल आठ ते दहा तास वीज नसल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले. विशेषतः सायंकाळ व रात्रीच्या वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना अंधारात राहावे लागत आहे. उकाड्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांचे मोठे हाल होत आहेत.सततच्या वीज खंडितीमुळे घरगुती कामे, व्यापारी, व्यवहार, छोटे उद्योग तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होत आहे. वारंवार होणाऱ्या वीज ये-जा मुळे घरगुती इलेक्ट्रॉनिक उपकरणे खराब होण्याची भीतीही नागरिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, महावितरणचे कार्यालय शहरात स्थलांतरित करावे, तक्रारींना तत्काळ प्रतिसाद द्यावा तसेच वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे नागरिकांचा संयम सुटत असून, लवकरात लवकर ठोस उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

> मोडनिंब या गावात गावठाण फिडर हा शेटफळ उपकेंद्रातून आहे. त्यावर लोड जास्त असल्यामुळे ते गावठाण फिडरला लोड शेडिंग करत होते. लोड कमी करण्यासाठी गावातील काही ट्रान्सफॉर्मर सोलंकरवाडी उपकेंद्रावर जोडले आहेत. मंगळवारी सदर ३३ केवी टेंभुर्णीहून येणारी लाईन फॉल्टी झाल्यामुळे काही काळ तो फिडर बंद होता. आज बुधवार असल्यामुळे लाईन मेंटेनन्स करण्यासाठी टेंभुर्णीतून बंद केला होता. सदर लाईनचा मेंटेनन्स पूर्ण केलेला आहे. सदर लाईन व्यवस्थित चालू राहील आणि विद्युत पुरवठा खंडित होणार नाही याची काळजी घेतली जाईल.
>
> **-संतोष सूळ,** सहायक अभियंता, शाखा मोडनिंब.
>
> अनेक दिवसांपासून मोडनिंब शहराचा वीजपुरवठा सतत खंडित होत आहे. याचा परिणाम व्यावसायिक, शेतकरी व अन्य गोष्टींवर होत आहे. याच्यावर योग्य तो मार्ग काढावा. महावितरणचे कार्यालय म ोडनिंब येथे स्थलांतरित करा अन्यथा तीव्र अंदोलन छेडण्यात येईल.
>
> **- ॲड. विजयसिंह गिड्डे,** मोडनिंब
>
> कोट वारंवार वीज खंडित होत असल्याने डेअरी उत्पादने आणि इतर थंड पदार्थ वितळण्याचा होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. महावितरणने अखंड वीजपुरवठा करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.
>
> **- संभाजी काळे,** व्यावसायिक.

# आषाढीसाठी करमाळा नगरपालिका सज्ज : नगराध्यक्षा सावंत; १० जुलै रोजी बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ८ जुलै-**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सुविधांसाठी करमाळा नगरपरिषद प्रशासन सज्ज झाले आहे. शुक्रवार, १० जुलै रोजी याबाबत विशेष नियोजन बैठकीचे आयोजन केल्याची माहिती नगराध्यक्षा मोहिनी सावंत यांनी दिली.

नगराध्यक्षा मोहिनी सावंत यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपनगराध्यक्ष अतुल फंड यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक करमाळा नगरपरिषद कार्यालयात पार पडणार आहे. आषाढी वारीच्या काळात करमाळा शहरातून अनेक छोट्या-मोठ्या दिंड्या पंढरपूरकडे मार्गस्थ होत असतात. या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना निवास, पिण्याचे पाणी, स्वच्छता, शौचालय सुविधा आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपरिषदेकडून युद्धपातळीवर तयारी सुरू आहे. बैठकीला सर्व नगरसेवक, मुख्याधिकारी, विविध विभागांचे प्रमुख आणि कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. शहरातील समाज मंदिरे, धार्मिक स्थळे आणि सार्वजनिक सभागृहे वारकऱ्यांच्या निवासासाठी सज्ज ठेवण्याबाबत निर्देश देणार आहेत. तसेच सार्वजनिक शौचालयांची तातडीने दुरुस्ती करून तेथे मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देणार आहे. याशिवाय प्रत्येक प्रभागातील समस्या, वारकऱ्यांच्या गरजा आणि आवश्यक उपाययोजना याबाबत नगरसेवकांकडून सूचना घेऊन त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचा निर्णय बैठकीत घेणार आहे.

# कॉरिडॉर, डीपी प्लॅन संदर्भात आज महत्त्वपूर्ण बैठक

## सुरुवातीला केवळ नगरसेवकांना देणार माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ जुलै-**

राज्य शासनाने कॉरिडॉरच्या आराखड्यास मंजुरी दिली आहे. मात्र, हा आराखडा नगराध्यक्ष, नगरसेवक व नागरिकांना दाखवला नव्हता. आता गुरुवारी दि. ९ जुलै रोजी पंढरपूर नगरपरिषदेम धील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख कॉरिडॉरचा आराखडा सादर करणार आहेत. कॉरिडॉर कोणत्या पद्धतीने करण्यात येणार आहे, याची माहिती केवळ नगरसेवकांना देणार आहेत.

कॉरिडॉरसाठी सुमारे ४ हजार कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाने मंजूर केला आहे. प्रशासनाने कॉरिडॉरचा आराखडा तयार केला आहे. त्यास शिखर समिती व शासनाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे आषाढी यात्रेनंतर कॉरिडॉरच्या कामाला सुरुवात होणार आहे. कॉरिडॉरचा आराखडा नगराध्यक्ष, नगरसेवकांना व मालम त्ताधारकांना दाखवण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत होती. याची दखल घेऊन गेल्या आठवड्यात हा आराखडा केवळ नगरसेवकांना दाखविण्यात येणार होता. मात्र, जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन व उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख बैठकीसाठी मुंबई येथे गेल्यामुळे ही बैठक रद्द केली होती. त्यानंतर आता ही बैठक गुरुवारी ९ जुलै होत आहे.

चौकट : पुण्या,मुंबईचे दर पंढरपूरात

कॉरिडॉर होणार ही काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे. परिणामी शहरातील मालमत्ता तसेच उपनगरातील फ्लॅट्स आणि ओपन प्लॉट्सच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. पुण्या-मुंबईचा दर सध्या पंढरपुरात सुरू आहे.

# शाळा बंद आंदोलनात सहभागी होणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

राज्य सरकारच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या एसआयआर (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन) या राष्ट्रीय मोहिमेच्या कामात कोणतीही दिरंगाई अथवा कुचराई सहन केली जाणार नसून, नियुक्त बीएलओ म्हणून काम करणाऱ्या शिक्षकांनी ३१ जुलैपर्यंत सर्व माहिती संकलनाचे काम पूर्ण करावे, यासाठी शाळा सकाळच्या सत्रात भरवण्याचे स्पष्ट निर्देश माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिले आहेत.

या राष्ट्रीय कामकाजात जाणीवपूर्वक हलगर्जीपणा किंवा कामचुकारपणा करणाऱ्या शिक्षकांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली जाईल, असा निर्वाणीचा इशाराही त्यांनी दिला. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील अनेक शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक कामकाजावर परिणाम होऊ नये, यासाठी माध्यमिक शिक्षण विभागाने विशेष नियोजन केले आहे.

यानुसार सर्व शाळांनी सकाळी ७ ते ११ या वेळेत नियमित अध्यापन व शैक्षणिक उपक्रम पूर्ण करावेत. त्यानंतर नियुक्त शिक्षकांनी दिवसभर बीएलओ म्हणून एसआयआर मोहिमेचे काम युद्धपातळीवर पार पाडावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येणार नाही, तसेच राष्ट्रीय मोहिमेचे उद्दिष्टही वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी बीएलओ म्हणून नियुक्त शिक्षकांना इतर शैक्षणिक कामे देऊ नयेत, असे निर्देश दिले होते. मात्र काही शाळांमध्ये अध्यापनावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर शिक्षण विभागाने सकाळी अध्यापन आणि त्यानंतर बीएलओ कामकाज असा समन्वयाचा मार्ग स्वीकारला आहे.

> **अन्यथा शासन नियमानुसार कारवाई करणार : जगताप**
>
> ३१ जुलैपर्यंत सर्व माहिती संकलित करून त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. शैक्षणिक गुणवत्तेत राज्यात आघाडीवर असलेल्या सोलापूर जिल्ह्याने एसआयआर राष्ट्रीय मोहिमेतही उत्कृष्ट कामगिरी करावी, यासाठी सर्व शिक्षकांनी जबाबदारीने आणि समन्वयाने काम करावे टीईटी परीक्षेच्या विरोधात समन्वय समितीच्या शाळा बंद आंदोलनात सहभागी होणाऱ्या शिक्षकांवर शासनाच्या नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. परंतु शिक्षकांनी या आंदोलनात सहभागी न होता, अध्यापनाचे तसेच सर मोहिमेचे कामकाज पूर्ण करावे असे आवाहन जगताप यांनी केले आहे.

> **अन्यथा वेतनकपात : कादर शेख**
>
> राज्यातील काही शिक्षक संघटनांनी पुकारलेल्या 'शाळा बंद' आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. आंदोलनात सहभागी होऊन शाळा बंद ठेवणाऱ्या किंवा शैक्षणिक कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या शिक्षकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असून, संबंधित शिक्षकांचे 'काम नाही तर वेतन नाही' या तत्त्वानुसार वेतन कपात करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिला आहे.

# देशी बनावटीचे पिस्तूल प्रकरण; एकाला अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ जुलै-**

सांगोला तालुक्यातील हातीद गावाच्या ब्रिजखाली केलेल्या कारवाईतील आरोपींना न्यायालयाने एक दिवसाची पोलिस कोठडी मंजुर केली आहे.

तपासादरम्यान दिलीप शिवाजी अलदर (वय-४६, रा.म दने वस्ती, कोळे, ता.सांगोला) यास ताब्यात घेवुन त्याच्याकडून १ देशी बनावटीचे पिस्तुल व २ जिवंत काडतुस, १ मोबाईल असे एकुण ६० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. गुन्ह्यात ४ आरोपींकडून एकुण ३ देशी बनावटी पिस्तुल, ६ जिवंत काडतुस, ४ मोबाईल असा २ लाख ४६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कामगिरी पोलीस अध- ीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली सपोनि.अमित बाबर, सपोनि.विजय शिंदे, पोहेकॉ.सलीम बागवान, दशरथ गोरे, अतुल घाडगे, रवि माने, विरेश कलशेट्टी, व्यंकटेश मोरे, मपोहवा.दिपाली जाधव, पल्लवी इंगळे, अश्विनी गोटे, सुनंदा झळके, पोना.जगदिश राठोड, पोकों.अन्वर अत्तार, सुरज राम गुडे, मनोज राठोड, शिवलिंग स्वामी, पोकों.सुनिल पवार, आशुतोष जाधव तसेच सांगोला पोलीस ठाणेकडील पोउपनि. सागर पाटील, पोहवा.कोष्टी यांनी केली.

# रोड क्रॉस करताना पादचाऱ्याचा मृत्यू

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

रस्ता क्रॉस करताना अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या एका पादचाऱ्याचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी पहाटे दोन वाजता मृत्यू झाला. लक्ष्मण विठ्ठल लोखंडे (वय ७० वर्ष, राहणार गणेश नगर, मडके वस्ती सोलापूर ) असे त्या मयत पादचारी वृद्ध इसमाचे नाव आहे . ते पाच जुलै रोजी सायंकाळी घराजवळून पायी रस्ता ओलांडीत असताना अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली होती . यात मार लागून जखमी झाल्याने त्यांना बेशुद्ध अवस्थेत येथील शासकीय रुग्णालयात मुलगा नितीन याने दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान आज पहाटे मृत्यू झाला .

# 'गाव तिथे स्मशानभूमी' संकल्पनेला गती देणार

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे; प्रत्येक गावात अंत्यसंस्काराची सुविधा देण्याची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

राज्यातील एकूण ४०,७६० महसुली गावांपैकी ३२,७९१ गावांमध्ये स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध असली, तरी ७,४४४ गावांमध्ये अद्यापही स्मशानभूमी उपलब्ध नाही. दरम्यान, गाव तिथे स्मशानभूमी' संकल्पनेला गती देवून प्रत्येक गावात सन्म ानपूर्वक अंत्यसंस्काराची सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी आज (दि. ८) दिली.



२० फेब्रुवारी २०२६ रोजी ग्रामविकास विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे कोणत्याही गावासाठी विकासकाम ांचा निधी मंजूर करण्यापूर्वी त्या गावात स्मशानभूमी उपलब्ध असल्याचा दाखला अनिवार्य केले आहे. स्मशानभूमी नसलेल्या गावात स्मशानभूमी उभारणीला प्रथम प्राधान्य दिले जाईल.

आज विधान भवनात यासंदर्भात माहिती देताना ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, उपस्थित केलेल्या १३ गावांपैकी ज्या गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध आहे, त्यांच्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करून देण्याबाबत पालकमंत्र्यांकडे विनंती करण्यात येईल.

उर्वरित गावांतील स्मशानभूम ींसाठी आवश्यक निधी जिल्हा परिषदेच्या शेष निधीतून उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, संबंधित गावांतील स्मशानभूम ींच्या शेडची कामेही पूर्ण करण्यात येतील.प्रत्येक गावात सन्म ानपूर्वक अंत्यसंस्काराची सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे.

# कुंभारी टोल नाक्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ५५ वर्षीय इसम जागीच ठार झालेल्या अवस्थेत सोलापूर अक्कलकोट मार्गावर कुंभारी टोल नाक्याजवळ सोमवारी रात्री नऊ वाजता मिळून आला. पुंडलिग शिवलिंगप्पा बबलाद ( वय ५५ वर्ष , रा.प्लॉट नं. १५० , कोंडा नगर , अक्कलकोट रोड सोलापूर ) असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे .सोमवारी रात्री कुंभारी टोल नाक्याजवळ एका वाहन अपघातात सदर इसम हा गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडलेल्या अवस्थेत आढळून आला . ही खबर वळसंग पोलिसांना समजली असता पोलीस हवालदार एस व्ही कुंवर यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात रात्री सव्वा नऊ वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# दुचाकी घसरून जखमी झालेल्या इसमाचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

दुचाकी घसरून जखमी झालेल्या येणेगुर गावच्या इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात सोमवारी सायंकाळी मृत्यू झाला . रमेश सुदर्शन इगवे ( वय ४८ वर्ष ,रा . येणेगुर , ता उमरगा ) असे त्या मयत दुचाकी स्वराचे नाव असून ते २३ जून रोजी संध्याकाळी दुचाकी वरून जात असताना येणेगुर जवळ दुचाकी घसरून जखमी झाले होते . त्यामुळे त्यांना भाचा ऋतिक याने उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान सोम वारी सायंकाळी मृत्यू झाला.

# एसआयआरचे २४ लाख ६७ हजार मतदारांना एपिक फॉर्म वाटप

## जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन; राज्यात सोलापूर जिल्हा टॉप टेनमध्ये; 'बीएलओं'ना दिल्या आवश्यक त्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्दे शाप्रमाणे सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनर्रिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील दि. ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत ३९ लाख ४१ हजार ५५ मतदारांसाठी ३ हजार ७२३ बीएलओ मार्फत हा कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. यातील २४ लाख ६६ हजार ८९१ मतदारांना एपिक फॉर्म वाटप केले आहेत. आजतागायत जिल्ह्यात ८ टक्के काम पूर्ण झाले असून, राज्यात सोलापूर जिल्हा टॉप टेनमध्ये असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज (दि.८) माध्यम ांशी बोलताना दिली. दरम्यान, सर्व बीएलओंनी हे काम एक राष्ट्रीय कर्तव्य समजून अत्यंत काटेकोरपणे दिलेली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन केल्याचेही त्यांनी सांगितले.



ावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन म्हणाले की, ३० जून पासून आपल्या जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम ास सुरुवात झालेली आहे. एपिक फॉर्म मतदारांना वितरित करावेत, अशा सूचना देऊन जे बीएलओ हे काम करणार नाहीत किंवा बीएलओंनी हे काम करताना त्यांचे वरिष्ठ अडचण निर्माण करत असतील तर अशा संबंधात त्यावर निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी निर्देशित केले होते. यामुळे जवळपास २४ लाख ६७ हजार फॉर्मही या बीएलओंनी वितरित केले आहेत.

सोलापूर जिल्हा हा राज्यात सर्वात जास्त मतदारसंख्या असलेल्या जिल्ह्यात पाचवा जिल्हा आहे. एकूण ११ विधानसभा मतदारसंघांम ध्ये ३९ लाख ३८ हजार ६३१ मतदार आहेत. त्यामुळे सर्व संबंधित बी एल ओ यांनी या कार्यक्रमांतर्गत त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी एक राष्ट्रीय कर्तव्य समजून पार पाडावी. या कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, अशाही कडक सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी बीएलओंना दिल्या आहेत. शिक्षण विभागानेही बी एल ओ म्हणून नियुक्त केलेल्या अडीच हजार पेक्षा अधिक शिक्षकांना विशेष सखोल पुरीक्षण कार्यक्रमातिरिक्त कोणत्याही प्रकारची जबाबदारी देऊ नये. पुढील एक महिना याच कामाला अधिक प्राधान्य दिले गेले पाहिजे. तसेच आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभागाने त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना (आशा वर्कर, अंगणवाडी सेविका) यांनाही इतर अधिकचे जबाबदारी देऊ नयेत, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिले आहेत.

दरम्यान, या कामात हलगर्जी केलेल्या २ बीएलओंवर एफआयआरही दाखल केल्याचे यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. यामुळे सध्या या कामात कोणीही हयगय करीत नसून, दिवसातून २ वेळा मी एसआयआरचा आढावा घेत असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना पाचारण करून या एसआयआर कामासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले होते; यामुळे जिल्ह्यातील विविध पक्षीय पदाधिकारीही या कामात जिल्हा प्रशासनाला सहकार्य करीत आहेत. दरम्यान, आता ऑनलाईन पध्दतीने एसआयआरचे कामकाज चालू होणार असल्याने आता पुन्हा ऑफलाईन फॉर्म भरावे लागणार नसल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी नमूद केले. ऑनलाईन प्रक्रियेमुळे मतदारांना आता घरी बसून आपला फॉर्म भरता येणार आहे. यामुळे आता या कामाला वेग येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी शेवटी नमूद केले.






**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### नई जिंदगी परिसरात घरफोडी; ५ लाखांचा ऐवज लंपास

**सोलापूर, दि.८ जुलै-**

बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने ३ तोळे सोन्याचे व ३६ तोळे चांदीचे दागिने व २५ हजाराची रोकड मिळून एकूण ५ लाख रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना नई जिंदगी भागातील बसवेश्वर नगर येथे सोमवारी सकाळी उघडकीस आली. याबाबत गौरीशंकर नागनाथ कोळी (रा.३३७, बसवेश्वर नगर, नई जिंदगी) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे रेल्वे स्टेशन येथील सिमेंट गोंडावन मध्ये कामाला आहेत. ते दि. ६ जुलै रोजी रात्री जुन्या घराला कुलूप लावून बाजूला बांधलेल्या नवीन खोलीमध्ये कुटुंबीयांसह झोपले होते. या दरम्यान अज्ञात चोरट्याने घराला कुलूप असल्याचे फिर्यादीच्या बंद घराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला व कपाटातील सोन्याचे बोरमाळ, जिरेमनी गंठण, पैलू मनी गंठण, कर्णफुले, रिंगा तसेच चांदीचे सात नग पैंजण, चैन, तीन नग ब्रेसलेट, अंगठी व रोख रक्कम मिळून ५ लाख ३ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला. घरात चोरी झाल्याचे दुसऱ्या दिवशी सकाळी उघडकीस आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार शेख हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे.

### माहेरुन १० लाख आणण्यासाठी विवाहितेला त्रास

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

पुण्यात घर घेण्यासाठी माहेरून दहा लाख रुपये आणण्यासाठी विवाहितेस शारीरिक व मानसिक त्रास देऊन माहेरी हाकलून दिल्या प्रकरणी पाच जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. स्वप्निल-पती, भावना-सासु, तानाजी-सासरे, संदिप-दिर आणि ज्योती-नणंद (सर्व रा. वाघोली, मोहोळ) अशी आरोपींची नावे आहेत. याबाबत पल्लवी स्वप्निल शिवशेट्टी (रा. बाळे, ता. उत्तर सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी ही दि. ९ डिसेंबर २०२० ते दि. १२ नोव्हेंबर २०२३ रोजी दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी मिळुन लग्नात मानपान केला नाही, सोने दिले नाही, हुंडा दिला नाही. तसेच पुण्यात घर घ्यायचे आहे माहेरुन १० लाख रुपये घेवून ये. रुपये आणल्यास तुला जेवण खाण देत राहू. नाही तर घरात कोपऱ्यात पडु देऊ, असे म्हणून मानसिक व शारीरीक त्रास दिला. तसेच माहेरून जोपर्यंत पैसे आणत नाही तोपर्यंत नांदण्यास यायचे नाही, असे म्हणून घरातून हाकलुन दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार ढोबळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### घर घेण्यासाठी विवाहितेचा छळ; तीन जणांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

चारित्र्यावर संशय घेऊन व दिराला घर घेण्यासाठी माहेरून दहा लाख रुपये आण म्हणून एका विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पालघर येथील पतीसह तिघा जणांविरुद्ध जेल रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिषेक-पती, सुरेखा सासु, ओंकार दिर, (सर्व रा. गौरव चौक, नालासोपारा वेस्ट, जि. पालघर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत नपुर अभिषेक प्रभाळे (रा. दत्त नगर, न्यु पाच पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी दि. २५ एप्रिल २०१८ ते दि. ७ जुलै २०२६ रोजी दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी मिळुन फिर्यादीस माहेरुन दिराला घर घेण्यासाठी १० लाख रुपये घेवून ये म्हणून व फिर्यादीचे चारित्र्यावर संशय घेवून, शिवीगाळ, दमदाटी करुन शारीरीक व मानसिक त्रास दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार कांबळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे.

# नाना-नानी पार्कचा होणार कायापालट

## जलनिस्सारणासह सर्वांगीण नूतनीकरणावर भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

सात रस्ता परिसरातील नाना-नानी पार्कचा लवकरच सर्वांगीण कायापालट होणार असून ज्येष्ठ नागरिकांसह सर्व वयोगटातील नागरिकांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महापालिकेने नूतनीकरणाचा आराखडा तयार करण्यास गती दिली आहे. या पार्श्वभूमीवर महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते आणि आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सोमवारी उद्यानाची संयुक्त पाहणी करून विकासकामांचा आढावा घेतला. पाहणीवेळी सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, नगर अभियंता सारिका आकुलवार, सफाई अधीक्षक अनिल चराटे आणि उद्यान प्रमुख कोमल काशीद उपस्थित होते. उद्यानात पावसाळ्यात पाणी साचत असल्याने जलनिस्सारण व्यवस्थेवर विशेष भर देण्यात आला. भविष्यात पाणी साचू नये, यासाठी आवश्यक तांत्रिक उपाययोजना तातडीने करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.



महापौर कोंड्याल यांनी नूतनीकरणाचा आराखडा लवकर अंतिम करून कामे दर्जेदार व विहित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

नाना-नानी पार्क हे शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी महत्त्वाचे विरंगुळ्याचे ठिकाण असून, त्याचे आधुनिक आणि सर्व सुविधांनी युक्त उद्यानात रूपांतर करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

स्थायी समिती सभापती चाकोते यांनी नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन उद्यानाचा विकास केला जाईल. आधुनिक सुविधा, सुरक्षित वॉकिंग ट्रॅक, उत्तम प्रकाशयोजना आणि स्वच्छ वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक निधी व कामांना स्थायी समितीचे पूर्ण सहकार्य राहील, असे स्पष्ट केले.

**नूतनीकरणात या सुविधांना प्राधान्य**

- आकर्षक प्रवेशद्वार
- नवीन वॉकिंग ट्रॅक
- आधुनिक बैठक व्यवस्था
- सजावटीची प्रकाशयोजना
- वृक्षारोपण व लँडस्केपिंग
- ज्येष्ठ नागरिकांसाठी विश्रांती क्षेत्र
- मुलांसाठी खेळणी
- ओपन जिम
- स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची सुविधा
- प्रभावी जलनिस्सारण व नियमित देखभाल

# ३० कोटींच्या मुदत ठेवी खासगी की राष्ट्रीयकृत बँकेत

## समाज कल्याण समितीच्या सभापती श्रद्धा पवार यांचा खासगी बँकेत ठेवण्यास विरोध

### याचा फैसला उद्याच्या स्थायी समितीच्या सभेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे २० कोटी रुपये आणि जीएसटी अनुदानातील १० कोटी रुपये असे एकूण ३० कोटी रुपये खासगी बँकेऐवजी राष्ट्रीयकृत बँकेतच मुदतठेव स्वरूपात गुंतवावेत, अशी मागणी महापालिका कामगार व समाज कल्याण समितीच्या सभापती श्रद्धा पवार यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महापालिकेच्या स्थायी समितीची बैठक शुक्रवार, १० जुलै रोजी होणार असून या बैठकीत विविध निधींच्या मुदतठेवीबाबत निर्णय अपेक्षित आहे. यासाठी महापालिकेने राष्ट्रीयकृत तसेच खासगी बँकांकडून व्याजदर मागविले होते. त्यामध्ये खासगी क्षेत्रातील बंधन बँकेने सर्वाधिक ७ टक्के वार्षिक व्याजदर देण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी हा कर्मचाऱ्यांच्या आयुष्यभराच्या बचतीशी संबंधित असल्याने तो खासगी बँकेत ठेवणे धोकादायक ठरू शकते, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. काही खासगी बँकांवर आर्थिक संकट ओढवल्याची उदाहरणे देत कर्मचाऱ्यांच्या निधीच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यामुळे केवळ अधिक व्याजाच्या मोहापायी निर्णय न घेता, कर्मचारी हित आणि निधीची सुरक्षितता लक्षात घेऊन हा निधी राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवावा. तसेच ३० जून रोजी सादर झालेल्या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी देऊ नये, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनामुळे स्थायी समितीच्या बैठकीत ३० कोटी रुपयांच्या मुदतठेवीचा मुद्दा पुन्हा चर्चेत येण्याची शक्यता असून, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कोणता निर्णय घेतात, याकडे महापालिका कर्मचारी आणि शहराचे लक्ष लागले आहे.



**सोलापूर : होडगी रोडवरील रस्ता रुंदीकरण कामामुळे आणि वाहन चालकांच्या बेशिस्तीमुळे सोलापुरात वाहतूक कोंडीचा विळखा झाला आहे. बेशिस्त वाहतूकीमुळे वाहनधारक व नागरिक त्रस्त झाले आहेत.**

# एमएस-सीआयटीला देशातील प्रतिष्ठेचा 'स्कॉच' पुरस्कार प्राप्त


### रौप्यमहोत्सवी वर्षात मोफत एआय मास्टरक्लासची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल)च्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त एमएस-सीआयटी अभ्यासक्रमाला डिजिटल साक्षरता श्रेणीत देशातील प्रतिष्ठेचा 'स्कॉच' पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच 'आपण करूया महाराष्ट्र एआय रेडी' या राज्यव्यापी मोहिमेंतर्गत सर्वांसाठी मोफत एआय मास्टरक्लास सुरू करण्यात आल्याची माहिती सोलापूर जिल्हा समन्वयक मीरा जेऊरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या २५ वर्षांत एमकेसीएलने एमएस-सीआयटीच्या माध्यमातून १.७ कोटीहून अधिक विद्यार्थी व नागरिकांना डिजिटल साक्षर केले आहे. २३ जूनपासून सुरू झालेली 'आपण करूया महाराष्ट्र एआय रेडी' ही मोहीम ६० दिवस राज्यभर राबविण्यात येत आहे. एमएससीआयटी डॉट एआय या संकेतस्थळावर नोंदणी करून विद्यार्थी, पालक, शिक्षक, शासकीय कर्मचारी व नागरिकांना ६० मिनिटांचा मोफत एआय मास्टरक्लास करता येणार आहे. मास्टरक्लास पूर्ण करणाऱ्यांना एमएस-सीआयटी केंद्रामार्फत प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

नवीन एआय-सक्षम एमएस-सीआयटी अभ्यासक्रमात आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, डेटा लिटरसी, क्लाऊड कॉम्प्युटिंग यांसारख्या आधुनिक विषयांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच चॅटजीपीटी, मायक्रोसॉफ्ट कोपायलट, गुगल जेमिनी, कॅनव्हा एआय यांसह १२५ हून अधिक एआय टूल्सचा परिचय करून दिला जातो. रोजगाराभिमुख २६५ हून अधिक क्लिक अभ्यासक्रम उपलब्ध असल्याची माहितीही त्यांनी दिली.या पत्रकार महेश पत्रिके व रोहित जेऊरकर उपस्थित होते.



# पेरणीची गडबड करू नका; जिल्हाधिकारी

### जिल्ह्यात अजून सरासरी 100 मिमी पावसाचीही नोंद नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात १५ दिवसांपासून काळेकुट्ट ढग असलेले आभाळी वातावरण होते. मात्र पाऊसच पडत नसल्याने आजतागायत १० टक्केच खरिपाच्या पेरण्या झाल्या आहेत. जिल्ह्यात जूनमध्ये ८२.९ मिमी तर जुलैमध्ये अवघा ११ मिमीच पाऊस बरसल्याने पेरणीची गडबड करू नका, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज (दि. ८) माध्यमांशी बोलताना केले. यंदा पावसाने मे मध्येच हजेरी लावल्याने यंदाही लवकरच पाऊस पडण्याचे संकेत मिळत होते. यंदा मात्र जून महिन्यात अवघा सरासरी ८३ मिमी पाऊस पडला. जुलै महिन्यातील १० दिवसात अवघा ११ मिमी पाऊस पडल्याने खरिपाच्या पेरणीचा सध्यातरी खोळंबाच झाला आहे. आता परतीच्या पावसावर जिल्ह्याचे भवितव्य आहे. जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये.

**पिण्याच्या पाण्याला प्राधान्य**

सध्या पिण्याच्या पाण्याला प्राधान्य आहे. उजनीतून पिण्यासाठी पाणी सोडलेल्या पाण्याचा शेतकऱ्यांनी उपसा करू नये. अवघे २ तासच शेतकऱ्यांना वीज मिळणार आहे. एल. निनोच्या वाढत्या प्रभावामुळे आमचाही नाईलाज झाला आहे. शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी केले.

# शेत जमिनीच्या वादावरून शेतमालकाला जीवे मारण्याची धमकी

### २२ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

शेत जमिनीच्या वादातून शेतमालकाला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी तब्बल २२ जणांवर सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवराम वाडकर, शंकर लक्ष्मण वाडकर, रामचंद्र कोंडीबा वाडकर, गणपत वाडकर, सदाशिव राघु वाडकर, मोहन दगडु वाडकर, पंडित विरुपाक्ष शेटे, केदार शेटे, अमोल लकडे, युवराज जानकर, सोनाली भोसले, अनिल गुजरे, निलेश धुमाळ, पाटील, इतर ८ ते १० लोक अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत कृष्ण कन्हेयादास शरदचंद्र देशमुख (वय ६२ वर्षे, रा. मंत्री चंडक नग, भवानी पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील वरील आरोपी वाडकर बंधूंनी शेतजमीन इसारा पावती करुन घेतली होती. त्यावेळी त्यांना खरेदी करुन देण्यास टाळाटाळ केल्याने फिर्यादीने दिवानी न्यायालयात खरेदी पत्र करुन मिळणेबाबत दावे केले आहे व वादीने खरेदी करुन घ्यावी, असा स्पष्ट निकाल दिलेला असताना यातील आरोपींनी दिलेल्या आदेशाचे अवहेलना करुन दस्त क्रमांकाने खरेदी करुन फिर्यादीची फसवणुक केली आहे. तसेच ३ जुलै २०२६ रोजी यातील आरोपी हे फिर्यादीच्या भाटेवाडी येथील शेतात अनाधिकाराने प्रवेश करुन त्यांच्या नावाचा फलक लावला. शेतगडी शेत नांगरणी करीत असताना आरोपींनी कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला. त्यामुळे फिर्यादी हे आरोपींना समजावण्यासाठी शेतात आले होते. त्यानंतर इतर सात ते आठ अज्ञात आरोपींनी फिर्यादीला हायवे रोडवर आडवून शेतात खाली उतरायचे नाही असे म्हणून गच्ची धरून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस निरीक्षक गजा हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# जिल्हा परिषद शाळांचे होणार 'सरप्राईज ऑडिट'

### गुणवत्तेची होणार पडताळणी
### जिल्हास्तरीय समितीकडून अचानक तपासणी; मुख्याध्यापकांना तयारीचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होत आहेत का, याची प्रत्यक्ष खातरजमा करण्यासाठी जिल्ह्यातील निवडक शाळांची अचानक तपासणी केली जाणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय तपासणी समितीने याबाबतची प्रक्रिया सुरू केली असून संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना आवश्यक तयारीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील जिल्हा परिषद शाळांची पाहणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. समिती प्रत्यक्ष शाळेत जाऊन शिक्षणाची गुणवत्ता, विद्यार्थ्यांची उपस्थिती, स्वच्छता, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, डिजिटल सुविधा, शालेय पोषण आहार तसेच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी याची तपासणी करणार आहे.

तपासणीदरम्यान आढळणाऱ्या त्रुटी तातडीने दूर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले जाणार असून, गंभीर बाबींमध्ये जबाबदारी निश्चित करून पुढील कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

मागील शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातील तपासणी समितीच्या कामाची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली होती. यंदाही अधिक प्रभावी आणि परिणामकारक तपासणी मोहीम राबविण्याचा समितीचा निर्धार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

**झेडपी शाळेचा दर्जा सुधारणार**

'केवळ तपासणी नव्हे, तर जिल्हा परिषद शाळांचा गुणवत्ता व सर्वांगीण दर्जा उंचावण्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, याचा थेट लाभ विद्यार्थी आणि पालकांना मिळणार आहे.'

**कादर शेख,** प्राथमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सोलापूर

**'तपासणीत नेमके काय पाहिले जाणार?'**

- शैक्षणिक गुणवत्ता व अध्यापनाची पातळी.
- विद्यार्थ्यांची उपस्थिती व शैक्षणिक प्रगती.
- स्वच्छता, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची स्थिती.
- मध्यान्ह भोजन व इतर शासकीय योजनांची अंमलबजावणी.
- शाळा परिसरातील अतिक्रमण व सुरक्षिततेची स्थिती.
- डिजिटल व भौतिक शैक्षणिक सुविधांची उपलब्धता.



# जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रबंधक म्याकलवार, अधिक्षक किशोर रणदिवे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**


जिल्हा व सत्र न्यायालयाचे नुतन प्रबंधक संजय म्याकलवार व अधिक्षकपदी पदोन्नती झालेले किशोर रणदिवे यांचा दैनिक तरुण भारतच्या वतीने सन्मान करण्यात आला.

हा सन्मान दैनिक तरुण भारतचे संचालक ॲड. चैतन्य पेठे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी दैनिक तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, ॲड. इंद्रजित पाटील, ॲड. श्रीनिवास क्यातम, प्रकाश जाधव, जिल्हा व सत्र न्यायालयाचे अधिक्षक नजीर बागायत, अधिक्षक यू. आर. कुलकर्णी, आर. बी. कुलकर्णी, एन.एन. खमितकर व ए.पी. पगड्याल आदी उपस्थित होते.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १४९६

**म्हणउनी शांती धरा । उतराल पैल तिरा ।।**

संसाराला कोणी मायाजाळ म्हणतात तर कोणी भवनदी, महानदी, मायानदी म्हणतात. संसाराला कोणी कांहीही नांव ठेवो, पण याच्यातून पैलतीराला सुखरूप पोहचावे, हे सर्वांचे जीवन ध्येय असायला पाहिजे, यात मात्र कोणाचे दुमत नसावे. माया, मोह, मत्सर, काम, क्रोध, अहंकार आदिमध्ये अडकलेल्या जीवाला ही मायानदी सहज लक्षात येणे शक्य नसते. तरीपण जीवनात केव्हा ना केव्हा माणसाला आपले जीवन सुखरूप मार्गी लागावे असे वाटते. त्याला असे वाटणे म्हणजेच भवनदीचे पैलतीर गाठण्याचा विचार त्याच्या मनात येणे होय. खरे म्हणजे मायानदी ही कल्पना आहे. प्रत्यक्षात अशी नदी नाही. या नदीची निर्मिती आपणच भितीपोटी केली आहे. मीपणामुळे ही नदी निर्माण झाली आणि मीपणानेच आपणाला या नदीत बुडवले, अशीच अनेकांची अनुभूती असते. मी म्हटले की सुखाची परिभाषा इंद्रिय लळ्याकडे तसेच भौतिक सुखाकडे वळते. पण ज्याच्याकडे मी नाही त्याची सुखाची परिभाषा शांतीकडे वळते. खरे म्हणजे शांतीसारखे सुख नाही आणि भवनदी पार करण्याचा शांतीसारखा दुसरा मार्गही नाही. त्यामुळे संसारात अडकलेल्या जीवाने दु:खद देणाऱ्या सुखापासून बाहेर पडावे आणि शांतीचा मार्ग अवलंबावा. शांतीचा हा मार्ग त्याला आपोआप संसाराच्या मायानदीतून सहज पैलतीरावर नेईल. हे सांगताना तुकाराम महाराज म्हणतात,



**शांतीपरतें नाहीं सुख । येर अवघेंचि दुख ।।**
**म्हणउनी शांती धरा । उतराल पैलतीरा ।।**

संसाराच्या मायानदीत सहजासहजी पोहता येत नाही. कारण या नदीत माया, मोह, स्वार्थ, अहंकार, काम, क्रोध, मीपणा, द्वेष, मत्सर आदिचे खूप मोठमोठे भोवरे, खाच खळगे, लाटा, कपाऱ्या आहेत. यामुळे आपण कुठेही सहज गटांगळ्या खावून बुडू शकतो. पण जेव्हा आपल्या लक्षात येते की, इंद्रिय लळे, भौतिक सुख हे खरे सुख नाही. त्यामुळे यांच्या मागे लागण्याचे कारण नाही. आपली अशी मनोवृत्ती निर्माण होताच या मायानदीचा पूर ओसरू लागतो. म्हणजेच या नदीत पोहावे लागत नाही, तर सहज चालत जाता येते हे आपल्या लक्षात येते. आपण जेव्हा दृढ निश्चयाने संसाराच्या या मायानदीतून चालू लागतो तेव्हा कपऱ्या, भोवरे, खाच खळगे यापैकी कांहीही आपणाला अडसर ठरत नाहीत. कारण हे सर्व आपण निर्माणच होऊ दिलेले नसते किंवा निर्माण झाले असले तरी दृढनिश्चयाने ते आपण नष्ट केलेले असते. थोडक्यात मायानदी निर्माण करणे किंवा नष्ट करणे हे आपल्याच हाती आहे, हे लक्षात ठेवावे. संसारात राहून मायानदी पार करणे अवघड नाही हेही लक्षात ठेवावे.

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# जिल्हा वार्षिक आराखडा; विकासकामांसाठी होणार कोट्यवधींची तरतूद

## डीपीसीपूर्वी विभागनिहाय प्रस्ताव सादर करण्याचे अध्यक्ष दीपक वैद्य यांचे निर्देश

### शिक्षण, बांधकाम, लघुपाटबंधारे व आरोग्य विभागाला प्राधान्य, आराखड्यात विक्रमी वाढीची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण व एससीपी) अंतर्गत २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा परिषदेच्या सर्व विभागप्रमुखांनी दि. १० जुलै रोजी शुक्रवारपर्यंत प्रारूप आराखडा तयार करण्याच्या सूचना जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी मंगळवारी झालेल्या डी.पी.सी आढावा बैठकीत दिल्या.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ,




कृषी व पशुसंवर्धन सभापती रामाप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे उपस्थित होते. या आढावा बैठकीत शिक्षण, बांधकाम, लघुपाटबंधारे, आरोग्य, सामान्य प्रशासन आणि पशुसंवर्धन या विभागांना मोठ्या प्रमाणात निधीचे नियोजन करण्यात येत असून, जिल्ह्यातील पायाभूत सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, ग्रामीण रस्ते, सिंचन आणि आरोग्य सेवा सक्षम करण्यावर प्रशासनाचा भर देणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

२०२६-२७ साठी शिक्षण, लघुपाटबंधारे, बांधकाम - क्रमांक १ आणि क्रमांक २, आरोग्य, तसेच साम न्य प्रशासन विभागाला प्रस्तावित निधी देण्यात येणार आहे.

दरम्यान, याशिवाय महिला व बालकल्याण, समाजकल्याण, कृषी, ग्रामपाणी पुरवठा आणि पशुसंवर्धन विभागांनाही आवश्यक निधीचे नियोजन करण्यात आले आहे.

आराखड्याच्या तुलनेत मंजूर निधीत काही प्रमाणात कपात होत असल्याचेही सांगण्यात येत आहे. त्यामुळे प्रस्तावित विकासकामांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी अधिकाधिक निधी मंजूर करून घेण्याचे आव्हान प्रशासनासमोर असणार आहे.

> सन २०२१-२२ च्या तुलनेत सोलापूर जिल्ह्याच्या प्रस्तावित निधीत लक्षणीय वाढ झाल्यास विकासकामांना अधिक चालना मिळण्याची अपेक्षा जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांनी व्यक्त केली आहे.

> जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेला हा आराखडा आगामी काळातील विकासाची दिशा निश्चित करणारा मानला जात असून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, शिक्षण, सिंचन आणि आरोग्य सेवांमध्ये सुधारणा घडवून आणण्यास तो महत्त्वाचा ठरणार असल्याचे जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी सांगितले.

# सहकारमहर्षी कारखान्यामार्फत ‘आरओ’ पाण्याचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ जुलै-**

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामार्फत मौजे अकलूज, माळेवाडी,संग्रामनगर व शंकरनगर येथील नागरिकांना टँकरमार्फत आर.ओ.पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरु केला असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी दिली. यावेळी त्यांनी सयाजीराजे मोहिते-पाटील मित्रमंडळ परिवार, अकलूज यांनी जनतेची सेवा हेच कर्तव्य मानून पाणी वाहतूक तसेच वितरण करणेसाठी स्वयंसेवक म्हणून मोठा सहभाग नोंदविला असल्याचे सांगितले.



कारखाना कार्यक्षेत्रामधील मौजे अकलूज, माळेवाडी, संग्राम नगर व शंकरनगर या गावातील नागरिकांना पाण्याचा पुरवठा होत असलेल्या मौजे विझोरी येथील तलावात पाणी साठा उपलब्ध नाही तसेच पाटबंधारे विभागाकडून इरिगेशनचे येणारे पाणी वेळेत न मिळाल्याने पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. सदर भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याकरिता सामाजिक बांधीलकीचा एक भाग म्हणून कारखान्यामार्फत मोफत आर.ओ.प्रक्रिया केलेल्या शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा टँकरद्वारे सुरु केला आहे.

# प्रवाशांची लुटमार करणारे तीन सराईत गुन्हेगार जेरबंद

## सव्वा ४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

शहर गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने राष्ट्रीय महामार्गावर धावत्या कारला अडवून प्रवाशांच्या डोळ्यात मिरची पूड टाकून सोन्याचे दागिने लुटणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांना जेर बंद करून ४ लाख ३५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

हुमनाबाद येथील रहिवाशी फिर्यादी मल्लिकार्जुन कोणी आणि त्यांचे मित्र हे दिनांक २ जुलै रोजी विजापूर मध्ये लग्नकार्य करून आपल्या मोटारकारने परतत असताना, विजयपूर रोडवरील हॉटेल न्यू अंबरजवळ एका रिक्षाने त्यांची कार अडवली. रिक्षातील तिघांनी फिर्यादींच्या डोळ्यात मिरची पूड टाकून, २७ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या तीन अंगठ्या आणि कारची चावी हिसकावून पोबारा केला होता.

याप्रकरणी विजयपूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर धायगुडे आणि भरत चंदनशिव यांच्या पथकाने तांत्रिक माहिती आणि गोपनीय खबऱ्यांच्या आधारे तपास सुरू केला.

तपासादरम्यान, हे संशयित आरोपी सोलापूर शहरातील एका मैदानात रिक्षासह (क्र. एमएच १३-सीटी १३६९) विक्रीसाठी थांबल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून शिवाजी ऊर्फ मरक्या मोहन जाधव, महादेव ऊर्फ मंड्या मोहन जाधव आणि अमित ऊर्फ इंडिया हरीशचंद्र पवार या तिघांना अटक केली.

आरोपींची अधिक चौकशी केली असता त्यांनी गुन्हाची कबुली दिली आहे. यापैकी मुख्य आरोपी शिवाजी जाधव याच्यावर यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त एम. राज कुमार, उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील ,शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने , पोलीस निरीक्षक गुन्हे (अति. कार्यभार) अजित लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने पार पाडली आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार,
दि. ९ जुलै २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - ज्येष्ठ कृ. नवमी
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- अश्विनी (१४.५५)
योग - सुकर्मा (१०.११)
करण - वणिज (२१.३१)
राहू काल : गुरुवार
दु. ०१.४० ते ०३.००

**दिनविशेष :**
१८७३ : मुंबई शेअर बाजाराची सुरवात मुंबईतील दलाल स्ट्रीटवर एका वडाच्या झाडाखाली झाली.
१८९३ : डॉ. डॅनियल हेल यांनी शिकागो येथे जगातील पहिली यशस्वी ओपन हार्ट शस्त्रक्रिया केली.
१९५१ : भारताची पहिली पंचवार्षिक योजना प्रसिद्ध करण्यात आली.
१९६९: वाघाला भारताचा राष्ट्रीय प्राणी म्हणून घोषित करण्यात आले.

# कारची काच फोडून २ लॅपटॉप चोरीस

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

पार्क चौकातील आयसीआयसीआय बँकेच्या समोर उभ्या केलेल्या कारमधून दोन लॅपटॉपसह ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रफुल्लकुमार शिवाजी शिर्के (रा. फलटण, सातारा) यांनी त्यांची कार (एम.एच. ११ डी.एन. १०२०) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे दि ६ जुलै रोजी दु. २ वा ते ७.३० वा चे सुमारास बँकेच्या समोरील बाजूस दुगावकर यांच्या घरासमोर पार्क करुन ठेवली होती. यादरम्यान अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या कारची काच फोडून ९५ हजार रुपये किमतीचे दोन लॅपटॉप, महत्वाची कागदपत्रे चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार गौडनवर हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे



# फुलेंसारख्या चिकित्सक बुद्धीप्रामाण्यवादाची गरज

### प्रा. दिपक पवार; महात्मा फुले जन्म द्विशताब्दीनिमित्त वर्षभर प्रबोधन पर्वाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

शिक्षण हे मुक्तीचं साधन आहे, हे फुलेंना दीडशे वर्षांपूर्वी समजलं होतं. त्यामुळे फुलेंनी विषमतेविरोधातील संघर्षासाठी शिक्षणाला माध्यम म्हणून निवडले. फुलेंनी शिक्षणातून ज्या सज्ञानासाठी प्रयत्न केला, तो सांस्कृतिक सज्ञान आहे. आजच्या विषमतावादी राजकीय वर्तमानामध्ये फुलेंसारख्या चिकित्सक बुद्धिप्रामाण्यवादाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा. दिपक पवार यांनी केले. ते महात्मा फुलेंच्या जन्मद्विशताब्दी निमित्त आयोजित प्रबोधनपर्वाच्या उद्घाटन सत्रात बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्रा. नरेश बदनोरे हे होते.

प्रास्ताविक शंकर पाटील यांनी केले. यावेळी मंचावर प्रा. एम. आर. कांबळे, ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड अॅड. गोविंद पाटील, लक्ष्मीदास सोनकवडे, सरफराज अहमद हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्नेहल पाटील यांनी फुल्यांच्या अखंडाचे गायन करून केली. तर सूत्रसंचालन मनीष गडदे यांनी केले.

# विश्वनाथ प्याटी भाजयु मोर्चाचे सरचिटणीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

भारतीय जनता युवा मोर्चाच्या सोलापूर शहराच्या कार्यकारिणीची घोषणा भाजपचे शहर अध्यक्ष विजय कुलथे यांनी केली. भाजप मोर्चा शहर कार्यकारिणीवर निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे भाजपच्या शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर आणि युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष विजय कुलथे यांनी अभिनंदन केले.

**शहर कार्यकारिणी याप्रमाणे :**

**पदाधिकारी :** सरचिटणीस : विश्वनाथ प्याटी, मयूर घुगे, यतिराज होनमाने. शहर उपाध्यक्ष : रोहित तडवळकर, राहुल डांगरे, आकाश मुदगल, अनिकेत प्रधाने, अंबादास पामू, लक्ष्मण सरवदे, ऋषिकेश चिट्टे, रविकांत कांबळे, प्रविण गलांडे, ओंकार पत्तेवार, रवी कमलापूरे. चिटणीस : विशाल बनसोडे, रोहित हंचाटे, रोहन मराठे, डोंगरेश चाबुकस्वार, नरेश दासरी, गणेश पवार, सुरज विटे, रोहन किणगी, ओंकार गुंड, श्रीनिवास दासरी. कोषाध्यक्ष : कृष्णा झंवर.

**शहर कार्यकारणी सदस्य :** अथर्व शहाणे, सिद्धांत धोत्रे, विकास कारके, संगमेश केलूर, सुमित पतंगे, विशाल अंबलगी, विक्रांत माळवदकर, ओंकार शिंदे, स्नेहल शिंदे, युवराज चव्हाण, नितीन भोपळे, अश्विन कोडम, जय पतंगे, गुरुनाथ कोळी, रविराज हसुरे.

**विधानसभा संयोजक :** शहर उत्तर : अर्जुन मोहिते, शहर दक्षिण : सिद्धेश्वर माळी, शहर मध्य : शिवानंद कावडे, शहर संपर्क प्रमुख : संदीप महाले, विद्यार्थी आघाडी संयोजक : शिरीष गायकवाड, सोशल मीडिया संयोजक : रोहित गोरे.

**मंडल अध्यक्ष :** शहर उत्तर पूर्व : प्रशांत गायकवाड, शहर उत्तर पश्चिम : प्रथमेश जोशी, शहर मध्य पूर्व : देवेंद्र डेरमेरे, शहर मध्य मध्य : ओंकार होमकर, शहर मध्य पश्चिम : श्रवण सावळे, शहर दक्षिण पूर्व : रविराज वाघमोडे, शहर दक्षिण पश्चिम : प्रदीप मोरे.



# इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड परिक्षेत सोशल उर्दू हायस्कूलचे यश

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड मुंबईच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित ऑलिम्पियाड परीक्षेच्या दुसऱ्या फेरीत सोलापूरच्या सोशल उर्दू हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी यश संपादन केले आहे. शाळेतील दोन गुणवंत विद्यार्थिनी मुल्ला समरीन अब्दुल गफ्फार आणि शेख महविश सुलतान यांनी राज्यस्तरावर स्थान पटकावत सुवर्णपदक (गोल्ड मेडल), प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक आपल्या नावावर केले. याशिवाय, इतर तीन विद्यार्थिनी आलिया महबूब नाईकवाडी, आरजू अयाज बागवान आणि सय्यद बीबी फातिमा रिजवान यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'उत्तेजनार्थ' (काँसोलेशन) पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, ज्यामध्ये पदक आणि प्रमाणपत्रांचा समावेश आहे. मुख्याध्यापक रसूल चौधरी, उपमुख्याध्यापक इम्तियाज शाब्दी, पर्यवेक्षक यास्मिन शेख, शेख रिजवान, अल्ताफ हुसेन कुमठे, निमंत्रक जुनैद शेख, शोएब अठकूर आणि सुलतान अख्तर यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

# लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटीच्या अध्यक्षपदी मोहन भूमकर

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

लायन्स इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटीच्या अध्यक्षपदी लायन मोहन भूमकर यांची निवड करण्यात आली. यावेळी सचिव, खजिनदार आणि इतर लायन्स सदस्यांची संचालक पदी निवड करण्यात आली.लायन्स क्लब मध्ये ३९ वर्षे कार्यरत आहेत तसेच सोलापूर जिल्हा तायकाँदो स्पोर्ट्स कॉन्सील १३ वर्षापासून जिल्हा अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. तसेच विणकर बाग प्रभात मंडळ येथे सुद्धा अध्यक्ष म्हणून आहेत. गुरुविद्या प्रतिष्ठान येथे सुध्दा संस्थापक आहेत. लायन्स क्लब ऑफ सिटीच्या वतीने विविध सेवाकार्य शहरात, ग्रामीण भागात सुध्दा सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा क्षेत्रात काम करत आहे.



# महिला आरोग्य समित्या समाजाचे आरोग्य जपणाऱ्या सक्षम यंत्रणा

### न्यायाधीश देशपांडे; महिला आरोग्य समिती सदस्यांची दोन दिवसीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

'महिला आरोग्य समित्या या केवळ सरकारी योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या समित्या नसून समाजाचे आरोग्य जपणाऱ्या सक्षम यंत्रणा आहेत. आपल्या परिसरातील नागरिकांपर्यंत आरोग्यविषयक माहिती पोहोचवणे, आरोग्य सेवांमधील अडचणी ओळखून त्यावर पाठपुरावा करणे आणि लोकसहभागातून आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यामध्ये महिला आरोग्य समित्या महत्त्वाची भूमिका बजावत आहेत, असे प्रतिपादन दिवाणी न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोलकुमार देशपांडे यांनी केले.



अनुसंधान ट्रस्ट-साथी, पुणे, सोलापूर महानगरपालिका आणि अस्तित्व संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ६ व ७ जुलै रोजी समाजकल्याण केंद्र, रंगभवन चौक येथे महिला आरोग्य समितीच्या सदस्यांची दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत २०० हून अधिक महिला आरोग्य समिती सदस्या सहभागी झाल्या होत्या.

या कार्यशाळेतून सोलापूर शहरातील नागरी वस्त्यांमधील आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठी महिला आरोग्य समित्या सक्रियपणे कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले. सोलापूर महानगरपालिका, अनुसंधान ट्रस्ट-साथी आणि अस्तित्व संस्था यांच्या सहकार्याने शहरातील रामवाडी, विडी घरकुल, जिजामाता व दाराशा या चार नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात गेल्या तीन वर्षांपासून महिला आरोग्य समिती सक्षमीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमामुळे स्थानिक पातळीवर आरोग्य सेवा, जनजागृती आणि समुदाय सहभाग वाढविण्यासाठी महिलांचे प्रभावी नेतृत्व विकसित होत आहे.

कार्यशाळेत महिला आरोग्य समित्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांबरोबरच विविध शासकीय योजनांची आणि कायदेशीर हक्कांची माहिती देण्यात आली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध मोफत कायदेशीर सेवांबाबत अॅड. देवयानी किणगी आणि अॅड. सरोजिनी तमशेट्टी यांनी मार्गदर्शन केले. महिला व बाल विकास विभागाच्या वन स्टॉप सेंटरच्या सेवांविषयी शुभांगी कांबळे यांनी माहिती दिली.

महिलांशी संबंधित विविध कायद्यांविषयी शकुंतला भालेराव यांनी मार्गदर्शन केले, तर महात्मा फुले जनआरोग्य योजनेची माहिती पर्यवेक्षक अमोल शिंदे यांनी दिली. महिलांमध्ये वाढत्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंध, तपासणी आणि लवकर निदानाचे महत्त्व डॉ. क्षिप्रा पिंजरकर यांनी स्पष्ट केले. प्रास्ताविक अस्तित्व संस्थेचे शहाजी गडहिरे यांनी केले. कार्यक्रमास अनुसंधान ट्रस्ट-साथी, पुणेचे विनोद शेंडे, तब्बू नगारे, पल्लवी वडणे, शिवानी विराजदार, प्रवीण सूर्यगंध उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### आदर्श पब्लिक स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**कुर्डूवाडी, दि. ८ जुलै-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये आदर्श पब्लिक स्कूलने यश संपादन केले. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेच्या दहा विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावून शिष्यवृत्ती प्राप्त केली. यामध्ये भार्गवी चोपडे हिने २५६ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या पाठोपाठ ओंकार शेंडे (२५४), स्मर्णिका पवार (२५४), दुर्वा घाडगे (२५०), वेदिका करळे (२४८), सार्थक कदम (२४२), वैष्णवी देवकते (२४०), स्वरा शिंदे (२३६), आरोही कांबळे (२३४) व शिवांश क्षीरसागर (२३२) यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत देखील शाळेच्या दहा विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावून शिष्यवृत्ती प्राप्त केली. यामध्ये कृष्णा भोंग याने २३६ गुण मिळवून आघाडी घेतली. त्यानंतर प्राज्वल नलवडे (२३०), प्रणिती दबडे (२२८), वैभवी जगताप (२२०), पार्थ घाडगे (२१४), मल्हार टिळेकर (२०८), समृद्धी नवले (२०२), प्रियानी भोसले (१९०), असित आखाडे (१८२) व सिद्धार्ण शिंदे (१८२) यांनीही शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले. वद्यार्थ्यांना पूनम बारबोले, बालिका कोरके, अनिता थोरात, सुरेखा कांबळे, धनंजय चोपडे, कांचन व्यवहारे, पंडित जाधव, गणेश ठवरे इत्यादी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे यांनी अभिनंदन केले.



### राऊंड टेबल जीवनज्योत प्रशालेत विज्ञान वाहिनीचे प्रयोग

**सोलापूर, दि. ८ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथील राऊंड टेबल जीवनज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत विज्ञानाचा कंदील खेडोपाडी घेऊन जाणारी विज्ञानवाहिनी फिरती प्रयोगशाळा पुणे येथील विज्ञान प्रेमी तज्ञांनी प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादरीकरण दाखवीत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. सर्वप्रथम संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी दी. शि. कमळे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन विज्ञान वाहिनी प्रयोग शाळा प्रमुख मार्गदर्शक शुभांगी पारकर यांच्या हस्ते करण्यात आले. विनायक दीक्षित, सुरेश येरुणकर, शुभांगी पारकर, हेमा महाजन, कल्पना वर्तक, सतीश गमंडे, आतिक शेख यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रयोगाची माहिती सांगितलेफ इयत्ता आठवी ते दहावी विद्यार्थ्यांचा यामध्ये सहभाग असून शिकविल्याप्रमाणे प्रत्यक्ष प्रयोग करून पाहिले. इयत्ता पाचवी ते सातवी विद्यार्थ्यांना विज्ञानाची माहिती या विषयावर चित्रफीत दाखवण्यात आली. याप्रसंगी विज्ञान प्रेमी तथा तज्ञ मार्गदर्शकांचे प्राचार्य आर. बी. यलगोंडे व पर्यवेक्षक एस.बी. जमादार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



### संभाजी सरवदे यांच्या झाकळ कादंबरीचा प्रकाशन सोहळा

**अकलूज, दि. ८ जुलै-**

माळिशरस तालुक्यातील वाफेगांव येथील ग्रामीण भागातील लेखक संभाजी दिगंबर सरवदे यांच्या बहुचर्चित अशा 'झाकळ' या कादंबरीचे प्रकाशन शिवपार्वती माध्यमिक विद्यालय वाफेगांव-बाभुळगांव (ता.माळिशरस) येथील शाळेचे मुख्याध्यापक अनिल पवार यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी बोलताना पवार म्हणाले, आपल्या शाळेत शिकलेला माजी विद्यार्थी लेखक संभाजी दिगंबर सरवदे यांची 'झाकळ' ही दुसरी कादंबरी प्रकाशित होत आहे. त्याच्या 'वावटळ' या पहिल्या कादंबरीस वाचकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला होता. यावेळी लेखक संभाजी सरवदे म्हणाले की, पुस्तक वाचन हे विद्यार्थ्यांसाठी काळाची गरज आहे. पुस्तके ही विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा देण्याचे काम करतात. यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईल इंटरनेट पासून अलिप्त राहून वाचनाकडे वळले पाहिजे असा संदेश दिला.

### मंगळवेढा-ब्रम्हपुरी मार्गावरील अपघातात एका तरुणाचा मृत्यू

**मंगळवेढा, दि. ८ जुलै-**

मंगळवेढा ते ब्रम्हपुरी या राष्ट्रीय महामार्गावर सिध्देश्वर किसन कोकरे (वय २९) या मोटर सायकलस्वारास पाठीमागून एका अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने ते जागीच मयत झाले असून या घटनेची पोलीसात नोंद झाली आहे. दि. ६ ऑगस्ट रोजी रात्री ९.३० वाजता मंगळवेढा ते सोलापूर जाणाऱ्या नॅशनल हायवे नंबर १६६ चे सिमेंट रोड समोर मयत सिध्देश्वर किसन कोकरे हे मोटर सायकल क्रमांक एम.एच.१३ बी.ई.२३९१ वरुन ब्रम्हपुरीकडे जात असताना पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाने जोराची धडक देवून मयताच्या उजव्या बाजूच्या आकाजवळ डोकीस गंभीर जखमी करुन मयत झाले असल्याचे समर्थ दादासो कोकरे यांनी दिलेल्या खबरमध्ये म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार दत्तात्रय व्हरे हे करीत आहेत.

# पालखी सोहळ्यासाठी माळशिरसमध्ये ६१ टँकर उपलब्ध




**तभा वृत्तसेवा,**
**माळिशरस, दि. ८ जुलै-**

श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा १९ जुलै रोजी तर संत श्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळा २० जुलै रोजी माळिशरस तालुक्यात प्रवेश करीत असून माळिशरस पंचायत समितीच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत या दोन्ही पालखी सोहळ्यासाठी ६१ पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती गट विकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांनी दिली यावेळी पाणी पुरवठा उपभियंता जे. व्ही. सदावरे, वरिष्ठ सहाय्यकएस आर. करांडे उपस्थित होते.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील टँकरला पाणीपुरवठा भरण्यासाठी ३२ टँकर उपलब्ध करण्यात आले आहेत धर्मपुरी मोरोची नातेपुते माळिशरस निमगाव वेळापूर अशा सहा ठिकाणी ३ बोअर व ४२ विहीरी निश्चित करण्यात आल्या आहेत. तर संत श्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील टँकरला पाणीपुरवठा करण्यासाठी चौंडेश्वरवाडी माळेवाडी यशवंत नगर महाळुंग बोरगाव खळवे अशा ठिकाणी सहाबोर व आठ विहिरी निश्चित करण्यात आलेल्या आहेत..

या ठिकाणी २६ टँकर उपलब्ध करण्यात आले आहेत .वरील सर्व ठिकाणी पाणी भरण्यासाठी कर्मचारीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच हे पाणी शुध्दीकरण करून आरोग्य विभागामार्फत पाणी भरण्याच्या ठिकाण दर्शवणारे फलक लावण्यात येणार आहेत. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी खालील प्रमाणे फिडींग पॉईन्टस करण्यात आले आहेत. धर्मपुरी ॲड. मुकुटराव भोईटे, बबन शेंडगे, अंबिका जाधव, माधव मोरे, उत्तम चव्हाण, मोरोची ग्रामपंचायत नळ योजना, हनुमंत साळुंखे जालिंदर सुळ, राजेंद्र सुळ, आनंदराव सुळ नातेपुते सुरेंद्र दावडा, राजेंद्र दावडा, बाळासाहेब बुचडे, रतनलाल मेहता, नातेपुते नगरपंचायत कावडी बुवा मंदिर शेजारी. माळिशरस बाळासाहेब राऊत महादेव पिसे, दडस, सचिन वाघमोडे, म्हेत्रे गुरुजी काशिनाथ शिंदे, आनंद पिसे, मधुकर पिसे निमगाव सुरेश वळकुंदे, रावसाहेब मगर, विठ्ठल मगर, अशोक मगर, तानाजी मगर, महादेव मगर, ग्रामपंचायत निमगाव, वेळापूर नामदेव देवकाते, संदीप यादव, माणिक चव्हाण, पांडुरंग साळुंखे, कल्याणराव चव्हाण, हनुमंत मेहेर, संदीप चंदनशिवे, विठ्ठल पिंगळे, राधाबाई पिंडले, सायली भानवसे, दिलीप बोधले, अशा ४२ विहिरी व ३ बोअर अधिग्रहण करण्यात करण्यात आल्या आहेत.

श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी फीडिंग पॉईट पुढील प्रमाणे चौंडेश्वरवाडी आगतराव गायकवाड, सदाशिव गायकवाड, माळेवाडी भीमराव फुले, अजित तोरस्कर, विठ्ठलराव शिंदे यशवंत नगर दिलीप गोडसे, स्वप्निल गोडसे, रमणलाल कुंभार, रत्नमाला गोडसे, दिलीप कुंभार, महाळुंग शिवाजी इंगळे, राजीव घोगरे, बोरगाव फत्तेसिंह पाटील. खळवे उत्तम पाटील अशा आठ विहिरी व सहा बोर असे १४ पॉईट अधिग्रहण करण्यात आले आहे.

## माळशिरस वीज वितरण विभाग सज्ज : उपकार्यकारी अभियंता संजय ओगले

**माळशिरस, दि. ९ जुलै-**



श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा सोमवार २० रोजी माळिशरस शहरात प्रवेश करीत असून विज वितरण विभागाने विज पुरवठा खंडित होऊ नये यासाठी सर्व तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता संजय ओगले यांनी दिली. शहर व परिसर व पालखी तळ या भागातील दुरुस्तीचे काम ओगले यांच्या मार्गदर्शनाखाली यंत्र चालक विशाल पवार,प्रधान तंत्रज्ञ सत्यशील गायकवाड, योगेश देसाई व इतर कर्मचारी करीत आहेत. विद्युत तारावर आलेली झाडे झुडपे तोडण्यात आली आहेत. तसेच पाणी पुरवठा,पालखी तळ व शहरातील रोहित्रचे पॅनल बॉक्सची दुरुस्ती करण्यात आली आहे. सर्व रोहित्राची तपासणी करून आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली आहे.

**कर्मचारी असे असणार तैनात**

कंट्रोल रूम ४, पालखी तळ ३, पालखी मैदान ४, म्हसवड चौक ते वाडी दोन ३, म्हसवड रोड ते अकलूज रोड, बाजार पेठ ३, पाण्याचे टँकर भरण्याच्या ठिकाणी ४, तक्रार निवारण फ्यूज कॉल असे २३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे ओगले यांनी सांगितले.

# मुख्याधिकाऱ्यांविरोधात मोहोळ शहरात संताप

**जि.प. शाळेचे गेट काढण्याची बाब**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ८ जुले -**

मोहोळ शहरात अत्यंत जुन्या व नावाजलेल्या इमारतीत अनेक दशकापासून जिल्हा परिषदेची शाळा भरते, तिचे गेट नियमबाह्य असल्याचा आरोप करत मोहोळ नगर परिषदेचे मुख्याधिकाऱ्यांनी आदर्श चौकातील शाळेच्या पटांगणातील अस्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याने मोहोळ तालुक्यातील शिक्षणप्रेमीतून संतापाची लाट उसळली आहे .

मोहोळमध्ये मेन रोडवर मोहोळ शहराच्या प्रवेश द्वारा जवळच कित्येक वर्षापासून जिल्हा परिषदेची शाळा नंबर १ आणि शाळा नंबर २ अशा दोन इमारती जवळजवळ आहे. या इमारतीमध्ये सध्या जिल्हा परिषदेची शाळा आजही चांगल्या पद्धतीत भरत आहे. शाळेत मोहोळच्या मुख्याधिकाऱ्यांनी भाजी मंडई भरवण्याचा घाट घातला होता. काही दिवस या शाळेत मंडई चांगलीच फुलली होती. परंतु यामुळे शाळेतील शिक्षकांना विद्यार्थ्यांना अध्यापन करणे व शाळेची सुरक्षितता स्वच्छता ठेवणे अवघड जात होते. स्वच्छतेचा विषय नगर पालिकेच्या अखत्यारित असतानाही याकडे दुर्लक्ष केले जात होते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या गरीब, वंचित घटकांच्या मुलांना त्रास सहन करावा लागत होता. याचा विचार करून या शाळेच्या शिक्षकांनी व काही पालकांनी ठोस भूमिका घेतली. मुलांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेचा विचार करून या शाळेला गेट बसवण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षितता मिळाली. परंतु मोहोळचे मुख्याधिकारी यांनी वेगळीच शक्कल लढवत या शाळेचे बसवलेले गेट नगरपालिकेच्या जागेत असल्याने ते काढण्याबाबत मुख्याध्यापकांना पत्र दिले आहे. हे पूर्णपणे चुकीचे असल्याचे पडसाद सोशल मीडियावर दोन दिवसात व्यक्त झाले. काहींनी मोहोळ शहरामध्ये आदर्श चौकातील जिल्हा परिषदेच्या शाळेकडे स्वच्छतेबाबत दुर्लक्ष केले जाते. अक्षरशः त्या शाळेच्या पटांगणात हागणदारी असल्याचे चित्र नियमितपणे पहावयास मिळते. याकडे या मुख्याधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असते. हे आजवर यांच्या दृष्टीस पडले नाही का? असा सवाल मोहोळ येथील शिक्षणप्रेमी नागरिकांतून केला जात आहे. गरीब वंचित शोषित घटकांची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षण घेत असतात. बऱ्याच ठिकाणच्या जिल्हा परिषदेच्या शाळा बंद केल्या आहेत. या मोहोळ नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांना नेमके काय साध्य करावयाचे आहे? याबाबत नगरसेवकांनी लक्ष घालणे गरजेचे आहे.

मोहोळ नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांचा मनमानी कारभार यामुळे गरीब वंचित घटकातील मुलांचे शिक्षणाचे भवितव्य अंधारात घालवण्याचा तर त्यांचा डाव नाही ना ? अशीही चर्चा शिक्षणप्रेमीमध्ये होऊ लागली आहे. उलट मोहोळ नगरपरिषदेने नगरपरिषद स्थापन झाल्यापासून शिक्षणाची प्रगती होण्यासाठी सुरू मोहोळ शहरातील शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी काय केले? काय सुविधा पुरवल्या? याचाही विचार होणे गांभीर्याने गरजेचे असल्याची चर्चा होत आहे. मुख्याधिकाऱ्यांनी या शाळेसाठी सुरक्षितता द्यावी विद्यार्थ्यांसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी व शिक्षण घेणाऱ्या मुलींना संरक्षण द्यावे अशी अपेक्षा मोहोळ शहरातील नागरिकांनी व्यक्त केली जात आहे .

**मुख्याधिकाऱ्यांचा आटापिटा चुकीचा असल्याचा आरोप**

या इमारतीमध्ये जुन्या विद्यार्थ्यांच्या भावना गुंतल्या आहेत. मुलींच्या सुरक्षिततेसाठी या ठिकाणी कंपौंड गेट बसवणे गरजेचे होते म्हणून बसवले. ते गेट काढण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांचा आटापिटा चुकीचा आहे. याबाबत मोहोळमधील नगरसेवकांनी बोलणे गरजेचे, परंतु तसे होत नाही. आदर्श चौकातील शाळे समोर उघड्यावर मल मूत्रविसर्जन करतात ते चालते. वारे न्याय?, अशी प्रतिक्रिया पंचायत समिती भाजप गटनेते संजीव खिलारे यांनी दिली.



## माढा महाविद्यालयात पंढरीची निर्मल वारी आली दारी कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ८ जूलै-**

माढा रयत शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष अंतर्गत 'पंढरीची निर्मल वारी आली माढा महाविद्यालयाच्या दारी' या उपक्रमानिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमात वारकरी संप्रदायाची परंपरा, वारीचे आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि स्वच्छतेचे महत्त्व तसेच संतांच्या विचारांचे आजच्या पिढीसाठी असलेली गरज याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

प्रारंभी उपप्राचार्य प्रा. अशोक लोंढे यांनी प्रस्ताविक केले. प्रमुख वक्ते फुलचंद नागटिळक यांनी संत गाडगेबाबा महाराजांच्या वेशात वारकरी संप्रदायातील समता, बंधुभाव, सेवाभाव, शिस्त, मानवतेचा संदेश आणि स्वच्छता विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. घन:शाम हराळे हे होते.

यावेळी इतिहास विभागप्रमुख डॉ. रविराज कांबळे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. नामदेव शिंदे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. कैलास शिंदे, प्रा. समाधान कदम, प्रा. प्रसाद पवार, प्रा. मयूर चव्हाण उपस्थित होते. आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमधिकारी प्रा. डॉ. दत्तात्रय काळेल यांनी मानले.

# लोकसहभागातून बोरोटी खुर्द कन्नड शाळेला शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ जुलै-**



जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा, बोरोटी खुर्द येथे शाळा समृद्धी उपक्रमांतर्गत लोकसहभागातून प्रेरणादायी कार्यक्रम झाला. सरपंच हुसेनी नंदिवाले यांनी विद्यार्थ्यांना सुमारे ७,५०० रुपयांचे शैक्षणिक साहित्य भेट देत शिक्षणाला मोलाची साथ दिली. यामध्ये वह्या, पेन, पेन्सिल, कंपास, रबर, पाट्या तसेच विद्यार्थ्यांसाठी ओळखपत्रे यांचे वाटप केले.

याच कार्यक्रमात पांडुरंग कोळी यांनी शाळेच्या सौंदर्यीकरण व पर्यावरण संवर्धनासाठी सुमारे ५ हजार रुपयांच्या २० कुंड्या आणि विविध प्रकारची शोभिवंत व फळझाडांची रोपे शाळेला भेट दिली.

या उपक्रमामुळे शाळेचा परिसर अधिक हिरवागार व आकर्षक होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन केंद्रप्रमुख करुणा गुरव उपस्थित होत्या.

व्यासपीठावर तुकाराम कोळी, सादिक जमादार, गोपाल लोहार, राजू हालोळ्ळी, माजी केंद्रप्रमुख श्रीमंत पुजारी, भीमा कडबे, प्रशांत पाटील, आकाश शिंगे, निलेश शिंगे उपस्थित होते.

शिक्षक शरणप्पा फुलारी यांच्या पुढाकारातून मागील आठ ते नऊ महिन्यांपासून शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी लोकसहभागातून विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. या कार्यात मुख्याध्यापिका राजश्री तांबे, विषय शिक्षक अनंत बांगर व अंजली वाघमारे यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. सूत्रसंचालन शरणप्पा फुलारी यांनी केले, तर अनंत बांगर यांनी आभार मानले.

# बार्शीत मुस्लिम बिरादार जमात संस्थेतर्फे गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ जुलै-**

बार्शी येथील मुस्लिम बिरादार जमात संस्थेच्यावतीने दहावी व बारावी परीक्षेत यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडला. वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार दिलीप सोपल होते, तर उद्घाटक म्हणून आमदार राजेंद्र राऊत उपस्थित होते.

कार्यक्रमास तहसीलदार एफ. आर. शेख, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, नासिर मुलाणी, डॉ. संदीप तांबारे, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष हाजी ज. इकबाल पटेल यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर संघटक वाहिदपाशा शेख यांनी प्रास्ताविक केले. यावेळी समाजातील १०८ गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविलेल्या अधिकारी, डॉक्टर आणि वकील यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

आ. दिलीप सोपल, आ. राजेंद्र राऊत यांनी मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी आपण कायम सकारात्मक भूमिका घेऊ, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इकबाल पटेल, सचिव जाकीरहुसेन शेख, खजिनदार वसिम पठाण, सहसचिव अख्तर शेख, संघटक वाहिदपाशा शेख, कायदेशीर सल्लागार ॲड. सर्फराज मुजावर, उपाध्यक्ष रफिक सातारकर, सलीम ख्वाजा शेख, सादिक मुल्ला, इब्राहीम काझी, उस्मानअली शाह, इस्माईल पटेल, इरफान शेख, शाहनवाज मुल्ला, समशेर सय्यद, अयाज आयुब शेख, जमीर शेख, एजाज शेख, सादिक काझी, शकील मुलाणी, रियाज पठाण (पत्रकार), मुसा मुलाणी, साजन शेख, इम्रान झारेकरी, जफर शेख, अकिब पठाण, शाकीर शेख, अब्बास शेख, शकील झारेकरी आदींनी परिश्रम घेतले.



**आ. सोपल आणि आ. राऊत एकाच व्यासपीठावर**

मुस्लिम बिरादार जमात संस्थेच्या गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे बार्शी तालुक्याचे आमदार दिलीप सोपल आणि सोलापूर जिल्ह्याचे विधान परिषदेचे आमदार राजेंद्र राऊत हे एकाच व्यासपीठावर उपस्थित राहणे होय. दोन्ही लोकप्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. दोन्ही नेत्यांची एकत्र उपस्थिती कार्यक्रमात उपस्थितांमध्ये चर्चेचा विषय ठरली.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## नीरा नदी पात्रात विसर्ग वाढला

### नदीकाठच्या नागरिकांनी सावध राहण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

बुधवार, दि. ०८जुलै रोजी वीर धरणाची पाणी पातळी झपाट्याने वाढत असल्याने याच दिवशी सायंकाळी ६:०० वा. वीर धरणाच्या सांडव्यावरून ४६३७ क्युसेस व एस्केपमधून १४०० क्युसेस असा एकूण ६०३७ क्युसेस इतका विसर्ग निरा नदी पात्रामध्ये सुरू करण्यात येणार असल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सावध राहण्याचा इशारा नीरा उजवा कालव्याचे कार्यकारी अभियंता यांनी दिला आहे.

पावसाच्या प्रमाणानुसार विसर्ग पुन्हा कमी/जास्त करण्याची शक्यता आहे; याची नोंद घेण्यात यावी, असेही आवाहन केले आहे. यामुळे कृपया नदीपात्रात उतरू नये आणि नदीपात्रात काही तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावीत. कृपया सखल भागातील संबंधीत नागरीकांना सूचना देण्यात याव्या आणि उचित कार्यवाही करण्यात यावी. सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घेण्याच्या सुचनाही शेवटी केल्या आहेत.

## महत्त्वाचे...




### आषाढी वारीत पाच लाख वारकऱ्यांची मोफत सेवा करणार इस्कॉन

**तभा वृत्तसेवा,**
**सुस्ते, दि. ८ जुलै-**

महाराष्ट्रासह देशभरातील लाखो वारकरी, भाविक आषाढी वारीला पांडुरंगाच्या दर्शना बरोबर चंद्रभागेच्या पूर्वेला असणाऱ्या श्रीकृष्णाच्या इस्कॉन मंदिराला भेट देतात. पंढरपूरमध्ये विठ्ठलभक्ती आणि कृष्णभक्तीचा सुंदर संगम अनुभवायला मिळत आहे. यावर्षीही आषाढी वारी निमित्त इस्कॉन पंढरपूरतर्फे सुमारे पाच लाख वारकरी भाविकांसाठी पूर्णपणे मोफत, स्वच्छ, पौष्टिक आणि हायजेनिक महाप्रसाद करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महाप्रसादाची सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. आषाढी वारीसाठी दरवर्षी वीस लाखांहून अधिक वारकरी पंढरपूरमध्ये दाखल होत असल्याने भाविकांच्या सोयीसाठी इस्कॉन मंदिराने विविध सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. चंद्रभागा नदीच्या पूर्व तीरावर वारकऱ्यांसाठी सुरक्षित स्नान व्यवस्था करण्यात आली असून, महिलांसाठी स्वतंत्र चेंजिंग रूम उभारण्यात आल्या आहेत. भाविकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत कोणतीही जीवितहानी अथवा गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. याशिवाय, वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय सेवा आणि हॉस्पिटल सुविधा २४ तास उपलब्ध राहणार आहेत. अनुभवी डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि स्वयंसेवक सतत सेवेत कार्यरत राहून भाविकांना आरोग्य सेवा पुरविणार आहेत.

> इस्कॉनच्या वतीने प्रत्येक वर्षी वारकऱ्यांची सेवा म्हणून अन्नदान, वैद्यकीय सेवा, मुक्कामाची व्यवस्था तसेच चंद्रभागा नदीच्या पूर्व तीरावर वारकऱ्यांसाठी सुरक्षित स्नान व्यवस्था करण्यात आली असून, महिलांसाठी स्वतंत्र चेंजिंग रूम उभारण्यात आल्या आहेत. यावर्षी पाच लाख वारकऱ्यांची व्यवस्था करण्याचे नियोजन इस्कॉनने केले आहे.
>
> - **प्रल्हाद दास**, इस्कॉन अध्यक्ष पंढरपूर.



### हुतात्मा स्मृती मंदिरात जिल्हास्तरीय कायदेविषयक परिषद

**वळसंग, दि. ८ जुलै-**

सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे जिल्हास्तरीय कायदेविषयक परिषद पार पडली. उच्चस्तरीय परिषदेचे अध्यक्षपद निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई यांनी भूषवले. परिषदेला मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती, सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश आणि विधी क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने या सोहळ्याची अधिकृत सुरुवात करण्यात आली. परिषेदेचे कार्यकारिणी सदस्य ॲड. संजय गायकवाड यांच्या हस्ते भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. विधी क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल मान्यवरांनी सर्वोच्च न्यायालयाच्या त्यांच्या कार्याचे आभार मानले. कार्यकारिणी सदस्य ॲड. संजय गायकवाड यांनी न्यायदानाच्या प्रक्रियेत 'वकिलांची भूमिका' या विषयावर विचार मांडले. बदलत्या काळातील कायदेशीर आव्हाने आणि वकिलांचे कर्तव्य यावर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला. परिषदेमुळे जिल्ह्यातील वकील आणि विधी क्षेत्रातील अभ्यासकांना सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांचे थेट मार्गदर्शन लाभले.

### सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या चेअरमनपदी मोहन लांडे यांची निवड

**माळीनगर, दि. ८ जुलै-**



माळीनगर येथील दि सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या चेअरमन पदी मोहन लांडे यांची निवड करण्यात आली. येथील सासवड माळी एज्युकेशन सोसायटीच्या चेअरमनपदी मोहन लांडे हे विराजमान होत आहे. चार वर्षांपूर्वी चेअरमन पदी निवड झालेल्या राजेंद्र गोपाळराव गिरमे यांनी पदाचा राजीनामा दिल्याने लांडे यांची निवड करण्यात आली. त्याचबरोबर व्हाइस चेअरमन पदी असलेले निखिल कुदळे यांना होल टाइम डायरेक्टर पद देऊन पदोन्नती देण्यात आली. त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर विशाल जाधव यांची व्हाइस चेअरमन पदी निवड करण्यात आली. संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत या निवडी करण्यात आल्या. गिरमे हे सध्या संचालक मंडळावर संचालक म्हणून कार्यरत आहेतच. राजेंद्र गिरमे हे यापूर्वी कारखान्यावर १९८९ साली ते प्रथम संचालक म्हणून निवडून आले. नंतर पुढे ते बारा वर्ष उपाध्यक्ष होते. नूतन चेअरमनपदी मोहन लांडे यांची निवड झाल्यानंतर तसेच विशाल जाधव उपाध्यक्षपदी आणि होल टाईम डायरेक्टर पदी निखिल कुदळे यांची निवड झाल्यानंतर सभासद, कामगार, परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# पालखी मार्गाला 'बूस्टर डोस'

## १६ रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी २.१५ कोटींचा निधी मंजूर

### माळशिरस, करमाळा, पंढरपूर आणि माढा तालुक्यातील मार्ग होणार सुस्थितीत

### चालू आर्थिक वर्षात कामे पूर्ण करण्याचे शासनाचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जुलै-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि खड्डेमुक्त करण्यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सोलापूर जिल्ह्यातील पालखी मार्गावरील १६ रस्त्यांच्या विशेष दुरुस्ती व सुधारणेसाठी तब्बल २ कोटी १५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, ही सर्व कामे चालू आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ग्रामविकास विभागाच्या २५ जूनच्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेने सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीतून पालखी मार्गावरील खराब झालेल्या रस्त्यांची विशेष दुरुस्ती, डागडुजी आणि आवश्यक सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यामुळे आषाढी वारीदरम्यान लाखो वारकऱ्यांना सुरक्षित व अधिक सोयीस्कर प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

दरम्यान, या योजनेअंतर्गत माळशिरस, करमाळा, पंढरपूर आणि माढा तालुक्यांतील महत्त्वाच्या पालखी मार्गांचा समावेश करण्यात आला आहे.

विशेषतः पंढरपूर तालुक्यातील आठ प्रमुख रस्त्यांच्या दुरुस्तीला प्राधान्य देण्यात आल्याने वारीच्या मुख्य मार्गावरील वाहतूक अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा आहे.

> **पालखी मार्ग होणार खड्डेमुक्त**
>
> 'वारीपूर्वी पालखी मार्ग खड्डेमुक्त करण्यावर शासनाचा भर' या निर्णयामुळे वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसह ग्रामीण भागातील नागरिकांनाही वर्षभर चांगल्या रस्त्यांचा लाभ मिळणार आहे. पालखी मार्गावरील पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या दृष्टीने हा निधी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.




> **पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील प्रस्तावित रस्ते**
>
> करकंब, भोसे, विष्णूपद, वाखरी, पिराची कुरोली, पांढरेवस्ती तसेच इतर पालखी मार्गावरील जोडरस्ते तर माळशिरस तालुक्यात दहिगाव-शिंगणापूर पाटी, नातेपुते-जगतवस्ती, मांडवे-नातेपुते (जुना पालखी मार्ग), करमाळा तालुक्यात रावगाव-करमाळा व सातोली-चिखलवाडी या रस्त्यांचाही समावेश आहे.

## आषाढी वारीत नोडल अधिकाऱ्यांनी टीम वर्क म्हणून काम करावे : जिल्हाधिकारी

### प्रत्येक नोडल अधिकाऱ्यांनी पालखीचे स्वागत करणे बंधनकारक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

आषाढी शुद्ध एकादशीनिमित्त मानाच्या पालख्या १६ जुलै पासून सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करतात. त्यावेळी त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रत्येक मानाच्या पालखीसाठी एका नोडल अधिकाऱ्याची व त्यांना सहाय्यक अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत. या सर्व अधिकाऱ्यांनी पालखी प्रमुखाशी समन्वय ठेवून सोपवलेली जबाबदारी एक टीम वर्क म्हणून पार पाडून वारी यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी केले.

मानाच्या पालख्यांसाठी नियुक्त केलेल्या नोडल अधिकारी सहाय्यक अधिकारी तसेच शौचालयाची तपासणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तीकेयन दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, अमोलसिंह भोसले, सुमित शिंदे, नगरपालिका प्रशासन सह आयुक्त आशिष लोकरे, तहसीलदार सैफन शेख, तहसीलदार सरस्वती पाटील, जिल्हाधिकारी कार्यालयात तर सर्व नियुक्त केलेले अधिकारी ऑनलाईन द्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन म्हणाले की, सर्व नोडल अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी अत्यंत चोखपणे पार पाडावी. आज पासूनच नियुक्त केलेल्या पालखी प्रमुखाशी बोलून घ्यावे. तसेच पालखी सोलापूर जिल्ह्यात आल्यानंतर पालखी समवेत राहून पालखीच्या मुक्काम, विसावा रिंगण या ठिकाणाला भेटी द्याव्यात. तसेच रस्ते मार्गाची पाहणी करावी. पाहणी दरम्यान अडचणी असतील त्याबाबतची माहिती तात्काळ प्रशासनाला कळवावी. तसेच पालखी सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करताना संबंधित नोडल अधिकारी यांनी पालखीचे यथोचित स्वागत करण्याबाबतचे निर्देशही त्यांनी दिले.

संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी पालखी सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर पालखी समवेतच राहणे बंधनकारक आहे. तसेच पालखी मुक्कामाच्या ठिकाणी रात्रीच्या व सकाळच्या वेळेला विज पाणी व शौचालयाची समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्याबाबत अगोदरच माहिती घेऊन त्या समस्यांचे निराकरण करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी स्पष्ट केले. त्याप्रमाणेच मागील वर्षीचा अनुभव लक्षात घेऊन शौचालयाची व्यवस्था उत्कृष्ट पद्धतीने करण्यासाठी स्वतंत्र दोन टीम च्या माध्यमातून १२ अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे.

या अधिकाऱ्यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासोबत पुणे येथून राहून मुक्कामाच्या



ठिकाणी पुरवठादारने दिलेल्या शौचालयाची पाहणी करावी ते व्यवस्थित आहेत का याची खात्री करावी तसेच एका ठिकाणाहून पुढच्या ठिकाणी ते योग्य वेळेत पोहोचले पाहिजेत या दृष्टीने त्यांच्याशी संवाद ठेवून कार्य करणे बंधनकारक असल्याचे जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी सांगितले. तसेच या टीमने दिवसातून सकाळ दुपार व रात्री असे तीन वेळा कॉल करून प्रशासनाला माहिती देणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रारंभी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी सर्व मानाच्या पालखी प्रमुखांशी तसेच पुणे येथून पालख्या सोबत शौचालयाची व्यवस्था पाहणी व पुरवठादार यांच्याशी समन्वय ठेवण्याच्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्याची माहिती सविस्तरपणे सांगितली. दिलेल्या आदेशाप्रमाणे प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांनी अत्यंत काळजीपूर्वक काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी निर्देशित केले.

## मुख्यमंत्री वारकरी महामंडळाचा होणार वारकऱ्यांना फायदा

### महामंडळ प्रशासकीय रचना, संचालक मंडळ रचनेबाबत निघाला जीआर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

महाराष्ट्र सरकारकडून 'मुख्यमंत्री वारकरी महामंडळा'ची पंढरपूर येथे स्थापना केली आहे. महामंडळावर कार्यरत किंवा निवृत्त भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची संचालकपदी नियुक्ती केली आहे. या मुख्यमंत्री वारकरी महामंडळासाठी ५० कोटींची तरतूद शासनाकडून करण्यात आली आहे. मंत्रिमंडळाच्या दि. ११ जुलै २०२४ रोजी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्याबाबतचा निर्णय झाला आहे. आज राज्य सरकारकडून महामंडळ प्रशासकीय रचना, संचालक मंडळ रचनेबाबत जीआर निघाला आहे.

राज्य सरकारकडून या महामंडळासाठी रू. ५० कोटी इतके प्रारंभिक भागभांडवल मंजूर केले आहे. नोडल विभाग हे महामंडळ शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत आहे. महामंडळावर वारकरी संप्रदायातील प्रमुख साधू, संत, कीर्तनकार आणि प्रतिनिधींची अशासकीय सदस्य व अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. यासाठी सामाजिक न्याय विभाग, वित्त विभाग आणि नियोजन विभागाचे वरिष्ठ अधिकारी यात पदसिद्ध संचालक म्हणून काम पाहतील. महामंडळामुळे परंपरेने वारी करणाऱ्या वृद्ध वारकऱ्यांना पेन्शन दिली जाणार आहे, भजनी मंडळांना भजन व कीर्तनाच्या साहित्यासाठी (टाळ, मृदंग, वीणा) आर्थिक अनुदान दिले जाईल. आषाढी व कार्तिकी वारीसाठी येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना सुरक्षा व अपघात विमा संरक्षण कवच पुरवले जाईल. महामंडळाच्या प्रशासकीय अध्यक्ष सामाजिक न्याय विभागाचे मंत्री असणार आहेत. सा. न्याय विभागाचे सहअध्यक्ष आहेत. उपाध्यक्ष सामाजिक न्याय विभागाचे राज्यमंत्री आहेत. महामंडळाचे संचालक मंडळही निर्माण केले आहे.

## कौंडण्यपूर पालखी सर्वात प्रथम येणार जिल्ह्यात

### मानाच्या पालख्यांचे सोलापूर जिल्ह्यातील आगमन वेळापत्रक जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

आषाढी एकादशी २५ जुलै रोजी भरणार असून, सर्व पालख्या १६ ते २० जुलै २०२६ या पाच दिवसांत जिल्ह्यात दाखल होणार आहेत. श्री विठ्ठल रुक्माई संस्थान, कौंडण्यपूर पालखी सर्वात प्रथम दि. १६ जुलै रोजी जिल्ह्यात येणार आहे.

पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या महाराष्ट्रातील १० प्रमुख मानाच्या पालख्यांचे प्रस्थान व सोलापूर जिल्हा हद्दीतील आगमनाचे वेळापत्रक जिल्हा प्रशासनाने जाहीर केले आहे. या पालख्यांचे सोलापूर जिल्हा हद्दीत स्वागत करण्यासाठी तसेच त्यांच्या अडीअडचणी व समस्या सोडवण्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने दिली आहे.श्री संत ज्ञानेश्वर महाराज, आळंदी पालखी दि. ०८ जुलै रोजी प्रस्थान करून दि. १९ जुलै रोजी सोलापूर जिल्हा हद्दीत दाखल होईल. श्री संत तुकाराम महाराज, देहू पालखी दि. ०७ जुलै रोजी निघणार असून दि. २० जुलै रोजी जिल्ह्यात येईल. श्री संत मुक्ताबाई, मुक्ताईनगर पालखी दि. १९ जुलै रोजी जिल्हा हद्दीत पोहोचेल.




श्री संत सोपान महाराज, सासवड पालखी दि. १२ जुलै रोजी निघून दि. २० जुलै २०२६ रोजी सोलापूर जिल्ह्यात येईल.

श्री संत निवृत्तीनाथ महाराज, त्र्यंबकेश्वर पालखी दि. १८ जुलै रोजी जिल्हा हद्दीत दाखल होईल. श्री संत एकनाथ महाराज, पंढरपूर पालखी दि. १९ जुलै रोजी जिल्ह्यात येईल.

श्री संत गजानन महाराज, शेगाव पालखी दि. १७ जुलै रोजी सोलापूर जिल्हा हद्दीत दाखल होईल. श्री विठ्ठल रुक्माई संस्थान, कौंडण्यपूर पालखी सर्वात प्रथम दि. १६ जुलै रोजी जिल्ह्यात येणार आहे.

श्री संत चांगावटेश्वर देवस्थान, सासवड पालखी दि. २० जुलै रोजी जिल्हा हद्दीत दाखल होईल.

> **जिल्हा नियंत्रणाशी संपर्क साधण्याचे आवाहन**
>
> लाखो वारकऱ्यांच्या सोयीसाठी जिल्हा प्रशासनाने प्रत्येक पालखीसाठी नोडल व सहाय्यक समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. वारकरी व नागरिकांनी प्रवासात अडचण आल्यास संबंधित अधिकाऱ्यांशी किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष क्र. ०२१७-२७३१०१० येथे संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

श्री संत निळोबाराय महाराज, पिंपळनेर पालखी दि. १० जुलै २०२६ रोजी निघून दि. १९ जुलै २०२६ रोजी सोलापूर जिल्ह्यात येईल.

> **१९ जुलैला ४ तर २० जुलैला तीन पालख्यांचे आगमन**
>
> दि. १९ जुलै रोजी ज्ञानेश्वर महाराज, मुक्ताबाई, एकनाथ महाराज व निळोबाराय महाराज अशा ४ पालख्या, २० जुलै रोजी तुकाराम महाराज, सोपान महाराज व चांगावटेश्वर देवस्थान अशा ३ पालख्या एकाच दिवशी जिल्ह्यात दाखल होणार आहे.